: तिबेट : कोरिया : इंडोनेशिया


# जगापुढील प्रश्नचिन्हे ???



म. ग्रं. सं. ठाणे.
[illegible]य भू ... [illegible]
क्र. ४ ६
REFBK-0017220
REFBK-0017220

वि. हं. पारगांवकर

६४६६०
२९।३।६९



व्हिएतनाम, तिबेट
कोरिया, इंडोनेशिया

•

# जगापुढील प्रश्नचिन्हे

क्र. ९७२२८

वि. शं. पारगांवकर

REFBK-0017220

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

चार रुपये

प्रिय मित्र

श्री. वसंत देशमुख

यांना।

प्रकाशक :
अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ
पुणे २

●

मुखपृष्ठ :
सालकर

●

ठसे :
ब. शं. दाते
कलाभुवन

●

प्रकाशन
ऑगस्ट १९६७

●

सर्व हक्क लेखकाधीन

●

मुद्रक :
ग. वा. बेहरे
रविराज मुद्रणालय
६३४ बुधवार पेठ
पुणे-२

●

या पुस्तकात मे १९६७ पर्यंतच्या घटनांचा तपशील दिला आहे.

●

या पुस्तकात महामंडळाचे शुद्धलेखन स्वीकारले आहे.

●

# अनुक्रम


- व्हिएतनाम १
- तिबेट ३३
- कोरिया ६५
- इंडोनेशिया १०१
- समारोप १२६

# व्हिएतनाम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७२२०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



# १

दोन सप्टेंबर १९४५ हा दिवस व्हिएतनामच्या राजकीय इतिहासात महत्त्वाचा आहे. त्या दिवशी व्हिएतनामी जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा पुकारा केला. ' स्वातंत्र्य, समता आणि सुख उपभोगण्याचा सर्व मनुष्यमात्राला सारखाच हक्क आहे. आणि हा हक्क बजावला जाण्यासाठी आपला देश स्वतंत्र असणे आवश्यक आहे. व्हिएतनामी जनतेला आज ऐंशी वर्षांनंतर हे स्वातंत्र्यसुख मिळत आहे. ते जतन करून देशाचा उत्कर्ष करणे आता आपल्याच हातात आहे !' या प्रकारच्या आशा-आकांक्षा आणि भावनेने व्हिएतनामी जनतेने, २ सप्टेम्बर १९४५ या दिवशी महन्मगल उत्सव साजरा केला.

परंतु इतिहासातील त्या दिवसाची घटना वाचल्यानंतर आजची परिस्थिती पाहिली तर तुमच्या-आमच्या मनात कोणत्या भावना येतात ? स्वातंत्र्याचा श्वास घेऊन काही वर्षे लोटतात न लोटतात तोच जी आपत्ति व्हिएतनामी जनतेच्या जीवनात निर्माण झाली आहे, जो अन्याय या जनतेवर लादला जात आहे, त्याबद्दल जगातील स्वातंत्र्यप्रेमी जनतेला चीड आल्याशिवाय राहणार नाही !

या बिचाऱ्या देशाने स्वातंत्र्य मिळवून देखील आज त्याचे भवितव्य त्याच्या हातात राहिलेले नाही ! या देशाचे भवितव्य घड-

विण्यासाठी जगातील दोन बलाढ्य राष्ट्रे आज बद्धपरिकर झाल्या-सारखी दिसत आहेत. स्वातंत्र्याच्या, समतेच्या आणि न्यायाच्या नावा-खाली दोन राजकीय विचारसरणींचा झगडा आज व्हिएतनाममध्ये चालू असल्याचे दृश्य दिसत आहे! जगातील दोन राजकीय विचार-सरणींचा कस लावून पाहण्याच्या दगडाचे स्वरूप या जिवंत देशाला प्राप्त झाले आहे!

व्हिएतनाममध्येच या दोन शक्ति आमोरासमोर येऊन का उभ्या राहिल्या? आणि दररोज होणाऱ्या मानवी हत्येचे पाप माथ्या-वर घेऊन देखील हे युद्ध वर्षानुवर्षे का चालू राहिले आहे? त्यासाठी व्हिएतनामचीच भूमी का निवडली गेली?

हे समजून घेण्यासाठी इंडोचीनचा पूर्वीचा इतिहास आणि त्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

ही एक फार मोठी आणि लांबलचक कहाणी आहे. परंतु अगदी थोडक्यात ती खाली देत आहे:

१९४५ च्या मध्यावर जागतिक महायुद्ध संपले आणि फ्रेंचाच्या साम्राज्याला इंडोचायनामध्ये हादरे बसण्यास सुरुवात झाली, चीनच्या दक्षिणेस आणि सयामच्या पूर्वेस इंडोचायना नावाने जो प्रदेश ओळखला जात होता तो फ्रान्सपेक्षा जवळ जवळ तिपटीने मोठा आहे. त्याची लोकसंख्या आज तीन कोटीहून अधिक आहे. हा देश जगातील तांदूळ निर्यात करणाऱ्या देशात तिसऱ्या नंबरचा देश आहे. रबर आणि मका यांचीही या देशातून चांगली निर्यात होते. या देशाची सधनता केवळ शेतीवरच नसून धातु आणि लाकूडही येथे विपुल प्रमाणात आहे. कोळसा आणि अशोधित धातूंमध्ये लोखंड, जस्त आणि फॉस्फेट यांचीही मोठ्या प्रमाणावर येथून निर्यात होत असे.

या समृद्धीचा फ्रेंच साम्राज्यवाद्यांना चांगलाच फायदा झालेला होता. व्यापार आणि भांडवल गुंतवणुकीसाठी इंडोचायना नावाचे उत्तम कुरण फ्रेंचाना उपलब्ध झाले होते असे म्हणण्यात थोडीदेखील अतिशयोक्ति नाही! भात पिकविणारे प्रदेश फक्त तेथील नेटिव्ह आणि चिनी लोकांच्या हातात होते. दक्षिणेतील रबराचे मळे आणि

उत्तरेकडील मोठमोठाल्या खाणी सर्व फ्रेंचांच्या आधिपत्याखाली होत्या. तसेच इंडोचायनाचे सारे आर्थिक व्यवहार फ्रेंच बँकांच्या नियंत्रणाखाली होते. थोडक्यात म्हणजे इंडोचायनामध्ये फ्रान्सने सांस्कृतिक आणि आर्थिक प्रभावाचा चांगलाच पगडा बसविलेला होता.

तसेच त्यांनी तेथे उत्तम रस्ते, नद्यांवर मोठमोठाले पूल आणि निरनिराळी उपयुक्त, लोकोपयोगी कामे केली होती !

पहिल्या महायुद्धामध्ये इंडोचायनाच्या नागरिकांनी, फार महत्त्वाचा भाग घेतलेला होता. त्रेचाळीस हजारांहुन अधिक जवान युरोपमध्ये गेले होते तसेच सरासरी पन्नास हजार कामगारही पाठविले गेले होते.

इंडोचायना हा टोकिन, कोचिनचायना, आन्नम आणि व्हिएतनाम यांचा मिळून बनलेला होता. त्याच्या जवळचे देश सयाम, लाओस आणि कंबोडिया होत.

या देशाच्या भवितव्याविषयीचे अंतिम अधिकार फ्रेंचांच्याच हातात होते. या देशाचा शासनविषयक दृष्टिकोन कधी फरान्सचे पार्लमेंट घेत असे, तर बहुतेक वेळा हे निर्णय फ्रान्सचे मंत्रिमंडळ घेई आणि इंडोचायनामधील फरेंच नोकरशाहीतर्फे त्या निर्णयांची अम्मलबजावणी केली जाई.

सर्वसाधारणतः परतंत्र देशामध्ये शेतकरी लोकांची जी स्थिति असते त्यापेक्षा वेगळी परिस्थिती इंडोचायना येथील शेतकऱ्यांची मुळीच नव्हती ! हा शेतकरी गरीबीने वेढलेला, कर्जाखाली दडपलेला आणि अर्धपोटी अवस्थेत जीवन कंठणारा असाच होता.

लोककल्याणाची कामें या देशात होत नसत असे नाही. अशा कामांमध्ये तेथील मजूर व कामगार वर्गच जरी वापरला जात असला तरी त्यामुळे परिस्थितीत किंवा कामगारवर्गाच्या आर्थिक मिळकतीत वाढ कधीच झालेली नव्हती ! कारण त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन अत्यंत अल्प वेतनावर त्यांना राबवून घेतलें जात असे. त्यांच्या माथ्यावर फरेंच साम्राज्याचे पाळे फिरत होते. पारतंत्र्याच्या काळी भारताला जसा ब्रिटिश साम्राज्याचा अनुभव आलेला होता त्यापेक्षा

कुठल्याही बाबतीत निराळा अनुभव इंडोचायनाच्या लोकांना फ्रेंच साम्राज्याचा नव्हता !

या देशाची जास्तीत जास्त लोकसंख्या टोकिन आणि उत्तर आन्नम येथे रेड नदीच्या काठावर एकवटलेली होती. वर्षातून भाताची दोन पिके निघत असूनही या देशाच्या कपाळीचा दुष्काळ हटत नव्हता. दक्षिणेकडील कोचिनचायना या कमी लोकवस्तीच्या आणि त्यातल्या त्यात सुपीक प्रदेशावर उत्तर व्हिएतनामी लोकांना अन्नासाठी अवलंबून राहावे लागत असे ! जगातील इतर वसाहतीप्रमाणेच येथेही कच्चा मालच देशाबाहेर पाठविण्याचे सूत्र फरान्सने अवलंबिलेले होते. त्यामुळे कारखानदारीची वाढ येथे होऊ शकत नव्हती आणि कारखानदारीच्या वाढीच्या अभावी देशाचे राहणीमान सुधारू शकत नव्हते !

थोडक्यात म्हणजे फरेंच साम्राज्यवाद्यांनी इंडोचायना हा देश म्हणजे कच्चा माल फ्रान्सला पाठविण्याचे एक केंद्रच मानलेले होते. तसेच फरान्सच्या पक्क्या मालाची ही एक बाजारपेठ एवढ्याच दृष्टीनें ते या देशाकडे पाहात होते.

आता टोकिन, आन्नम आणि दक्षिणेकडील कोचिनचायना यांचा मिळून जो एक चिंचोळा भाग बनलेला आहे त्याला व्हिएतनाम या नावाने ओळखलें जात होते. या व्हिएतनामच्या पूर्वेकडे समुद्र, उत्तरेकडे चीन, दक्षिणेकडे मलाया, सुमात्रासारखी बेटे आणि पश्चिमेकडे व्हिएतनामला लागूनच सयाम, लाओस आणि कंबोडिया, अशी व्हिएतनामची चतु:सीमा आहे.

कंबोडिया आणि लाओसच्या राज्यकर्त्यांनी एकोणिसाव्या शतकात फ्रान्सचे आधिपत्य काही बाबतीत मान्य केले होते. या पाठीमागील त्यांचा उद्देश व्हिएतनाम आणि सयाम यांच्याकडून आपल्या प्रदेशावर अतिक्रमण होऊ नये हा होता. याउलट व्हिएतनामच्या लोकांनी मात्र फ्रान्सची सत्ता पूर्णांशाने कधीच मान्य केलेली नव्हती. याचे कारणही उघड होते. ते असे की व्हिएतनामी जनता हजारो वर्षांपासून आपल्या राष्ट्रीयत्वाच्या रक्षणासाठी चिनी लोकांशी लढा देत आलेली होती. त्या जनतेचा राष्ट्रवाद जागृत होता. चीनपासूनच

व्हिएतनामी लोकांनी सुधारणावाद घेतला आणि नंतर क्रांतिवादही घेतला.

इ. स. १९०५ मध्ये जपानी लोकांनी रशियावर विजय मिळविला. या विजयामुळे व्हिएतनामी लोकांचे मनोधैर्य वाढले. आणि याबाबतीत त्यांनी जपानला आपल्या भवितव्याचा आदर्श मानण्यास सुरुवात केली. व्हिएतनाम रेस्टोरेशन लीग नावाची एक संस्थाही त्यांनी स्थापन केली. इकडे फ्रान्समध्ये शिक्षण घेतलेले जे व्हिएतनामी होते, त्यांच्या मनात फ्रान्सच्या लोकशाहीची भावना रुजलेली होती आणि फ्रेंच राज्यक्रांतीचाही या लोकांनी अभ्यास केलेला होता. तसेच फ्रान्समध्ये गेलेल्या काही व्हिएतनामी कार्यकर्त्यांनी आणि विद्यार्थ्यांनी तेथील डाव्या राजकीय पक्षाशी संबंध प्रस्थापित केले.

इ. स. १९२० मध्ये कॅन्टन हे व्हिएतनामी राष्ट्रवाद्यांच्या हालचालींचे केंद्र बनले. त्याचवेळी हो चि मिन्ह नावाच्या एका तरुण व्हिएतनामी ध्येयवाद्याने ‘ व्हिएतनाम रेव्होल्युशनरी यूथ लीग ’ या संस्थेची स्थापना केली. आणि १९३० साली या तरुणाने हाँगकाँग येथे इंडोचायनाच्या कम्युनिस्ट पार्टीच्या स्थापनेचे आपल्या अध्यक्षीय भाषणाने शिंग फुंकले ! हो चि मिन्ह यांच्या पार्टीला खूप मोठ्या प्रमाणात बुद्धिवादी वर्गाकडून प्रतिसाद मिळाला. कारण फ्रान्सच्या साम्राज्यवादाविरुद्ध या पार्टीत प्रगट झालेली लढाऊ वृत्ति हे त्या पार्टीच्या यशाचे महत्त्वाचे अंग होते !

मध्यंतरी ‘व्हिएतनाम नॅशनालिस्ट पार्टी’ या नावाची एक संघटना टोकिनमध्ये निर्माण झालेली होती. १९३०–३१ हे साल इंडोचायनाच्या इतिहासात फार धामधुमीचे गेले. राष्ट्रवादी आणि कम्युनिस्ट चळवळींनी या वर्षात विशेष जोर धरला होता. फ्रेंच साम्राज्याविरुद्ध या चळवळी फोफावू लागल्या होत्या आणि फ्रेंच राज्यसत्ता आणि फ्रेंच शासन त्या वृत्ति दडपण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होते. या वर्षी हो चि मिन्ह यांनाही हाँगकाँगमध्ये अटक झाली. परंतु लवकरच त्यांची तेथून सुटकाही झाली. याच सुमारास हो चि मिन्ह यांनी राजकारणातून आपले अंग काढून घेतले आणि त्यानंतरच्या काही

दिवसातच 'हो चि मिन्ह हे मृत्यू पावले.' अशा प्रकारची बातमी चहुकडे झळकली.

त्या अस्वस्थतेच्या काळात तुलनेने पाहता टोकिन आणि आन्नम हे दोन प्रदेश शांत होते. आणि व्हिएतनामी राजकीय चळवळीचे केंद्र सायगाव येथे बदलले होते. सायगाव हे कोचिनचायनाची राजधानी असून तेथे वृत्तपत्रांना आणि राजकीय चळवळींना बरेच स्वातंत्र्य होते. याच सुमारास ट्रान व्हॅन गिऊ (Tran Van Giau) नावाचा एक तरुण रशियाहून आला होता. हा स्टालिनप्रणीत कम्युनिझमचा प्रवक्ता समजला जात होता. तसेच टा थू टाऊ (Ta Thu Tau) नावाचा एक तरुण कार्यकर्ता फ्रान्समधून १९३२ साली व्हिएतनाम येथे आला होता. तो ट्रॉटस्की यांच्या विचारप्रणालीचा होता. सायगाव येथे निवडणुकीच्या दृष्टीने या लोकांनी आपल्या कार्यास प्रारंभ केला. अगोदर सायगाव येथील म्युनिसिपल कौन्सिलच्या निवडणुकीचे क्षेत्र या तरुणांनी निवडले होते.

ही झाली व्हिएतनामच्या दक्षिणेकडील त्या वेळची राजकीय परिस्थिती. याच वेळी व्हिएतनामच्या उत्तरेकडे काय चाललेले होते ? उत्तरेकडे कम्युनिस्टांनी हळू हळू आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली होती. या कम्युनिस्टांनी आपले संबंध चीन आणि लाओसशी प्रस्थापित केले होते.

या वर्षात युरोपमधील राजकीय परिस्थिति अशी होती की तेथील कम्युनिस्टांनी फॅसिझमविरुद्ध आपला पाठिंबा इतर पक्षांना दिलेला होता. आणि फ्रान्समध्ये पॉप्युलर फ्रंटचे सरकार अधिकारावर आले होते. फ्रान्समधील या नव्या सरकारने व्हिएतनाममधील कम्युनिस्ट आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांना सुधारणाविषयक बरीच आश्वासने दिली. परंतु हा आशावाद फसवा होता हे या राजकर्त्यांच्या लक्षात येण्यास फारसा वेळ लागला नाही. त्यामधील ट्रॉटस्कीपंथाच्या कार्यर्त्यांनी पॉप्युलर फ्रंटच्या सरकारशी सहकार्य करण्याचे नाकारले आणि सायगावमध्ये स्वतंत्र निवडणूक लढवून विजय संपादन केला. हे वर्ष म्हणजे १९३९. युरोपातील राजकीय धामधुमीचे वर्ष. पॉप्यु-

लर फ्रंटचा त्या वर्षी फ्रान्समध्ये पाडाव झाला आणि त्याचाच परिणाम इकडे इंडोचायनावरही लगेच दिसून आला.

आणि याच वर्षीच्या सप्टेम्बरमध्ये युरोपमध्ये दुसऱ्या जागतिक युद्धाला तोंड फुटले. फ्रेंच कम्युनिस्ट पार्टीने या युद्धाला विरोध दर्शविला. फ्रेंच सरकारने या पार्टीवर फ्रान्समध्ये बंधने घातली आणि इंडोचायना येथेही कम्युनिस्ट पार्टी बेकायदेशीर ठरविली. फ्रेंच वसाहतीच्या अधिकाऱ्यांनी इंडोचायना येथील कम्युनिस्ट आणि ट्रॉट-स्काइट कार्यकर्त्यांची धरपकड केली आणि त्यांना तुरुंगात डांबून ठेवले.

जागतिक युद्ध सुरू झाले तेव्हा इंडोचायनामध्ये जवळ जवळ चाळीस हजार फ्रेंच नागरिक होते. हे फ्रेंच बहुतेककरून शासन, लष्कर, व्यापार आणि इतर आर्थिक व्यवहारात आघाडीवर काम करणाऱ्यांपैकीच होते. या लोकांची परिस्थिति इंडोचायनामध्ये अत्यंत बिकट झाली होती. इंडोचायनाच्या लोकसंख्येमध्ये ते अल्प-संख्य होते आणि चीनमधील जापानी लष्करांच्या तुकड्यांचे इंडो-चायनावर आक्रमण करण्याचे हेतु लपून राहिलेले नव्हते ! कित्येक राष्ट्रवादी व्हिएतनामी तुरुंगात होते. या सर्व परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी फ्रेंचांनी अनेक खटपटी–लटपटी करून पाहिल्या. इंडो-चायनाच्या सर्व लोकांना जपानविरुद्ध उभे करण्याचा एक प्रयत्न त्यामध्ये प्रमुख होता. या धोरणाच्या मुळाशी फ्रेंचांचा, जपानविरुद्ध इंडोचायनाशी संयुक्त आघाडी उघण्याचा बेत होता. परंतु त्यातही त्यांना यश आले नाही.

१९४० पासून १९४५ पर्यन्त जपानने इंडोचायनावर आपला प्रभाव बराच वाढविला होता. एकीकडून फ्रान्स आणि दुसरीकडून जपान यांनी आता इंडोचायनाला चांगलेच वेढले होते. आपापली राजकीय आणि त्याबरोबर इतर सर्व सत्ता ते प्रस्थापित करण्याच्या मार्गावर होते.

यावेळी हो चि मिन्ह याचा पुन्हा उदय झाला. त्याची कल्पना अशी की या युद्धाच्या काळात जपान आणि फ्रान्स यांची पकड इंडो-

चायनावर राहणे शक्य नाही. ही सत्ता कोलमडेल आणि मग व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडियाच्या लोकांना सत्ता हस्तगत करणे सहज शक्य होईल. रशियन क्रांतिवाद्यांनी १९१७ साली रशियामध्ये अशीच सत्ता हस्तगत केली.

मे, १९४१ मध्ये त्याने एक कॉन्फरन्स बोलाविली. या कॉन्फरन्समध्ये कम्युनिस्टही आपल्या इतर डाव्या पक्षासह सामील झाले. या सर्वांनी मिळून एका संघटनेची संस्थापना केली. तिचं नाव ' व्हिएत मिन्ह ' असं होतं. या संघटनेचे ध्येय, ज्यावेळी जपान आणि फ्रान्स यांची व्हिएतनाममधील सत्ता कोलमडेल तेव्हा, सत्ता हाती घेणं हे होतं. व्हो नग्युयेन (Vo Ngwyen) या आघाडीवरील कम्युनिस्ट नेत्याकडे संघटना आणि लष्कर जमविण्याची कामगिरी सोपविण्यात आली. प्रतिकार कसा करावा, क्रांति करण्यापर्यन्त परिस्थिति कशी आणावी, प्रत्यक्ष क्रांति कशी करावी या गोष्टींचे पद्धतशीर शिक्षण घेण्यासाठी व्हो नग्युयेन माओकडे गेला. व्हो चि मिन्ह याने देशातच लष्करी आणि राजकीय संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने चँग कै शॅक तर्फे अमेरिकेची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. अमेरिका त्या वेळी युद्धात गुंतलेली होती.

ज्यावेळी जपानविरोधी शक्तींच्या हालचाली वाढीला लागल्या तेव्हा चँग कै शेक याने इंडोचायनामधील राष्ट्रवादी संघटनेला हाताशी धरले. ही संघटना ' डाँग मिन्ह होई ' या नावाने ओळखली जात होती. या संघटनेने देशाबाहेर आपले सरकार स्थापावे व चीनशी सतत संपर्क राखावा असे ठरले होते. व्हिएत मिन्ह संघटना मात्र ' डाँग मिन्ह होई ' पासून दूर ठेवली गेली होती. परंतु यावेळी हो चि मिन्ह याचे वजन एवढे वाढले होते की त्याला प्रांतिक सरकारमध्ये पाचारण करण्यात आले होते. हो चि मिन्ह यानें या आमंत्रणाचा स्वीकार केला. परिस्थितीला कसे काय वळण लावता येईल व व्हिएत मिन्ह संघटनेचा समर्पक उपयोग कसा करून घेता येईल हे पाहणे एवढाच त्यांचा उद्देश होता.

हो चि मिन्ह याला या कार्यात चांगलेच यश मिळाले. सबंध

व्हिएतनाममध्ये या चळवळीने, प्रांतिक सरकारने आणि व्हिएत मिन्हने चांगलाच जम बसविला. आणि अशा रीतीने अल्पावधीतच ही संघटना देशातील एकमेव प्रातिनिधिक संघटना म्हणून ओळखली जाऊ लागली.

१६ ऑगस्ट १९४५, म्हणजे जपानने शरणागती पत्करली त्यानंतर दोन दिवसांनी हो चि मिन्ह याने सबंध देशाला एकत्र येण्यासाठी हाक दिली. आणि सत्ता हस्तगत करून व्हिएतनामचे स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी आवाहन केले. या आवाहनाला व्हिएत मिन्हच्या झेंड्याखाली साऱ्या जनतेने प्रचंड बहुमताने साद दिला. खेड्यात, शहरात, दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत सर्व ठिकाणाहून स्वातंत्र्याच्या भावनेची ललकारी दुमदुमून उठली.

त्यानंतर १७ दिवसात, म्हणजे २ सप्टेंबर १९४५ रोजी लोकसत्ताक व्हिएतनामची घोषणा केली गेली. हो चि मिन्ह स्वतंत्र व्हिएतनामचे अध्यक्ष झाले. बादशाह बाओ दाय ( Bao Dai ) यांनी सत्तेचा त्याग केला. स्वतंत्र लोकसत्ताक राज्याला मान्यता देऊन आपली सर्व सत्ता या लोकसत्ताकाच्या अध्यक्षांना सुपूर्द करून टाकली.

त्याच दिवशी अध्यक्ष हो चि मिन्ह यांनी नभोवाणीवरून साऱ्या जगाला व्हिएतनामचे स्वातंत्र्य घोषित केले. जगातील सर्व राष्ट्रांना त्यांनी व्हिएतनामला स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखण्याची विनंती केली.

परंतु हो चि मिन्ह यांना हा विजय फार काळ उपभोगता आला नाही. एक स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून जगण्याचा अधिकार हातात येण्यापूर्वीच व्हिएतनामच्या स्वातंत्र्याचा बळी पडला. जागतिक युद्ध संपल्यानंतर बड्या राष्ट्रांमध्ये सत्तेचा समतोल राखण्यासाठी जी रस्सीखेच सुरू झाली, आणि जे नवे आर्थिक प्रश्न निर्माण झाले त्यामध्ये व्हिएतनामच्या स्वातंत्र्याची अक्षरशः रस्सीखेच आणि कुतरओढ सुरू झाली.

व्हो चि मिन्ह या तरुणाचे स्वातंत्र्यप्राप्तीचे स्वप्न त्याच्या वयाच्या तिशीनंतर असे अर्धवट खरे ठरले ! हे स्वप्न संपूर्णपणे खरे

# इंडोचायना



होण्यासाठी त्याला आपल्या आयुष्याचा केवढा प्रवास करावा लागेल हे सत्य अजून भवितव्यातच लपलेले आहे.

व्हिएतनामचे पहिले लोकसत्ताक, ज्याने उत्तरेकडे चीनच्य सरहद्दीपासून ते थेट दक्षिणेकडे कामाऊ पॉइंट ( Camau Point ) पर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली होती. असे हे लोकसत्ताक राज्य अत्यंत अल्पजीवी ठरले. सायगावमध्ये तर त्याची सत्ता फक्त तीन आठवडेच टिकली !

आता हे असे कसे झाले ? आणि का झाले याचा शोध घ्यायचा असेल तर आपणाला जगातील बड्या राष्ट्रांच्या शक्ति आणि त्यांचे हेतु यांचा अभ्यास केला पाहिजे ! ही राष्ट्रे यावेळी युरोप आणि एशियामध्ये पसरलेल्या दुसऱ्या महायुद्धाला गुंडाळण्याच्या कार्यात गुंतलेली होती. त्याच सुमारास सोविएत रशिया हा युरोपात एक बलशाली राष्ट्र म्हणून उदयास आला होता. सायबेरियाकडून उत्तर एशियामध्ये देखील रशियाचा प्रभाव पडू लागलेला होता. अमेरिका तर जगातील पहिल्या दर्जाचे राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले होते. त्याचे विमान आणि नाविकदल हे सर्व जगावर प्रभाव पाडण्याइतके प्रबळ होते. ब्रिटन मात्र या महायुद्धात आपली पूर्वीची शक्ति गमावून बसलेले एक राष्ट्र म्हणून शिल्लक राहिलेले होते !

इ. स. १९४६ च्या शेवटी व्हिएतनाम लोकसत्ताक राज्य आणि फ्रेंच सरकार यांच्यामध्ये वाटाघाटींचे एक सूत्रच चालू झालेले होते. या वाटाघाटींमधून दोघांच्याही दृष्टीने सोयीचा असा एखादा मध्यबिंदु सापडावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु असा मध्यबिंदु त्यांच्या दृष्टिपथात आला नाही. ६ मार्च रोजी ज्या एका करारावर सह्या झालेल्या होत्या त्या करारानुसार फ्रेंच सरकारने व्हिएतनाम लोकसत्ताक राज्याला एक स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता दिली होती. त्याचे सरकार, त्याची लोकसभा, त्याचे लष्कर आणि त्याचा अर्थव्यवहार या गोष्टी सर्वस्वी व्हिएतनामच्या लोकसत्ताक राज्याच्या पूर्ण अख्त्यारीतील होत्या; परंतु इंडोचायनाच्या संघराज्याच्या उरलेल्या बाबी फ्रेंच युनियनच्या अधिकारात होत्या. प्रथमतः हा करार

बराच गोंडस वाटला असला तरी पाठीमागून अनेक विवाद्य मुद्दे निर्माण होऊ लागले आणि त्यातून पेचप्रसंग निर्माण होत गेले. विशेषत: असे विवाद्य मुद्दे टोकिन, आन्नम आणि कोचिनचायना यांच्या बाबतीत उपस्थित झाले. टोकिन आणि आन्नम यांना नेहमीच एका रक्षणकर्त्याचा दर्जा मिळालेला होता. आणि कोचिनचायना ही तर बोलून चालून कायदेशीर रीत्याच फ्रेंचांची वसाहत होती. म्हणून फ्रान्स या प्रदेशाचा व्हिएतनाम संघराज्यात समावेश करण्यास नाराज होता. आणि म्हणूनच कोचिनचायनाचा प्रश्न हा या दोघांमध्ये मुख्य अडथळ्याचाच प्रश्न होऊन बसला होता.

त्यानंतर स्वत: हो चि मिन्ह आणि फ्रेंच सरकार यांच्यामध्ये फ्रान्स येथेच बऱ्याच वाटाघाटी कोचिनचायना या प्रमुख विषयावरच झाल्या. पण प्रत्येक वेळी व्हिएत मिन्ह आणि फ्रेंच प्रवक्ते यांच्यामध्ये खटकेच उडत गेले. शिवाय कोचिनचायना येथे फ्रेंचांनी एक तात्पुरत्या सरकारची देखील स्थापना करून टाकली होती. असे करताना त्यांनी व्हिएतनाम लोकसत्ताकाच्या नेत्यांशी अगोदर कसलीही सल्ला मसलत केली नव्हती. तसे करणे मार्चमधील करारानुसार अत्यंत आवश्यक होते. म्हणून ही घटना तर केवळ वाटाघाटींचा मार्ग बंद करणारीच नव्हे तर एकमेकांच्या मनात एकमेकांविषयी द्वेषभावना निर्माण करण्यासही कारणीभूत होण्याची भीति निर्माण झाली. हो चि मिन्ह नंतर सप्टेंबर अखेरपर्यंत फ्रान्समध्ये राहिले. कारण तेथे आणखी एका करारावर सही करण्याचे घाटत होते. तो करार अमलात आला असता तर ते एक प्रगतीकडे टाकलेले पाऊल ठरले असते. पण तेही घडले नाही आणि मध्यंतरीच्या काळात इंडोचायना येथील परिस्थिती आणखीच बिघडली. आणि फ्रेंच सरकारविरोधी वातावरण गरम झाले.

याची दु:खद परिणती २० नोव्हेंबर रोजी हायफाँग येथे शस्त्र-संघर्षात झाली. आणि पुढे बरोबर एक महिन्याने, म्हणजे १९ डिसेंबर रोजी अंतर्गत बंडाळीला तोंड फुटले. व्हिएत मिन्ह फौजेने जवळ जवळ ३०,००० सैन्यानिशी फ्रेंच राज्यातील हनोईवर आक्रमण केले.

यावेळी देखील व्हिएत मिन्ह संघटेनाला उचलून धरणाऱ्यांमध्ये बहुसंख्य भरणा कम्युनिस्टांपेक्षा राष्ट्रवाद्यांचाच होता.

शेवटी मार्च १९४९ मध्ये फ्रेंचांनी, आन्नम, टोंकिन आणि कोचिनचायना यांचा संयुक्तरीत्या व्हिएतनाममध्ये समावेश करण्याचे मान्य केले. आणि बावो दाय यांच्या नेतृत्वाखाली त्यांना काही हद्दीपर्यंत स्वातंत्र्य देण्याचेही मान्य केले. बावो दाय हा आन्नमचा राजा होता हे मागे आलेले आहेच. त्याला या तीन प्रांतांचा नेता करून वर्षाअखेर तेथील विशिष्ट राजकीय सत्ता त्याच्या हाती सुपूर्त करण्यात आली. त्याच वेळी लाओस आणि कंबोडिया यांनाही फ्रेंच संघराज्याच्या कक्षेत विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य देण्यात आले. त्यानंतर १९५० मध्ये 'पाऊ परिषदे'च्या ठरावानुसार (Pau conference) या तीन प्रांतांना आणखी सत्ताविषयक आणि अर्थविषयक अधिकार देण्यात आले.

व्हिएत मिन्ह संघटनेमध्ये जे प्रखर राष्ट्रवादी म्हणून ओळखले जात होते ते सारे लोक असंतुष्ट होते. त्यामुळे अंतर्गत बंडाळी चालूच होती. जुलै १९५३ मध्ये मग आणखी सवलती देण्यात आल्या. वरील तीन प्रांतांना संपूर्ण स्वातंत्र्य आणि लाओसला संघसत्ताक स्टेट म्हणून ओळखला जाण्याचा करार झाला. तरी पण उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाम हे दुखणे कायमच होते. दक्षिण व्हिएतनाममध्ये फ्रेंचांच्या मदतीने जे सरकार अस्तित्वात होते त्याविरुद्ध उत्तर व्हिएतनाममधील हो चि मिन्ह यांची रस्सीखेच चालूच होती. आणि हे दुखणे दिवसेदिवस विकोपाला जात होते.

१९५१ मध्ये उत्तर विरुद्ध दक्षिण व्हिएतनाम यांच्यातील चकमकींचे जे स्वरूप होते त्यामध्ये बराच बदल घडून आलेला दिसत होता. कारण आता फ्रेंच हे उत्तर व्हिएतनामशी एकटे लढत नव्हते तर त्यांना अमेरिकेकडून भरपूर मदत मिळत होती. तसेच लोकसत्ताक व्हिएतनाम हा देखील एकाकी नव्हता तर उत्तरेकडून त्याचे मित्र-(कम्युनिस्ट चीन) त्याचे हात बळकट करीत होते! ऑगस्ट १९५० मध्ये लोकसत्ताक व्हिएतनामने आपल्या क्रांतीचा पाचवा वाढदिवस

मोठ्या समारंभाने पार पाडला. या निमित्ताने हो चि मिन्ह याने घोषणा केली की संपूर्ण इंडोचायनामधून फ्रेंचांनी ताबडतोब निघून जावे. त्याच भाषणात हो म्हणाला, 'जेव्हापासून युद्ध सुरू झालेलं आहे तेव्हापासून अमेरिकेने फ्रेंचांना मदत केलेली आहे. परंतु आता त्यांच्या मदतीची दिशा फ्रेंचांच्या बाजूने व्हिएतनामच्या रोखाने स्पष्ट झालेली आहे. त्यामुळे आता आमचा एक मुख्य प्रतिस्पर्धी म्हणजे फ्रेंच लुटारू आणि त्याचा मित्र, दुसरा प्रतिस्पर्धी म्हणजे अमेरिकन मध्यस्थ!'

जशी एकीकडे दक्षिण व्हिएतनामची बाजू व त्या रोखाने आपल्यावर येणाऱ्या शत्रूंचे विश्लेषण हो चि मिन्ह यांनी केले त्याच बरोबर त्यांची स्वतःची शक्ति आणि मार्ग कोणते आहेत हेही जगाला तेव्हाच स्पष्ट झाले. व्हिएतनाम लोकसत्ताक रेडिओवरून 'मार्शल स्टॉलिन चिरायू होवोत!' 'अध्यक्ष मोओ झिंदाबाद!' सारख्या घोषणा चालू होत्या, त्यावरून हो चि मिन्ह हे कोणाचे सहप्रवासी आहेत हे स्पष्ट होण्यास काहीही आडपडदा राहिला नव्हता!

मात्र दक्षिण व्हिएतामधील बाओ दाय सरकारपेक्षा लोक-सत्ताक व्हिएतनामच्या सरकारला तेथील शेतकरी वर्गाचा, तसेच बुद्धिजीवी वर्गाचाही चांगलाच पाठिंबा होता. त्या सरकारच्या योजना काय आहेत याची स्पष्ट कल्पना जरी येण्यासारखी नसली तरी अधून मधून तेथे ज्या घोषणा होत, त्यामधून जे विचार प्रगट होत त्यावरून त्यांच्या कार्याच्या दिशेचा अंदाज बांधता येण्यासारखा होता. तेथील सरकारने निरनिराळ्या संघटनांच्या मार्फत जी एक कार्य-शक्ति निर्माण केली होती तीमुळे सामान्य जनतेचा त्या सरकारवरील विश्वासही वाढीला लागला होता. 'युवक संघटना', 'स्त्री संघटना', 'कामगार संघटना' अशा त्या संघटना होत्या. त्यांचा दुवा प्रत्यक्ष सरकारच्या कार्यक्रमांशी जोडलेला असल्यामुळे सर्व लोकसत्ताकाला एक प्रकारची बळकटी आलेली होती.

परंतु फ्रेंच साम्राज्यवाद्यांच्या हालचालीदेखील थंडावलेल्या नव्हत्या. सायगावमध्ये भक्कम सरकार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न


हा फ्रेंच कार्यशक्तीचा प्रमुख भाग होता. बाओ दायच्या सरकार-मार्फत त्यांचे हे प्रयत्न चालूच होते. राजकीय दृष्ट्या भक्कम पाया-वर सरकारची स्थापना करणे हा त्यातील एक भाग झाला. फ्रेंच्यांच्या स्वप्नपूर्तीचा दुसरा भाग लष्करी आघाडी मजबूत करणे हा होता. त्यासाठी त्यांनी उत्तरेकड हॅनॉई–हायफॉंग, मध्य प्रांतात ह्यू आणि डॅनांग (Danang) आणि दक्षिणेकडे सायगाव – गो कॉंग (Go Cong) येथे लष्करी जमवाजमव आणि युद्धसाहित्याचा भरपूर साठा या गोष्टींकडे फ्रेंचांनी सारे लक्ष्य केंद्रित केले होते.

त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा व्हिएतनामच्या ग्रामीण भागां-कडे वळविला होता. ज्या ज्या भागातून व्हिएत मिन्ह संघटनेने आपली पाळेमुळे रुजविली होती ती उखडून काढण्याचा यामागे फ्रेंचांचा उद्देश उघड होता.

याच्याच बरोबरीने फ्रेंचांनी लुआंग प्रभांगमधून उत्तर लाओस-मध्येही लष्करी प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली होती. हा असाच लष्करी पट्टा उत्तर लाओसमधून उत्तर व्हिएतनामकडे पसरविण्यात आला होता. हे असे लष्करी दाबाचे कडे निर्माण करण्याच्या मुळाशी, उत्तर व्हिएतनामच्या व्हो चि मिन्ह सरकारला शह देणे, कम्युनिस्ट चीनच्या दक्षिणेकडील हालचालींवर निर्बंध आणणे आणि उत्तर व्हिएतनाममध्ये व्हिएत मिन्हच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे, हा उद्देश होता.

या साऱ्या हालचालींचा निकष दिएन बिएन फूच्या युद्धात लागणार होता आणि तसा तो लागला. या लष्करी डावपेचांची रचना जनरल गियाप यांनी केली होती. १९५३ च्या हिवाळ्यात जनरल गियाप आणि त्याच्या सहकाऱ्यांमध्ये या गोष्टी शिजल्या आणि तेव्हाच कार्यवाहीतही आल्या.

या लष्करी कटाची रचना अशी होती की शत्रूला दिएन-बिएन फू मध्ये एकत्र जमण्याची संधी द्यावी. दिएन बिएन फू हे ठिकाण म्हणजे चीन, लाओस आणि उत्तर व्हिएतनाम यांच्या मेचक्यात होते. तेथे शत्रूची जमवाजमव झाली की चहूकडून हे ठिकाण घेरून घेऊन


द. व्हिएटनाम
बिन्ह डिन्ह
क्वी न्हीन
बीएन होआ
सायगांव
वीलग
लाँग क्झुयेन

शत्रूची रसद आणि कुमक तोडावी. या गोष्टी ठरविल्यानुसार त्यांनी अमलात आणल्या होत्या. त्यांची ही योजना इतकी यशस्वी झाली होती की जेव्हा ४ मे, १९५४ रोजी इंडोचायनाचा प्रश्न सोडविण्यासाठी जिनेव्हा कॉन्फरन्स भरली होती त्यावेळी जवळ जवळ उत्तर, मध्य, आणि दक्षिण व्हिएतनामवर पीपल्स आर्मीचा ताबा होता.

दिएन बिएन फू सपशेल पडले ! १२००० फ्रेंच संरक्षकांना दिएन बिएन फू वाचविण्यात यश लाभले नाही. कित्येक सैनिक मेले, हजारो जखमी झाले, अगणित भूमीगत होऊन डांबले गेले आणि ज्या अमेरिकेने या लोकांना आणि फ्रेंचांना रसद, लष्करी साहित्य आणि अमेरिकन डॉलर्स पुरविले होते, ती अमेरिका व्हिएतनाममध्ये जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर, या सैनिकांनी दाखविलेल्या शौर्याचे पोवाडे प्रसिद्ध करीत होती ! मुक्त जगाचे रक्षक म्हणून त्यांचा जयनाद करीत होती !

याच वेळी जिनेव्हा येथे भरलेल्या परिषदेने थोडी प्रगती केली होती ! अमेरिकेचे धुरंधर परराष्ट्र प्रवक्ते या परिषदेहून अमेरिकेला जाण्याच्या घाईत होते. कारण काही दिवसापूर्वी यांनी कम्युनिस्टांना दिलेली धमकी (Massive retaliation) दिएन बिएन फू च्या पाडावामुळे फुसकी ठरलेली होती.

प्रत्यक्ष ज्यावेळी दिएन बिएन फूच्या लढाईत फ्रेंचांवर अत्यंत बिकट प्रसंग गुदरला तेव्हा त्यांनी इंग्रजांकडे धाव घेतली. मदतीसाठी! परंतु ब्रिटनकडून लगेच नकार आला. मग या याचकाने आपले तोंड अमेरिकेकडे वळविले, परंतु उघड उघड आणि एकट्याने अमेरिका या प्रसंगी फ्रेंचांशी हातमिळवणी करू शकत नव्हती !

दरम्यान कोलंबोमध्ये एक अगदी निराळी परिषद याच वेळी भरली होती. ही परिषद भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, सिलोन आणि पाकिस्तान या देशांच्या पंतप्रधानांमध्ये भरली होती. ही परिषद भरण्यापूर्वी तिचे नगारे बडविण्यात आले नव्हते की या देशांनी आपापल्या ध्वजांचा फडफडाटही येथे केला नव्हता ! इतकेच नव्हे तर परिषद भरली तेव्हा त्या अगोदर तिच्या कार्यक्रमांचा अजेंडाही तयार

करण्यात आलेला नव्हता ! पाच आशियाई राष्ट्रांचे हे पाच नेते चार दिवस एकत्र आले, बदललेल्या जागतिक परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला आणि या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या धोक्यांच्या शक्यतेचाही विचार केला. या नेत्यांनी इंडोचायनात तावडतोब युद्धबंदी व्हावी अशी शिफारस केली. जे प्रत्यक्षपणे या युद्धाशी निगडित असतील त्यांनी एकत्र येऊन चर्चा करावी आणि युद्धबंदीचा निर्णय द्यावा, तसेच फ्रान्सने इंडोचायनाचे स्वातंत्र्य घोषित करावे अशीही शिफारस केली गेली. आणखी या परिषदेने मॉरोक्को, ट्युनिशिया यांच्या सार्वभौम राष्ट्रीयत्वाला मान्यता दिली जावी याविषयीही जोरदार शिफारस केली. तसेच तिने लोकशाही राज्यपद्धतीवर आणि विचारसरणीवर आपला विश्वास व्यक्त केला. एवढेच नव्हे तर अशीही घोषणा केली की त्यांच्या अंतर्गत प्रश्नात कोणत्याही बाह्य शक्तींनी ढवळाढवळ केलेली सहन केली जाणार नाही.

हा आशियाचा आवाज होता. युरोपने बहुतांशाने या आवाजाला अनुकूल साद दिली. अमेरिकेने मात्र बाओ दाय, सिग्मन ऱ्ही आणि चँग कै शेक यांनाच आशियाच्या लोकशाहीचे आधारस्तंभ मानले !

दिएन बिएन फू पडले आणि व्हिएत मिन्हांचा जय झाला. तरी पण दिएन बिएन फूच्या रक्षणार्थ जे फ्रेंच सैनिक प्राणपणाने लढले त्यांच्याविषयी सहानुभूति बाळगलीच पाहिजे. कारण या सैनिकांनी शौर्याच्या बाबतीत आपला उणेपणा कुठेही दिसू दिलेला नव्हता. जणू एखाद्या लहानशा बोगद्यात चहू बाजूंनी घेरलेल्या अवस्थेत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत देत जवळ जवळ चार हजार फ्रेंच सैनिकांनी आपले देह धारातीर्थी ठेवले होते. आणि आठ हजार सैनिक पकडले गेले होते.

या सैनिकांनी आपण मरण आणि शरणागति का पत्करली हे त्यांच्यापैकी कितीजणांना समजलेलं असेल ? आजही अगणित अमेरिकन सैनिक व्हिएतनाममध्ये प्राणपणाने लढा देत आहेत ! कोणाविरुद्ध ? कशासाठी ? याविषयीचे ज्ञान अजून धुक्यातच आहे !

फ्रान्सच्या पराभवाच्या मोबदल्यात त्याला तशी अनेकांकडून


सहानुभूती मिळाली तशीच ताकीदही मिळाली. ही ताकीद विशेषत: अमेरिकेकडून मिळाली हे लक्षात घ्यायला हवे. त्यावेळी 'टाईम' पत्राने लिहिले की, 'फ्रान्स ही एक मोठी शक्ति आहे अशी जी अमेरिकेने कल्पना करून घेतली होती ती खोटी ठरली म्हणून यापुढे अमेरिकेने स्वत:च्या जबाबदारीवरच येथून पुढे पाऊल टाकले पाहिजे. फ्रान्सपासून काही मदत होईल ही गोष्ट तर सोडूनच द्या. उलट फ्रान्स स्वत:चे तरी रक्षण करू शकेल का नाही याविषयी देखील आता शंका वाटू लागली आहे!'

स्वत:च्या निर्णयाविरुद्ध जाऊन फ्रान्सने अमेरिकेचे याबाबतीत ऐकले त्याचे हे इनाम ऐन पराभवाच्या वेळी फ्रान्सच्या पदरात पडले तेव्हा त्याला काय वाटले असेल याची कल्पना करता येईल!

शिवाय दिएन बिएन फू पडल्याने अमेरिकेची अवस्थाही मोठी दयनीय झालेली होती. ज्या डल्लसनी मोठ्या आढयतेनें आणि आत्मविश्वासाने विधान केले होते की, 'व्हिएतनाममध्ये घडणाऱ्या कम्युनिस्ट हालचालींचा संयुक्त कार्यवाही करून पुरेपूर सूड घेतला जाईल.' त्या डल्लससाहेबांचे हे शब्द तर दिएन बिएन फू च्या पाडावाने वाऱ्यावर विरलेच पण यापुढे आता कोणता पवित्रा घ्यावा याचाही अंदाज अमेरिकेला घेता आला नाही. कारण जिनेव्हाहून वॉशिंग्टनला परतताना डल्लस साहेबांनी पत्रकाराजवळ मुलाखत देतांना जे उद्गार काढले आहेत ते उद्गार, त्या वेळची अमेरिकेची मन:स्थिति व्यक्त करण्यास पुरेसे आहेत! ते म्हणाले होते: 'इंडोचायनामधील सध्याची परिस्थिती पाहता अमेरिकेने तेथे शस्त्रसहकार्य देणे आज योग्य वाटत नाही!'

या घटनेच्या काही दिवसांपूर्वी आयसेनहॉवर यांनी एका भाषणात इंडोचायनाला, 'बाटलीमध्ये पडलेल्या बुचाची' उपमा दिली होती. हे बूच काढले गेले की बाटलीमधील कम्युनिझम संबंध आग्नेय आशियात पसरेल असे ते म्हणाले होते. आणि त्याच दृष्टीने व्हिएतनाममध्ये दक्षता घेण्याच्या तयारीला ते लागलेले होते. पण या

# ३. व्हिएटनाम



मोठ्या लष्करी पाडावानंतर त्यांना कदाचित या बाटलीतले अर्धे बूच निघण्यावरच समाधान मानावे लागले असेल. कारण जिनेव्हा करारान्वये. व्हिएतनामची १७ अक्षांशांवर विभागणी होऊन तेथे युद्धबंदी अमलात आणली जावी अशी एक योजना होती. आणि दुसरी योजना म्हणजे त्या ठिकाणी दोन वर्षांत निवडणुका घेतल्या जाव्यात अशी होती.

डल्लस यांचा तर निर्धार असा होता की आग्नेय आशियात पसरू पाहणाऱ्या कम्युनिझमला आळा घालण्यासाठी ॲटम किंवा हायड्रोजन अथवा दोन्ही बॉम्बस्‌चा उपयोग केला जावा! आणि अमेरिकेची शक्ति काय आहे याची या निमित्ताने जगाला प्रचीति द्यावी! पण त्यांचे हे स्वप्न भंग पावले! त्यांच्या दोस्तांनी देखील त्यांना या साहसाच्या बाजूने सल्ला दिला नाही! आणि ब्रिटनने डल्लस यांची मुलाखत घेऊन त्यांच्या पुढे आपली योजना मांडली. ती योजना अशी :

चीनशी सलग असलेला व्हिएतनाम आणि लाओस यांना कम्युनिस्ट-पुरस्कृत अलिप्ततावादी समजले जावे, सयाम आणि मलाया यांना पाश्चिमात्य-पुरस्कृत अलिप्ततावादी आणि तेथील इतरांना तटस्थतावादी अलिप्त समजण्यात यावे.

ईडन यांची ही योजना भारताने संमत केली आणि ती चीनकडून मान्य करून घेण्याविषयी भारताने ईडन यांना आश्वासन दिले. तेव्हा भारत-चीन यांच्यात चांगला सलोखा होता. फ्रान्सला प्रथमतः ही योजना पसंत नव्हती. कारण या योजनेमध्ये खास ब्रिटिश डावपेच होते. फ्रेंचांना त्यांच्या जागेवरून हाकलून काढण्याचा डाव या योजनेत प्रतिबिंबित झाला आहे असे फ्रेंचांचे म्हणणे होते! डल्लस यांनी त्यांचे हे म्हणणे उचलून धरले आणि फ्रान्सशी स्वतंत्र बोलणी करून दिएन बिएन फू येथे अडचणीत सापडलेल्या फ्रान्सला मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. दक्षिण चीनवर अण्वस्त्रांचा मारा करून हा प्रश्न सोडविण्याचा डल्लस यांचा मानस होता. परंतु हा बेत पार पडू शकला नाही. याचे कारण फ्रेंच लोकमतच आता फ्रेंच

सरकारच्या इतके विरुद्ध होते की यापुढे असली काही कार्यवाही करणे शक्यच नव्हते !

शिवाय फ्रान्सला आणि ब्रिटनला एकत्र आणणारी आणखी एक घटना घडली, ती म्हणजे आशियातील सर्व तटस्थ राष्ट्रांनी डल्लस यांच्या अण्वस्त्रांच्या धमकीचा निषेध केला. त्यामुळे अर्थातच फ्रान्स आपोआपच अमेरिकेपासून दूर गेला.

या साऱ्या तटस्थ राष्ट्रांचा आवाज पंडित नेहरूंच्या मुखातून आवेशाने बाहेर पडला होता. २४ एप्रिल रोजी भारतीय लोकसभेत बोलताना नेहरूंनी वरील अमेरिकाविरोधी जोरदार निषेध व्यक्त केला होता. याच वेळी चौदा राष्ट्रांची परिषद जिनेव्हा येथे कोरियाच्या प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठी भरली होती.

लोकसभेत बोलताना नेहरूंनी इंडोचायनाचा प्रश्न जिनेव्हा कॉन्फरन्समध्ये—एक अत्यंत तातडीचा प्रश्न म्हणून—विचारात घेतला जावा असे सांगताना काही सूचनाही केल्या होत्या. व्हिएतनाम येथे युद्धबंदी ताबडतोब अंमलात आणली जावी, या प्रश्नाची राजकीय बाजू सोडविण्यासाठी या प्रश्नाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींनीच एकत्र बसून तो प्रश्न सोडवावा. म्हणजे फ्रान्स आणि त्याच्या बाजूचे प्रान्त एका बाजूने आणि व्हिएत मिन्ह दुसऱ्या बाजूने. या व्यतिरिक्त तिसरी शक्ति या ठिकाणी मुळीच असता उपयोगी नाही.

नेहरूंची ही योजना जिनेव्हा कॉन्फरन्समध्ये चर्चेला दिशा मिळण्याच्या दृष्टीने उपयुक्तच नव्हे तर पायाभूत ठरली. थोडे फेर फार होऊन बहुतेक राष्ट्रांनी पंडितजींची ही योजना त्यावेळी मान्य केली होती.

ही परिषद ८ मे रोजी जेव्हा सुरू झाली तेव्हाच पंडित नेहरू आणि व्ही. के. कृष्णमेनन यांनी जोरदार मध्यस्थी करून तिच्या निर्णयाची गाडी प्रवासासाठी योग्य रुळावर आणली. त्याबद्दल खरोखर या दोघांना धन्यवाद द्यायला हवेत असे उद्‌गार तेव्हा बऱ्याच राष्ट्रांनी काढले. आग्नेय आशियाच्या भवितव्याविषयी ज्या विधायक सूचना पंडितजींनी केल्या त्यांचे ब्रिटन, चीन आणि सोव्हिएट युनियन यांनी

स्वागत केले. फक्त अमेरिका आणि फ्रान्स यांना ते ठराव मान्य झाले नाहीत !

फ्रेंचांची अवस्था त्यावेळी फार विचित्र होती. एकीकडून ते अमेरिकेशी केलेल्या कराराला बांधलें गेलेले होते. नेव्हेरे प्लॅन नावाने ओळखल्या जाणाऱ्या करारान्वये त्यांनी अमेरिकेकडून अफाट लष्करी मदत उचललेली होती. इंडोचायनामध्ये कम्युनिस्टांशी मुकाबला करण्यासाठी ही मदत होती. दुसरीकडून त्यांना पत्कराव्या लागलेल्या पराभवाची भरपाई करण्याचेही त्यांच्या मनात होते. अशा रीतीने फ्रेंचांच्या दृष्टीने व्हिएतनाममधील राजकीय परिस्थिती लष्करी परिस्थितीइतकीच केविलवाणी झालेली होती. बाओ दाय यांना कम्युनिष्टांविरुद्ध आघाडी उभी करण्यात यश लाभलेले नव्हते, त्यांनी पूर्ण शक्तिनिशी प्रयत्न केलेला होता तरीही.

अशा परिस्थितीत जेव्हा जिनेव्हा परिषद सुरू झाली तेव्हा व्हिएतनाममध्ये सर्व शक्तिमान अशी संघटना फक्त लोकसत्ताक व्हिएतनामचे सरकारच होते. ( Democratic Republic of Vietnam ) या लोकसत्ताकाच्या अधिकारकक्षेत, तेव्हा म्हणजे जिनेव्हा परिषद सुरू झाली तेव्हा, उत्तर, मध्य आणि दक्षिणेकडील व्हिएतनामचा काही भाग देखील होता. याउलट बाओ दाय सरकारचे होते. सायगावमध्ये त्यावेळी सर्व अंदाधुंदी आणि गडबडघोटाळ्याचे वातावरण तयार झालेले होते. राजकीय, शासनविषयक आणि लष्करी दृष्टीने देखील तेथे सारे अस्थैर्य होते. अनेक पक्षोपपक्षांचे पोकही तेथे माजले होते. त्यातले बरेच पक्ष एकमेकांविरुद्ध लढत होते. कोणी कम्युनिस्टांविरुद्ध होते तर आणखी कोणी वसाहतवाद्याविरुद्ध होते.

काही अलिप्त राष्ट्रवादी आणि त्यांच्यासारखेच इतर थोडे मात्र अमेरिकन मदतीची याचना करीत होते. या बुडत्या जहाजाला तारण्याची शक्ति केवळ अमेरिकेतच आहे असा त्यांचा विश्वास होता !

ही परिस्थिति आणखी बिघडली तेव्हा फ्रेंच पंतप्रधान लॅनियल यांनी बाओ दायना फ्रेंच युनिअनखाली पूर्ण सत्ता देण्याचे ठरविले. यावेळी मात्र अमेरिकेला स्वस्थ बसणे शक्य झाले नाही. कारण

क्रमांक ६५७७० ता: ...

अमेरिकेने विचार केला की फ्रेंचांनी अशा रीतीने सत्ता बाओ दाय यांच्या हाती दिली आणि व्हिएतनामला मुक्त केले तर परिस्थिति अधिकच गंभीर होण्याचा धोका आहे ! हा विचार डल्लस यांचा होता ! त्यांच्या मते दक्षिण व्हिएतनामची अगोदरच खालावलेली परिस्थिति व्हिएतनामी राष्ट्रवाद्यांच्या हातात सोपविली तरी उत्तरे-कडचे जबरदस्त शास्ते हो चि मिन्ह यांच्या प्रभावाखाली दक्षिण व्हिएतनाम येण्यास वेळ लागणार नाही !

डल्लससाहेबांच्या मते या परिस्थितीतून सुटण्यासाठी फक्त एकच मार्ग मोकळा होता; तो म्हणजे स्वत: अमेरिकेने या परि-स्थितीत हस्तक्षेप करणे ! केवळ एवढेच नव्हे तर दक्षिण व्हिएत-नाममधील शास्ता म्हणून आपल्या एखाद्या बगलबच्च्याची निवड करणे आणि त्याच्याकरवी अमेरिकन फौजेनिशी कम्युनिस्टांचा प्रतिकार करणे.

हा अमेरिकेचा उमेदवार नगो घराण्यातून आलेला असून कॅथॉ-लिक पंथाचा होता. त्याने अमेरिकन लोकशाही राज्यपद्धतीचे शिक्षण घेतलेले व न्यू जर्सी येथील कॅथॉलिक कॉलेजमध्ये त्याचे शिक्षण झालेले होते. अमेरिकेचा हा विचार पक्का झाल्यावर त्यांनी फ्रेंचांना समज दिली की, 'तुमची सत्ता सुरक्षित राहावयाची असेल तर सध्याचे पंतप्रधान ब्रू लॉक् (Buu Loc) यांना बडतर्फ करण्याचा हुकूम बाओ दाय यांना देण्यास सांगा. आणि त्यांचे जागेवर नगो दिन दिएम (Ngo Dinh Diem) यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ति करा.'

जिनेव्हा परिषद थांबल्यानंतर म्हणजे दि. १७ जूनला वरील घडामोडी झाल्या ! या परिषदेचे शेवटचे अधिवेशन २१ जून रोजी व्हावयाचे होते ! अशा रीतीने बाओ दाय यांनी पुन्हा तिसऱ्यांदा सत्तांतर करून; खरे म्हणजे सत्तात्याग करूनच दिएम यांच्या हाती सत्ता दिली. दिएम यांनी लवकरच स्वत:ला अध्यक्ष, पंतप्रधान आणि संरक्षण मंत्रीपदाचा अभिषेक करून घेतला. प्रेसिडेंट आयसेन हॉवर यांनी दिएम यांना संपूर्ण लष्करी, आर्थिक आणि त्याबरोबर येणारे इतर सर्व प्रकारचे साह्य देण्याचे खासगीरीत्या आश्वासन दिले. या

आश्वासनाचे पत्र पुढे जिनेव्हा आणि मॅनिला परिषदेत प्रसिद्ध झाले आहे !

आपली राजनीति एकदा अशा पद्धतीने निश्चित केल्यानंतर मग अर्थातच अमेरिकेला जिनेव्हा परिषदेविषयी विशेष आस्था उरली नाही. इतकेच नव्हे तर डल्लेस यांनी एक झंझावाती, एकांगी भाषण करून या परिषदेतून स्वत:ला सोडवून घेतले आणि आपल्या मदतनिसाला नाममात्र परिषदेत बसविले. या मदतनिसाचे नाव बेडेल स्मिथ असे होते. आणि या परिषदेत ते अमेरिकेची बाजू मांडीत होते. अमेरिकेच्या या एकांगी आणि हेकांडचा विचारसरणीला त्रासून अँथनी ईडन यांनी एक ठराव आणला, ज्याला फ्रान्स, चीन आणि सोव्हिएत युनियन देखील चिकटून राहिले. एकदा या निर्णयावर गाडी आल्यानंतर मग फ्रान्सचे पंतप्रधान मेंडेस–फ्रान्स यांच्याकरवी व्हिएतनाममध्ये संपूर्ण युद्धबंदी करण्याच्या आज्ञा दिल्या गेल्या.

युद्धबंदी–रेषा कोणती असावी यावर देखील दोन्ही पक्षात आणि बडचा चौघात रणे माजली. परंतु शेवटी १७ अक्षांशावर ही रेषा निश्चित केली गेली. आणि जिनेव्हा परिषदेचे सूप वाजले.

आज व्हिएतनामची परिस्थिती काय आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच. दररोज वर्तमानपत्र उघडले की त्यामध्ये व्हिएतनाममध्ये चालू असलेल्या युद्धाचे वृत्त वाचावे लागते. व्हिएतनाम या राष्ट्राच्या कुंडलीत, त्याने स्वातंत्र्य घोषित केल्यापासून आज वीस वर्षे युद्धच लिहिले आहे. इतकेच नव्हे तर २१ जुलै १९५४ रोजी जिनेव्हा करार होऊन आणि युद्धबंदी–रेषा आखली जाऊन देखील आज एक तप होऊन गेले तरी तेथील युद्ध थांबलेले नाही ! दक्षिण व्हिएतनामची सर्व बाजू आज अमेरिकेच्या हातात आहे. जिनेव्हा परिषदेत असहकार दाखवून त्यांनी आपले हात मोकळे ठेवले ते निर्बंधपणे दक्षिण व्हिएतनामच्या बाजूने उभे राहता यावे याचसाठी. आणि हे सारे कशासाठी तर म्हणे, कम्युनिझमला आळा घालण्यासाठी ! हा, कम्युनिझमला आळा घालण्याचा शब्दप्रयोग मोठा

आकर्षक आहे. पण त्यावाटे निर्माण होणारी कृति मात्र भयंकर विनाशक आहे याचा आता साऱ्या जगाला अनुभव आलेला आहे.

पाकिस्तानला लष्करी मदत देण्यामागे उद्देश होता तो देखील कम्युनिझमला आळा घालण्याचाच. परंतु या मदतीची परिणति मात्र गेल्या वर्षी (१९६५) भारत–पाकमध्ये भयंकर युद्ध पेटण्यात झाली. त्यामध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले होते हे साऱ्या जगाने अशा नाही तशा तऱ्हेने मान्य केलेलेच आहे. युनोच्या निरीक्षकाच्या अहवालातदेखील ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. त्यावेळी पाकचे अमेरिकेने काय केले ? पाकला खुशाल आक्रमण करून दिले ते काय भारत हे कम्युनिस्ट राष्ट्र होते म्हणून की काय ? अमेरिकेच्या या राजकारणाचे धागेदोरे कुठे गुंतलेले आहेत, आणि त्या सर्वांचे मूळ कोणाच्या हातात आहे ? याची प्रचीति आता जगाला आलेली आहे ! ज्या चिनी कम्युनिझमला रोखून धरण्यासाठी अमेरिकेने पाकला शस्त्रसमृद्ध केले त्याच पाकनें अमेरिकेपेक्षाही चीनशी आपले संबंध अधिक जिव्हाळ्याचे प्रस्थापित केले आहेत. म्हणजे पारिजातकाचे झाड एकीच्या अंगणात आणि फुले दुसरीच्या अंगणात अशी ही परिस्थिति आहे. जी परिस्थिति अमेरिकेच्या राजकारणाचा परिणाम म्हणून भारत–पाक आणि चीन यांच्यामध्ये निर्माण झालेली आहे तशीच परिस्थिति तिकडे दक्षिण–उत्तर व्हिएतनाम आणि चीन यांच्यामध्ये निर्माण झालेली आहे.

आग्नेय आशियाचे स्वास्थ्य हे अमेरिकेच्या राजकीच दंडुकेशाहीमुळे नष्ट झालेले आहे ! आणि या राजकारणाचे मूळ डल्लस यांच्या विचारसरणीत आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीत होते.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारत देश सोडून जाताना जसे त्याचे विभाजन केले आणि भारतीय संस्थानिकांमध्ये देखील लाथाळी घडवून आणण्याचा कट रचलेला होताच, त्याचप्रमाणे तिकडे फ्रेंचांनी व्हिएतनाम सोडताना त्याच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनाचे तिरपागडे करून टाकलेले आहे !

व्हिएतनामचा प्रश्न हा काही अमेरिकेचा प्रश्न नाही किंवा

फ्रान्सचा प्रश्न नाही, हा प्रश्न आहे फक्त व्हिएतननामी जनतेचा आणि तो प्रश्न (DRV) 'डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ व्हिएतनाम' या राजकीय पक्षाने १९४५ साली व्हिएतनामचे स्वातंत्र्य घोषित करून सोडविला आहे. तो प्रश्न केव्हाच सुटलेला आहे. आता तेथे जो प्रश्न निर्माण झालेला दिसत आहे तो व्हिएतनामचा किंवा व्हिएतनामी जनतेचा प्रश्न नसून या जगातील वड्या राजकीय शक्तींचा आहे ! आशियातील राजकारणाचा तोल कसा असावा, हे या बड्या शक्तींपैकी ज्याने त्याने आपल्या मनाशी ठरविलेले आहे. आणि हा तोल प्रस्थापित करण्यासाठी कर्मभूमी म्हणून त्यांनी व्हिएतनामच्या भूमीची निवड केलेली आहे, यात तिळमात्रही शंका नाही.

व्हिएतनामची जनता ही एक आहे, व्हिएतनामचा सांस्कृतिक, सामाजिक आणि वांशिक इतिहासही एक आहे, असे असता आज तिथे दक्षिण विरुद्ध उत्तर हे जे चित्र प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे तो कशासाठी? या प्रश्नाला खरे म्हणजे उत्तर नाही, कारण हा प्रश्नच होऊ शकत नाही. पण आज अमेरिकेने हा प्रश्न निर्माण केला आहे आणि तिच्याजवळ या प्रश्नाचे उत्तर आहे ते म्हणजे कम्युनिझमला आळा घालणे ! आजच्या जगात हे उत्तर कोणाचेही समाधान करू शकणार नाही ! चँग कै शेकला आज दीड तपापासून हाताशी धरूनसुद्धा अमेरिकेला हे उत्तर सापडलेले नाही. यावरून काय तो बोध घ्यावा.

आज उत्तर–व्हिएतनाममधील हो चि मिन्ह यांची भूमिका जगाला जेवढी पटण्यासारखी आहे तेवढी दक्षिण व्हिएतनामच्या अमेरिकन–संरक्षित सरकारच्या प्रवक्त्याची नाही !

गेल्याच वर्षी एका मुलाखतीला उत्तर देताना हो चि मिन्ह यांनी जे उद्गार काढलेले आहेत ते खाली देत आहे. ते निःसंशय विचार करण्यासारखे आहेत :

आज हो चि मिन्ह यांच्यापुढे तातडीचे प्रश्न कोणते आहेत या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले की, 'व्हिएतनामचे एकीकरण लवकरात लवकर घडवून आणणे ही बाब आज फार महत्त्वाची आहे. जिनेव्हा

करारप्रमाणे देशात निवडणुका घेणे आवश्यक आहे. दक्षिण आणि उत्तर व्हिएतनाम हे एकमेकावाचून जगूच शकणार नाहीत. आम्ही एका जातीचे लोक आहोत. आमची भाषा एक आहे, आमची संस्कृति आणि जीवनाचा दृष्टिकोनही समान आहेत. मानवी हिताच्या आणि आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने आमचे एकीकरण ही महत्त्वाची बाब आहे.'

जिनेव्हा करारानुसार देशामध्ये १९५६ सालीच निवडणुका व्हावयास हव्या होत्या. पण त्या होऊ शकल्या नाहीत त्याबद्दल विचारता हो म्हणाले, ' जिनेव्हा परिषदेच्या अध्यक्षांना मी भेटलो होतो. त्यावेळी मी त्यांना आश्वासन दिलं होतं की कोणत्याही क्षणी निवडणुका घेण्याची आमची तयारी आहे. दक्षिण व्हिएतनामच्या प्रतिनिधींना या संदर्भात भेटून या निवडणुकांच्या व्यवस्थेविषयी चर्चा करण्याची आमची तयारी आहे. ही गोष्ट आम्ही आजवर अनेक वेळा घोषित केलेली आहे. इतकेच नव्हे तर दक्षिण आणि उत्तर व्हिएतनाममध्यें वैयक्तिक, आर्थिक आणि दळण-वळण विषयक सहकार्य असावे याविषयी दक्षिण व्हिएतनामच्या नेत्यांशी चर्चा करण्याची उत्सुकता आम्ही अनेक वेळा दाखविलेली आहे. परंतु प्रत्येक वेळी दक्षिणेकडून आम्हाला नकार मिळालेला आहे. आमची मात्र कोणत्याही क्षणी या पातळीवर येऊन चर्चा करण्याची तयारी आहे. आम्ही कुठल्याही बाबतीत केव्हाही बळाचा उपयोग करणार नाही. शांततेने आणि धीराने कामे करण्याचे बाळकडू आम्हाला मिळालेले आहे. ही झाली आमची बाजू. आता दक्षिण व्हिएतनामविषयी बोलायचं झालं तर तेथील सामान्य माणूस आमच्याच बाजूचा-विचारांचा आहे. कारण तो आमच्या रक्तामांसाशी संबंधित आहे. या काळात आम्हाला आमच्या आर्थिक प्रगतीकडे विशेष लक्ष पुरविलं पाहिजे. कारण आम्ही अजून तसे बरेच मागासलेले लोक आहोत. आताच तर कुठे आम्ही स्वतंत्र झालो आहोत. यापूर्वी आम्ही पारतंत्र्यात होतो. स्वातंत्र्यासाठी झगडत होतो. वसाहतवाद्याविरुद्ध झगडत होतो. त्यामुळे अंतर्गत बंडाळीला देखील आम्हाला तोंड द्यावे लागत होते. या साऱ्यांचा परिणाम म्हणजे आमच्या देशाचे अपरिमित

नुकसान होण्यात झाले, आमच्या कारखानदारीवर, आमच्या शेतीवर याचा परिणाम होणे अपरिहार्य होते. आणि तसा तो झालेला आहे परंतु आता खऱ्या स्वातंत्र्याचा आस्वाद घेण्यासाठी या साऱ्या आपत्तीमधून आम्हाला शक्य तितक्या त्वरेने बाहेर पडणे आवश्यक आहे. आणि तसा आमचा निर्धारही आहे. आमच्या हातून चुका होणारच नाहीत असे नाही; आम्ही लोकांचा सदुपदेश आणि चांगल्या सूचना ग्रहण करण्यासाठी सतत खुले आहोत.'

हे विचार व्हिएतनाम देशाच्या उत्तरेकडील नेत्याचे आहेत. दक्षिणेकडील नेत्याला स्वतःचे विचार नाहीत. त्याच्या बाजूने अमेरिका दररोज बोलत असतेच !

कृत्रिमपणे, केवळ दोन वर्षांसाठी आखली गेलेली युद्धबंदी-रेषा आज बारा वर्षे आहे तिथेच झोपून पडलेली आहे. निवडणुका नाहीत आणि एकीकरणही नाही. गेल्या वर्षी भारत--पाकमध्ये युद्ध उद्‌भवले तेव्हा युद्धबंदी होण्यासाठी युनोने जिवाचा आकांत केला. स्वतः यूनोचे सरचिटणीस ऊ थांट भारताला आणि पाकिस्तानला भेट देऊन गेले; पण आज १२ वर्षे व्हिएतनाम धगधगत आहे. तेथील एका संबंध पिढीचे भवितव्यच गोठून गेलेले आहे. रक्तपात, रण-धुमाळी आणि अस्थिरता हा त्या देशाचा जणू स्थायीभाव झालेला आहे. अशा परिस्थितीत यूनो काय करीत आहे ?

केवळ एका देशाच्या दादागिरीला या जगात आज बारा वर्षे कोणी समर्पक उत्तर देणारा प्रतिस्पर्धी मिळत नाही याचा अर्थ काय समजावा ? जगातील निःशस्त्र आणि छोट्या राष्ट्रांनी आपले भवितव्य निर्धास्त आहे हे कशाच्या जिवावर मानावे ?

व्हिएतनामचा अशा रीतीने चिघळलेला प्रश्न हे केवळ त्या देशाचेच दुर्दैव म्हणता येणार नाही. व्हिएतनामसारखे असंख्य देश या जगाच्या पाठीवर आज असे आहेत की, त्यांच्या देशाचे प्रश्न सोडविणे आज त्यांच्या हातात राहिलेले नाही ! ते देश सांस्कृतिक, ऐतिहासिक वांशिक आणि भौगोलिक दृष्टया स्वतंत्र आहेत पण त्यांचा वर्तमान काळ स्वतंत्र नाही आणि त्यांचा भविष्यकाळही स्वतंत्र नाही. जगातील

या बलाढ्य राष्ट्रांच्या आपसातील रस्सीखेचीत या छोट्या देशांच्या पोटातील आंतडी पिळवटली जात आहेत.

आज खरा इलाज हवा आहे तो यावर हवा आहे. जग भया-पासून मुक्त असावे हे पंडित नेहरूंचे स्वप्न होते त्याचा अर्थ येथे उलगडतो. तसेच त्यांच्या अलिप्ततेच्या धोरणाच्या मूल्याचा निकष येथे लागतो व त्या मूल्याची महती पटते.

भारताचे स्वातंत्र्य आणि पाकिस्तानची निर्मिती, जर्मनीचा प्रश्न, कोरिया, तिबेट, इस्त्राईल, क्यूबा, ऱ्होडेशिया आणि इंडोनेशिया या साऱ्यांचे प्रश्न जगापुढे आले त्या पाठीमागे कोणत्या शक्ति होत्या आणि आहेत, त्याच शक्तींनी व्हिएतनामचे भूत निर्माण करून ठेवलेले आहे. तेव्हा आज जगापुढे खरा प्रश्न आहे तो या बलाढ्य देशाजवळ असणाऱ्या आसुरी शक्तीपासून बचाव कसा करता येईल हा आहे !

आणि खरा धोका हा आहे की या बलाढ्य देशाजवळ आज इतरांना वाटण्यासाठी धान्यही आहे आणि शस्त्रास्त्रेही आहेत !

• • •

# तिबेट



# २

एकवीस मार्च १९५९ रोजी भारतीय रेडिओने बातमी सांगितली. तिचा आशय असा होता :

'ल्हासामध्ये चीन आणि तिबेट यांच्यात युद्धाला तोंड फुटले आहे. तिबेटी लोकांना आपल्या विचार आणि आचार पद्धतीत स्वातंत्र्य हवे आहे आणि चीन त्यांच्यावर कम्युनिझम लादू इच्छित आहे!'

हे घडण्यापूर्वी कित्येक आठवडे तिबेट आणि चीन यांच्यामध्ये धुसफुस चालू होती. चिनी लोक तिबेटमध्ये घुसून अनेक प्रकारच्या मागण्या तिबेटी लोकांवर लादीत होते. आणि अशा रीतीने तिबेटी लोकांच्या संथ जीवनामध्ये वादळाला सुरुवात झालेली होती.

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच चीन आणि तिबेट यांच्यामध्ये खटका उडाला होता. तो असा की तिबेटच्या दलाई लामा यांना चिनी सत्ताधाऱ्यांनी पेकिंग येथे ताबडतोब बोलाविले होते आणि दलाई लामा यांनी ते आमंत्रण धिक्कारले होते! त्यानंतर लगेच त्यांनी (लामांनी) ल्हासामधीलच चीनी अधिकारी यांना भेटावे असा पेकिंगहून हुकूम आला. हा हुकूम असा होता की, 'दलाई लामांनी, आपल्या बरोबर स्वतःचे शरीररक्षक आणू नयेत आणि इतर कुठ-

त्याही राजेशाही लवाजम्यानिशी चिनी आधिकाऱ्यांसमोर जाऊ नये. त्यांनी त्यांना एकट्यानेच भेटावे !' अर्थात् दलाई लामांनी पेकिंगचा हा आदेशही धुडकावून लावला. पण जरी तिबेटच्या नेत्याने हा अपमानास्पद आदेश धुडकावून लावला असला तरी, तिबेटी लोकांमध्ये या निमित्ताने चिनी सत्ताधाऱ्यांविषयी कमालीची चीड निर्माण झाली होती.

तिबेटी लोकांनी आपला हा राग प्रचंड प्रमाणामध्ये चीनविरुद्ध, कम्युनिझमविरुद्ध आणि चिनी राज्यकर्त्यांविरुद्ध निदर्शने करून व्यक्त केला. या निदर्शनांमधून तिबेटी लोकांचा विलक्षण निग्रह जसा व्यक्त झाला तसाच त्यांचे स्वातंत्र्यप्रेम आणि दलाई लामा यांच्यावरील त्यांची असीम निष्ठाही व्यक्त झाली. लाखोंच्या संख्येने तीव्र निदर्शने करून त्यांनी, दलाई लामा यांनी राजवाडा सोडू नये आणि त्यांना चिनी आधिकाऱ्यांना अटकही करता येऊ नये अशी परिस्थिती निर्माण केली !

दलाई लामा यांना पेकिंगला बोलावून नेण्यामागे कम्युनिस्ट चीनच्या राज्यकर्त्यांचा डाव असा होता की, एकदा का हा धर्मगुरु आणि तिबेटी लोकांचा नेता आपल्या हातात आला, की त्याला अटक करून ठेवून द्यायचे. आणि तसेच त्याचे इतर साथीदारही जखडून ठेवले म्हणजे तिबेटी लोकांतील धर्माचे वेड कमी होईल. असे झाले म्हणजे मग तिबेटमध्ये कम्युनिझमचा शिरकाव करणे सुलभ जाईल. यासाठी, दलाई लामांनी पेकिंगला जाण्यासाठी नकार दिला तेव्हा पेकिंग सरकारने ल्हासा येथे एक विमान सज्ज ठेवले होते. तेथील चिनी आधिकाऱ्याच्या भेटीला दलाई लामा गेले असते की पाचच मिनिटात त्यांना विमानात घालून पळविण्याची जय्यत तयारी झालेली होती.

सर्व तिबेटमध्ये क्रांतीचा उठाव होण्याला आणखीही एक कारण घडले. ते असे की, दलाई लामा यांना चिनी अधिकाऱ्यांनी ल्हासामध्ये एका सांस्कृतिक समारंभासाठी निमंत्रण दिले होते. परंतु त्यांनी योजिलेल्या व्यवस्थेमध्ये ऐन वेळी कसला तरी बिघाड झाला आणि हा

कार्यक्रम चिनी अधिकाऱ्यांनी रद्द केला आणि लामा यांना पुढच्या एका तारखेचे आमंत्रण दिले. या साऱ्या हालचालींमध्ये लामांना पळविण्याचा कट आहे ही गोष्ट ल्हासामध्ये कर्णोपकर्णी झाली. ह्यामुळे तेथील जनमत भयंकर खवळले. आणि बंडाला सुरुवात झाली.

ज्या तिबेटी जनरलने या बंडाचे नेतृत्व केले होते त्याच्या दिमतीला पंचवीस हजार खंबा टोळीवाले होते आणि या टोळीवाल्यांना तिबेटी देशभक्त, ल्हासामधून आणि तिबेटच्या इतरही भागांमधून येऊन मिळाले होते. परंतु या क्रांतिकारकांचा नक्की कार्यक्रम काय होता याची कल्पना येऊ शकली नाही. परंतु त्यांनी चिनी मुक्ति-सेनेवर भयंकर निकराचे हल्ले चढविले. ल्हासाजवळच ही मुक्तीसेना ठाण मांडून बसलेली होती.

परंतु मुळातच ही चकमक समान पातळीवर होऊ शकली नाही. तिबेटच्या देशभक्तांमध्ये स्वयंस्फूर्तीने पेटलेली क्रांतीची आग केवळ उत्तम योजकतेच्या अभावी अयशस्वी झाली. दुसरे म्हणजे या गरीब खंबा टोळीवाल्यांजवळ आणि देशाभिमानी राष्ट्रभक्तांजवळ शस्त्रास्त्रांचे बळ नव्हते. या उलट सर्व काही पक्के ठरवून आलेल्या चिनी मुक्तिसेनेजवळ सर्व काही सज्ज होते. या लाल सेनेनें टोळीवाल्यांना गवताप्रमाणे कापून काढले. या खंबा टोळीवाल्यांच्या साथीला सरासरी तेरा हजार तिबेटी साधू होते.

योग्य योजनेच्या आणि शस्त्रास्त्रांच्या अभावी हा उठाव अयशस्वी झाला.

२५ मार्चपर्यंत ल्हासामध्ये रणधुमाळी चालू होती. चिनी राज्य-कर्त्यांनी आपली फौज विपुल प्रमाणात आणून हे बंड आटोक्यात आणले. त्यावर ताबा मिळविला. परंतु तिबेटच्या इतर भागात हे युद्ध कित्येक दिवस चालू राहिले.

चिनी सैन्याला जी थोडी अडचण भासली ती केवळ हा प्रदेश नवीन होता, आणि तेथील पर्वत-दऱ्या-कपाऱ्यांचा त्यांना अनुभव नव्हता. शिवाय तिबेटी लोकांनी दळणवळणाची साधने बऱ्याच प्रमाणात

नष्ट करून टाकली असल्यामुळे त्याही बाबतीत सरशी होण्यात सेनेला अडथळे आले.

त्यानंतर तिबेटच्या वरिष्ठ मंडळाने लगेच एक सभा बोलावली. तीमध्ये त्यांनी जनतेने क्रांति चालू ठेवावी याबद्दल जनतेला आदेश दिला आणि चिनी राज्यकर्त्यांचा धिक्कार करून त्यांनी तिबेटची भूमि ताबडतोब सोडावी असा आदेश घोषित केला. तसेच चिनी फौजा ताबडतोब तिबेटमधून काढून घेण्यात याव्यात असाही या वरिष्ठ मंडळाने ठराव घोषित केला.

या वरिष्ठ मंडळाने तिबेटी नागरिकांना आश्वासन दिले की तिबेटवर झालेल्या अन्यायाला यूनोमध्ये आम्ही वाचा फोडू.

या वरिष्ठ मंडळाने शेवटची केलेली घोषणा जी जगातील साऱ्या लोकांनी ऐकिली ती अशी होती की, 'आम्ही तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी तिबेटी लोकांच्या शरिरातील शेवटचा थेंब रणांगणावर सांडेपर्यंत लढत राहू. परमेश्वर चिनी आक्रमकांना शासन केल्याशिवाय राहणार नाही !'

तिबेटमध्ये झालेल्या बंडाची बातमी जेव्हा जगभर पसरली तेव्हा चहूकडून दलाई लामांच्या अस्तित्वाबद्दल चर्चा होऊ लागली. खुद्द पेकिंग सरकारने देखील दलाई लामा यांचा ठावठिकाणा काढण्यासंबंधी भारत, नेपाळ आणि भूतानमधील आपल्या वकिलातींना आदेश दिले. पण बरेच दिवस त्यासंबंधी कसली बातमी बाहेर आली नाही. जगाला कळली नाही. जेव्हा पेकिंग सरकारला कळले की दलाई लामांचा शोध लागणे अशक्य आहे तेव्हा त्यांनी तिबेटचे वरिष्ठ मंडळ बरखास्त केले आणि नव्या मंडळाचे प्रमुख म्हणून पंचेन लामा यांची नियुक्ति केली. पंचेन लामा हे पेकिंग सरकारचे एक बाहुलेच होते. त्यांनी मोठ्या आनंदाने तिबेटची नामधारी सत्ता आपल्या हाती घेतली.

ज्यावेळी कम्युनिस्ट चीन आणि तिबेटी टोळीवाले यांच्यामध्ये युद्ध चालू होते तेव्हा दलाई लामा आपली आई, बहीण आणि दोघे

भाऊ यांना घेऊन तिबेटच्या बाहेर पडले. त्यांच्याबरोबर इतरही शंभर विश्वासू लोक होते.

ही यात्रा अत्यंत गुप्त ठेवली गेली होती. शेकडो टोळीवाले आणि तिबेटी लोक जिवाच्या कराराने दलाई लामा यांना तिबेटी हद्दीच्या बाहेर सुरक्षित रीतीने पोचविण्याची काळजी घेण्यात गुंतले होते. त्यांना कल्पना होती की, पेकिंग सरकारचे सैनिक, गुप्तहेर आणि हवाई छत्रीच्या साहाय्याने निरनिराळ्या ठिकाणी उतरलेले लष्करी लोक दलाई लामांच्या शोधार्थ आहेत. त्यामुळे अत्यंत जागरूकतेने काळजी घेणे फारच आवश्यक होते. अशा रीतीने चौदा रात्री आणि चौदा दिवस प्रवास केल्यानंतर कम्युनिस्टांच्या हातावर तुरी देऊन दलाई लामा तवांग नावाच्या एका खेड्यात येऊन दाखल झाले. हे खेडे भारतीय सरहद्दीतील एक आघाडीचे ठिकाण होते.

तेथे दलाईलामांनी आश्रय मागितला आणि त्यांना आश्रय देण्यात आला.

त्यानंतर काही दिवसांनी दलाई लामा तेजपूर येथे पोहोचले. तेथे त्यांनी बातमीदारांना मुलाखत दिली. आणि तिबेटमध्ये झालेल्या क्रांतीची पार्श्वभूमी समजावून सांगितली.

यापूर्वी पेकिंग सरकारने एक निवेदन जाहीर केले होते. त्यामध्ये त्यांनी असे विधान केले होते की, ‘टोळीवाले आणि दलाई लामा यांच्यातच बेबनाव झालेला असून सध्या टोळीवाल्यांच्या अख्त्यारीत दमाई लामा कुठल्या तरी अज्ञात ठिकाणी बंदिस्त आहेत.’

अर्थात् तेजपूरहून दलाई लामा यांनी वरील विधान केल्यानंतर पेकिंग सरकारचा खोटा प्रचार उघडा पडला.

भारत सरकारने आणि भारतीय जनतेने दलाई लामा यांचे हार्दिक स्वागत केले. भारतीय जनतेने तर अत्यंत उत्स्फूर्त अंतःकरणाने आपल्या भावना दलाई लामा यांच्या सन्मुख व्यक्त केल्या.

भारताचे आणि तिबेटचे पूर्वापार चालत आलेले संबंध अत्यंत चांगले होते. धार्मिक, सांस्कृतिक आणि व्यापारविषयक दुवे या दोन देशांमध्ये भक्कम होते. जवळ जवळ हे संबंध हजार वर्षांपासून

प्रस्थापित झालेले होते. तिबेटी लोकांच्या दृष्टीने तर भारताची भूमि फार पवित्र समजली जात होती. कारण याच भूमीने गौतम बुद्धांना जन्म दिला होता.

भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू आणि लोकसभेतील त्यांचे सहकारी यांच्या सौजन्यपूर्ण वागणुकीमुळे दलाई लामा हेलावून गेले.

अशी प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी चिनी राज्यकर्त्यांचा तिबेटवर फार पूर्वीपासून डोळा होता हे सहजतेनें सिद्ध झालेले आहे. १९४८ सालीच चिनी राज्यकर्त्यांनी चिनी कम्युनिस्ट गुप्तहेर तिबेट-मध्ये पेरून ठेवलेले होते. तिबेटची लष्करी शक्ति कशी काय आहे याची माहितो मिळविण्याचा ते प्रयत्न करीत होते. तसेच तिबेटी सरकारला इतर देशातून लष्करी मदत मिळते किंवा कसे याचीही बारकाईने माहिती काढण्याचे काम या गुप्त हेराकडे होते. अर्थात् अशी माहिती मिळविणे हे काही फारसे कठीण काम नव्हते !

तिबेटचे लष्कर तेव्हा किती होते ? लष्करी अधिकारी आणि लष्कर मिळून ही संख्या अवघी ८,५०० होती. या लष्कराची कामगिरी फक्त बाहेरील अनधिकृत प्रवाशांना तिबेटमध्ये येण्या-पासून रोखणे आणि व्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचे काम करणे; ही दोन प्रमुख कामे लष्कराकडे होती. युद्ध करणे ही गोष्ट या लष्कराच्या आवाक्याबाहेर होती !

या पहिल्या पायरीनंतर दुसरी पायरी तिबेटच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने धोक्याची होती ती अशी : तिबेटच्या पूर्वविभागाचे गव्हर्नर, ज्यांचा मुक्काम खाम्डो (Chamdo) येथे होता आणि त्यांच्या दिमतीला एक इंग्रज रेडिओऑफिसर होता, त्यांच्या कानावर चिन्यांच्या सरहद्दीवरून वरचेवर सांकेतिक शब्द येऊ लागले. त्या संकेतावरून असे दिसून येत होते की भले मोठे चिनी लष्कर तिबेटच्या पूर्वविभागात हालचाली करीत आहे. या हालचालींचा प्रमुख उद्देश असा होता की, एक तर त्यांना तिबेटवर हल्ला करावयाचा होता नाहीतर त्यांना तिबेटी राज्यकर्त्यांवर आणि जनतेवर दहशत बसवा-वयाची होती.

ही भयसूचक बातमी यऊन थडकल्याबरोबर तिबेटच्या मंत्रीमंडळाने एक सभा बोलावली. हे पूर्वेकडील संकट भयानक होते. कम्युनिझमने चीन पादाक्रांत केला होता आणि चिनी जनतेमध्ये लष्करी शक्तीची धारणा केली होती. तेव्हा हा तडाखा तिबेटला नुसताच भयावह नव्हता तर त्याचे स्वरूप देखील फार निराळे होते.

मागील कित्येक शतकांमध्ये चीन आणि तिबेटमध्ये काही प्रमाणात धार्मिक सहकार्य आणि सहानुभाव तरी होता, परंतु या कम्युनिस्ट राजवटीने तो सहानुभाव तर नष्ट केलाच; उलट तिबेटी जनतेवर राजकीय वर्चस्वही गाजविण्याचे त्यांचे मनसुबे स्पष्ट दिसू लागले होते.

मंत्रीमंडळाच्या बैठकीत खूप खोलवर विचार करून ठरविण्यात आले की, 'तिबेटी लष्कर चिनी ताकदीपुढे मुळीच टिकाव धरू शकणार नाही. तेव्हा जगातील निरनिराळ्या देशांपुढे तिबेटने आपल्यापुढील वस्तुस्थिति मांडावी आणि त्यांचे साह्य मागावे.' यासाठी मंत्रीमंडळाने आपली चार शिष्टमंडळेही तयार केली, आणि ब्रिटन, भारत, अमेरिका आणि नेपाळ या देशांना ती रवाना केली. पूर्वसूचना देण्यासाठी आपल्या शिष्टमंडळांचा हेतु विशद करणाऱ्या ताराही या मंत्रीमंडळाने त्या त्या देशांना अगोदर केल्या.

परंतु या तारांना निरनिराळ्या देशांनी जी उत्तरे पाठविली ती फारच निराशाजनक होती.

ब्रिटनने तिबेटच्या सरकारजवळ तेथील परिस्थितीविषयी अतीव सहानुभूती प्रगट केली. आणि कळविले की तिबेटच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे तुम्हाला मदत पोचविणे अशक्य झालेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तिबेटकडे जाण्याचा मार्ग स्वतंत्र असा राहिलेला नाही. अमेरिकेने देखील याच पद्धतीचे पत्र लिहून केवळ सहानुभूती व्यक्त केली. त्याचप्रमाणे भारत सरकारनेही कळविले की, 'भारत सरकार तुम्हाला लष्करी साह्य देऊ शकणार नाही.' इतकेच नव्हे तर भारताने तिबेटला उपदेश केला की, 'तुम्ही चिनी सरकारशी लष्करी चकमकी करू नयेत! उलट शांततापूर्ण

वातावरण निर्माण करून १९१४ च्या सिमला ठरावानुसार हा झगडा सोडवावा. '

त्यानंतर तिबेट सरकारच्या डोळ्यांपुढे अक्षरश: काजवे चमकले असतील ! या सबंध जगात आपण केवळ एकाकी आहोत–एकाकी आहोत अशी तीव्र जाणीव त्यांना झाली असेल यात नवल नाही !

या सर्व गोष्टी होतात न होतात तोच चिनी कम्युनिस्टांच्या लष्कराने तिबेटवर हल्ला केला. पुष्कळसे खंबा टोळीवाले निकराने लढता लढता कामी आले. शेवटी गव्हर्नर नगांबोला चिनी लष्कराने अटक केली आणि थोडयाच काळात चिनी राज्यकर्त्यांनी दोन तिबेटी वरिष्ठ अधिकारी गव्हर्नर नगांबोच्या वतीने ल्हासाकडे पाठविले. आणि त्यांच्या हाती नगांबो अटकेत असल्याची खबर मंत्रीमंडळाला दिली. शिवाय शांततेसाठी बोलणी करण्याचा अधिकार तिबेटी राज्यकर्त्यांनी नगांबोला द्यावा असाही आदेश या दोन अधिकाऱ्यामार्फत दिला.

त्यानंतरची धक्का देणारी बातमी आणखी अशी होती की यूनोनेही तिबेटचा प्रश्न आमसभेत चर्चेत घेण्यास नकार दिला. न्याय मिळविण्याचा या जगातील एकमेव मार्गही अशा तऱ्हेने बंद झाला होता.

तिबेटच्या नशिबी या साऱ्या गोष्टी का आल्या ? त्यावर जगाने आणि यूनोनेही अन्याय का करावा ? का या बाबतीत जग आणि यूनो बरोबर आहे आणि तिबेटचेच काही चुकले आहे ?

हे सारे समजून घेण्यासाठी तिबेटचा मागील इतिहास बघितला पाहिजे.

तिबेट हे उत्तरेकडे २८ आणि ३६ अक्षांश आणि पूर्वेकडे ७९ आणि ९९ रेखांश प्रदेशात पसरलेले आहे. १९५० साली तिबेटचे क्षेत्रफळ पाच लक्ष चौरस मैल होते. उत्तरेकडे भारताच्या बाजूनें त्याचा विस्तार दोन हजार मैल आणि वायव्येकडे पाचशे मैल आहे. त्याची लोकसंख्या १९५१ साली तीस लक्ष पन्नास हजार होती आणि

अलिकडे कम्युनिस्ट चीनच्या सरकारने तिबेटच्या लोकसंख्येचा आकडा दिला आहे तो असा. ( १,७४,९६९ )

तिबेटी हे चिनी नव्हत. अनेक वर्षे चिनी राज्यकर्ते तिबेटला आपल्याच देशाचा एक भाग समजत असत. त्याविषयी त्यांचे म्हणणे असे होते की चिनी साम्राज्य ज्या पाच वंशाच्या लोकांचे मिळून झाले आहे त्यापैकी तिबेटी लोक एक आहेत. परंतु अटलांटिक करारानुसार तिबेटला स्वातंत्र्य मिळणार असे जेव्हा चँग कै शेक यांच्या लक्षात आले तेव्हा त्याने वरील विधान दुरुस्त करून तिबेटी लोक हे चिनीच आहेत असे जाहीर केले. परंतु तिबेटी लोक हे खरोखरी चिनी वंशाचे आहेत असे म्हणता येत नाही. ऐतिहासिक अथवा मानववंशशास्त्रज्ञांचाही याबाबतीत अनुकूल पुरावा नाही.

२००० वर्षापूर्वी खुद्द चिनी लोक देखील तिबेटी लोकांना आपल्यापेक्षा निराळ्या वंशाचे मानीत असत. टर्नर, रिस्ले वगैरेसारखे प्रख्यात मानववंशशास्त्रज्ञ देखील तिबेटी लोकांना चिन्यांपासून निराळे ठरवितात. केस, डोळे, वर्ण, आणि कातडी या सर्वच गोष्टींचा अभ्यास करूनच त्यांनी आपले हे विधान केलेले आहे.

तसेच तिबेटी भाषा आणि लिपी ही चिनी भाषा आणि लिपी यापासून निराळी आहे. तिबेटी लिपी ही सातव्या शतकात भारतापासून त्यांनी मिळविलेली आहे. याचे पुरावे उपलब्ध आहेत.

तिबेटी लोक हे मध्ययुगीन असले तरी चांगलेच सुसंस्कृत आहेत. सरंजामी पद्धतीवर ते राज्यकारभार करीत असत. त्यांची राज्यव्यवस्था अत्यंत सुव्यवस्थित होती आणि चिन्यांपासून ती अगदीच निराळी होती. दलाई लामा हे देशाचे आध्यात्मिक शास्ते समजले जात, तसेच राजकीय शासनावरही त्यांचा वचक होता. परंतु पुढे या देशावर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा विलक्षण प्रभाव पडला आणि या देशाच्या राजकारणात देखील बदल घडून आला. लष्करी शक्तीकडे या देशाने हळू हळू दुर्लक्ष करण्यास सुरुवात केली आणि आध्यात्मिक शक्ती वाढीला लागू लागली. पाहता पाहता सारा देश बुद्धमय झाला ! सामाजिक जीवनात अहिंसा आणि आध्यात्मिक

जीवनात प्रार्थना या दोन गोष्टींना खूप महत्त्व प्राप्त झाले. तिबेटी लोक हे रक्ताने दयाळू, आनंदी वृत्तीचे आणि समाधानी लोक होत.

तिबेटी सरकारचा दृष्टिकोन असा होता की, आपला देश शांततापूर्ण मार्गाने जावा आणि जगातील इतर आकांक्षावादी देशांकडे त्याने मुळीच लक्ष देऊ नये आणि त्यांचे अनुकरणही करू नये.

तेराव्या दलाई लामांनी ल्हासा येथे परतल्यावर, १९१२ साली तिबेटचे स्वातंत्र्य घोषित केले होते आणि मंगोलियाशी तह केला होता. त्यानंतरची बावीस वर्षे हे दलाई लामा तिबेटचे सर्वसत्ताधीश होते. तेव्हा चीनचा प्रभाव तर नव्हताच परंतु एकही चिनी नागरिक तेव्हा तिबेटमध्ये नव्हता. फक्त कारणपरत्वे चिनी प्रवासी मात्र तिबेटमध्ये येत असत एवढाच पुरावा आहे. तसेच अधून मधून चिनी व्यापारी देखील तिबेटच्या सरकारची परवानगी घेऊन व्यापारासाठी येऊन जात असेही तेराव्या शतकात पुरावे मिळतात. याच शतकात भारताचे आणि तिबेटचे संबंध देखील चांगले होते असे दिसून येते.

१९१७ साली सूझवानच्या (Szechwan) गव्हर्नरने तिबेटशी शत्रुत्वाच्या हालचाली सुरू केल्या तेव्हा तिबेटच्या सरकारने भारत सरकारकडे शस्त्रसाहाय्याची मागणी केली होती आणि भारत सरकारने ती मागणी पुरविली होती. तेव्हा चिनी शरण आले होते आणि त्यांनी तिबेटशी तात्पुरता तह केला होता.

३ ऑगस्ट १९०४ रोजी यंगहजबंड मिशन ल्हासामध्ये येऊन पोहोचले. थॉमस मानिगनंतर बरोबर शंभर वर्षांनी ल्हासा शहरात इंग्रजांचे आगमन होत होतं. हीच तारीख तिबेटच्या राजकीय इतिहासाचे विश्लेषण करताना सोयिस्कर ठरणार आहे. कारण या मिशनने तेव्हा तिबेटचे जे निरीक्षण केले आणि त्यापासून निष्कर्ष काढले त्यांना फार महत्त्व आहे. यंगहझबंड मिशन म्हणते की, ‘ल्हासामध्ये चिन्यांचा मुळीच प्रभाव नाही, इतकेच नव्हे तर चिनी प्रतिनिधीला तिबेटी राजसत्तेच्या अंकित राहावे लागते. आणि तिबेट हा संपूर्ण स्वतंत्र देश आहे.’

ब्रिटिशांच्या या मिशनबरोबर तिबेट सरकारचे काही करार-मदार झाले. (७ सप्टेंबर १९०४) तेव्हा या मिशनने तिबेटला संपूर्ण स्वतंत्र देश असेच संबोधलेले आहे.

शिवाय मागील काळापासून तह करणे, करार करणे, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी आपलें संबंध ठरविणे या गोष्टी फक्त दोन स्वतंत्र राष्ट्रांमध्येच होत असतात ही गोष्ट पूर्वापार चालत आलेली आहे. तीवरून देखील तिबेटचे स्वातंत्र्य सिद्ध होते.

ब्रिटिशांबरोबर तिबेटचा दुसरा तह १९१४ साली झाला ज्याला 'सिमला करार' म्हणून ओळखले जाते. चिन्यांचा या कराराला विरोध असताही हा करार झाला. यावरून देखील तिबेटचे 'स्वतंत्र देश' म्हणून अस्तित्व सिद्ध होते.

हिंदुस्थान सरकार, चीन आणि तिबेट यांची ही बैठक भरलेली होती आणि त्या बैठकीमध्ये तिबेट-चीन सरहद्द ठरविण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. या परिषदेचे अहवाल त्यावेळी वर्तमानपत्रात जाहीर झाले होते. त्यामधून असे दिसते की चीनने ही सरहद्द निश्चित करताना विलक्षण घोळ घातलेला होता. त्याचे धोरण अखेरपर्यंत 'खो' घालण्यांचे होते. परंतु शेवटी या करारावर सह्या झाल्या. चीनने मात्र सही करण्याचे नाकारले आणि ही परिषद मोडली.

त्यानंतर इव्हान चेन (Ivan chen) नावाचा चिनी अधिकारी सिमल्याहून चीनला परतताना १३ तारखेस कलकत्यामध्ये थांबला होता. तेथे आपल्या ज्ञातीसमोर भोजनोत्तर भाषण करताना हा परिषदेतील चीनचा सर्वाधिकारी म्हणाला होता की, 'चीनला तिबेटच्या थोड्याशा देखील भूमीची अभिलाषा नाही. आम्हाला फक्त आपसातील मतभेद एकमेकांची प्रतिष्ठा सांभाळून मिटवावयाची इच्छा होती आणि तिबेटमध्ये फक्त व्यापाराची सवलत मिळावी ही आमची इच्छा होती. परंतु त्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या. आता चीन सरकारपुढे मी हा सर्व वृत्तांत मांडीन आणि त्यामधून निश्चितपणे काही चांगले निष्पन्न होईल,याविषयी मला आशा आहे !'

असे जरी होते तरी चिन्यांचा डोळा तिबेटच्या भूमीवर होताच.

नाहीतर केवळ सीमा निश्चित करताना त्यांनी एवढी खळखळ करण्याचे काय कारण होते ? इतकेच नव्हे तर तिबेटवर आमचा संपूर्ण हक्क नाही हे एकीकडे जरी ते मान्य करीत असले तरी तिबेटवर आमचे अधिराज्य आहे हे त्यांचे म्हणणे होतेच.

त्यानंतर चीन आणि तिबेट यांच्यामध्ये शस्त्रास्त्रांचा खणखणाट, परंतु आपापल्या सरहद्दीवरून होतच राहिला. मधून मधून पूर्वेकडून चिनी जनरलस तिबेटला धमक्या देतच असत. इतकेच नव्हे तर हे वैमनस्य तेव्हा इतके पराकोटीला गेले होते की, एका चिनी जनरलने एकदा तिबेटला लिहिले, ‘ तुमच्या देशातील एखादा कुत्रा किंवा एखादी कोंबडी देखील आम्ही जिवंत ठेवणार नाही ! ’

हा प्रश्न चिघळतच राहिला. ज्या ज्या वेळी प्रसंग उद्भवले त्या त्या वेळी चीन सांगत राहिला की तिबेट आमच्या देशाचा एक भाग आहे. परंतु या सर्व वर्षांमध्ये कधीही चिनी अधिकारी तिबेटमध्ये राहिलेला नाही. सारा कारभार तिबेटी लोकांच्या, तिबेटी मंत्रीमंडळाच्या हाती आणि सर्वसत्ताधीश म्हणून दलाई लामा यांचा अधिकार अबाधित राहिला होता. ही परिस्थिती जवळ जवळ चाळीस वर्षे चालू राहिली. मध्यंतरी चीन आणि जपान यांच्यामध्ये युद्ध झाले. तेव्हा तिबेटने या युद्धात भाग घेतलेला नव्हता. तसेच दुसऱ्या महायुद्धात देखील तिबेटने आपली तटस्थता अबाधित राखिली होती. आपल्या भूभागामधून हिंदुस्थानसरकारचे युद्धसाहित्य चीनमध्ये नेण्यास तिबेटने बंदी केली होती.

या सर्व काळामध्ये तिबेटने आपणहून आपले स्वातंत्र्य सिद्ध करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. त्याला तशी तेव्हा गरज वाटलेली नसावी अथवा त्याच्या हातून तेव्हा ती फार मोठी राजकीय चूक झालेली आहे असे म्हणावे लागेल. परंतु असे असले तरी जगातील इतर देश तेव्हा तिबेटला स्वतंत्र मानीत असत असे पुरावे सापडतात. १९४७ साली जेव्हा दिल्लीमध्ये आशिया परिषद भरली होती, तेव्हा इतर देशांप्रमाणे तिबेटचाही झेंडा तेथे फडकलेला होता.

याच वर्षी, भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा तिबेट सरकारच्या पत्राला उत्तर देताना भारत सरकारने लिहिले होते, ' तिबेट सरकारला भारताशी मैत्रीचे संबंध ठेवण्याची इच्छा असल्याचे समजून आनंद झाला. नवीन सरकार स्थापन झाल्यावर उभय सरकारांच्या संमतीने हे संबंध निश्चित करण्यात येतील. तोपर्यंत दोन्ही देशांमध्ये पूर्वीपासून चालत आलेले संबंध तसेच पुढेही चालू राहतील. आणि दुसऱ्याही राष्ट्रांनी भारतासारखेच धोरण तिबेटच्या बाबतीत चालू ठेवले होते.

१९४८ साली तिबेटचे एक व्यापारी शिष्टमंडळ ब्रिटन, इटली, फ्रान्स, चीन, भारत, आणि अमेरिकेला गेले होते. तेव्हाही त्या त्या सरकारने तिबेटचे पासपोर्ट मान्य केलेले होते. तिबेट हा एक स्वतंत्र देश आहे याचा हा पुरावा तर अगदी अलिकडचा आहे. सन १९१२ पासून तिबेटचा स्वतंत्र दर्जा अबाधित राहिलेला आहे. मागील इतिहासात असे पुरावे मिळतील की, कधी चीनने हल्ला करून तिबेट-वर ताबा मिळविला आहे, तर कधी तिबेट बलिष्ठ झाल्यावर हा ताबा त्याने झुगारून दिलेला आहे आणि पुन्हा आपले स्वातंत्र्य सिद्ध केलेले आहे. अशी परिस्थिती अगदी परवा परवापर्यंत चालत आलेली होती. परंतु १९५० साल हे तिबेटच्या दृष्टीने घातकी ठरलेले आहे!

तिबेटच्या या दर्जाला बाध आला तो २६ ऑक्टोबर १९५० रोजी. त्या दिवशी चीनची मुक्तिसेना तिबेटला मुक्त करण्यासाठी तिबेटमध्ये घुसली. चीनने स्वतःच ही गोष्ट रेडिओ पेकिंगवरून जगाच्या माहितीसाठी जाहीर केली. आणि त्यात आश्चर्याची गोष्ट अशी की, तिबेटचा शेजारी असलेल्या स्वतंत्र भारताला या मुक्ति-सेनेची हालचाल पेकिंग रेडिओने जाहीर केली तेव्हाच कळली. आमच्या गुप्तहेर खात्याची ही कार्यतत्परता पाहून रांगते मूल देखील आश्चर्याने तोंडात बोट घालील. ही गोष्ट घडण्याच्या एक वर्ष अगोदरच पंत-प्रधान नेहरू १९४९ रोजी अमेरिकेस भेट देण्यासाठी गेले होते. तेथें न्यूयॉर्कमधील एका सभेपुढे बोलताता ते म्हणाले होते,

'कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आणणाऱ्या कुठल्याही गोष्टीकडे आम्ही कधीही डोळे झाक करणार नाही! कोणाच्याही स्वातंत्र्यावर गंडांतर येईल तेव्हा, कोणाचाही न्याय पायदळी तुडविला जाईल तेव्हा अथवा कुठेही आक्रमण होईल तेव्हा भारत अलिप्त किंवा तटस्थ मुळीच राहू शकणार नाही!'

भारताच्या पंतप्रधानांचे हे उद्‌गार सर्व स्वातंत्र्यप्रिय देशांना किती दिलासा देणारे वाटले असतील! अमेरिकेसारख्या महान देशामधून काढलेले हे उद्‌गार जगाच्या कोन्याकोपऱ्यात तेव्हा पोहोचले होते. चिमुकल्या तिबेटनेही हे उद्‌गार ऐकलेले होते. पण जेव्हा प्रसंग आला तेव्हा भारताच्या पंतप्रधानांचे हें उद्‌गार आणि प्रत्यक्ष कृति यामध्ये केवढे अंतर पडलेले जगाला दिसले.

चीनने ऑक्टोबर १९५० मध्ये तिबेटवर उघड उघड आक्रमण केले आणि स्वतःच्या नभोवाणीवरून जगाला धमकावून सांगितले की तिबेट हा चीनचाच एक भाग आहे तेव्हा भारताने काय केले?

येथे भारतीय राजकारणाची ब्रिटिशांच्या राजकारणाशी तुलना करता येईल ती अशी की, १९१२ साली चीनने तिबेटवर असेच आक्रमण केले होते. परंतु तेव्हा ब्रिटिश राज्यकर्ते तिबेटच्या सहाय्यार्थ धावून गेले होते. आणि त्यांनी चीनला तिबेट व्यापण्यापासून परावृत्त केलें होते.

त्यावेळी लोकसभेत भाषण करताना पंडित नेहरू यांनी भारताचे धोरण स्पष्ट करताना खालील उद्‌गार काढले होते :

'सर्वसाधारणपणे आमचे धोरण खालील त्रिसूत्रीमध्ये सामावलेले आहे.

अ ) भारताचे स्वातंत्र्य आणि प्रादेशिक ऐक्य अबाधित राखणे,
आ ) चीनशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे आणि
इ ) तिबेटच्या लोकांविषयी सहानुभूती बाळगणे.

तिबेटच्या बाबतीत भारताने व्यक्त केलेले हे धोरण उघड उघड दुबळे, पडखाऊपणाचे होते. वसाहतवादाविरुद्ध नेहरूंनी आता-


पर्यंत व्यक्त केलेले आपले धोरण आणि त्यांचा स्वत:चा वैयक्तिक दृष्टीकोन तिबेटच्या बाबतीत सर्व जगाची दिशाभूल करणारा ठरला याविषयी तिळमात्र शंका नाही. जेथे त्यांनी इंडोनेशिया, अल्जेरिया आणि सुएज कॅनॉलचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा प्रत्येक वेळी अन्याय झालेल्या देशांची बाजू घेतलेली होती तेथे आता प्रत्यक्ष आपला शेजारी देश तिबेट, ज्याची अडीच हजार मैलांची सरहद्द आपल्या देशाला चिकटलेली आहे, त्याच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत नेहरूंनी अंगिकारलेले हे धोरण विचित्र होते !

या चीनच्या आक्रमणाकडे भारताला तीन दृष्टिकोनातून पाहता आले असते. (अ) १९१४ साली झालेल्या तहाच्या आधारे काही सूत्रांवर भारताला विचार करता आला असता आणि चीनचे तिबेट-वरील आधिराज्य नाकारता आले असते. (आ) हा प्रश्न एकंदरीनें भारताच्या ऐक्य आणि संरक्षणाच्या दृष्टिकोनामधून सोडविता आला असता किंवा (इ) चीनचे समाधान करून !

परंतु हे तर सोडाच पण आपले तिबेटच्या संरक्षणार्थ असलेले सैन्य देखील भारताने चीनच्या धाकामुळे तेथून काढून घेतले होते. याचे कारण देतांना भारताने स्पष्टीकरण असे दिले होते को हे सैन्य तेंथे असणे म्हणजे साम्राज्यशाहीचे अवशेष तेथे शिल्लक ठेवण्यासारखे ठरले असते !

हे धोरण आणि बचावाचा हा दृष्टिकोन किती भित्रा आणि फुसका वाटतो हे भारतीय मुत्सद्दगिरीला कळले नसले तरी साऱ्या जगाने मात्र ते ओळखले आहे. साम्राज्यशाहीचे अवशेष म्हणून ज्या सैन्याला भारतीय मुत्सद्देगिरीने स्वातंत्र्यानंतर संबोधिले त्या सैन्याने तिबेटचा चीनपासून खंबीरपणे बचाव केला होता ही गोष्ट ऐति-हासिक सत्य म्हणून तिची नोंद इतिहासात झालेली आहे, याची दखल भारतीय राजकारण्यांनी घ्यायला हवी होती असे वाटते.

बरे या सैन्याला जर ब्रिटिश साम्राज्याचे अवशेष म्हणून त्याचा धिक्कार करावयाचा असेल तर मग तिबेटवरील चिन्यांचे आधिराज्य (Suzerainty) हे देखील ब्रिटिश साम्राज्याचे अवशेष का मानू


काश्मीर
तिबेट
ल्हासा
नेपाळ
भूतान
भारत
पा.स्तान

नये ? सरदार पण्णीकर हे त्यावेळी भारताचे चीनमधील वकील होते. हे गृहस्थ इतिहासज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांना ही गोष्ट पूर्णपणे माहीत होती की चिन्यांचे तिबेटवरील आधिराज्य ही केवळ एक काल्पनिक गोष्ट आहे आणि ब्रिटिशांनी केवळ आपल्या स्वार्था-साठी ती गोष्ट मान्य केलेली होती. चीनशी व्यापाराचे संबंध निश्चित करण्यासाठी आणि त्या देशाशी व्यापार वाढविण्यासाठी तिबेटवर चिन्यांचे आधिराज्य मानणे आवश्यक होते.

१९५० मध्ये चिन्यांचे सैन्य तिबेटमध्ये घुसले तेव्हा भारत सरकारने आपल्या वकिलामार्फत चिनी सरकारकडे जोरदार निषेध खलिता पाठविला. परंतु त्याचे उत्तर देखील चिन्यांकडून तितक्याच चढेल आवाजात आले. त्यांनी भारताला बजावले की,

> ‘तिबेट हा चीनचा अविभाज्य भाग आहे. म्हणून तिबेटचा प्रश्न हा चीनचा घरगुती प्रश्न आहे. चीनच्या मुक्ति-सेनेला तिबेटमध्ये घुसण्याचा आणि तिबेटची भूमी, चीनच्या सरहद्दींचे रक्षण करण्यासाठी मुक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तिबेटचा प्रश्न हा चीनचा घरगुती प्रश्न असल्यामुळे या प्रश्नामध्ये आम्ही परकीय हस्तक्षेप मुळीच सहन करणार नाही, एवढेच नव्हे तर असा हस्तक्षेप आम्ही चीनविरुद्ध शत्रुत्वाचे कृत्य मानू.’

चीनच्या या खलित्यानंतर भारताने काय भूमिका घेतली ? काय भूमिका घेतली ते आता सर्वश्रुतच आहे. चीनचे तिबेटवरील आधिराज्य (Suzerainty) नव्हे तर मुख्यसत्ता (Sovereignty) देखील मान्य केली. तिबेटच्या बाबतीत भारताचे धोरण चीनमधील भारताचे वकील सरदार पण्णीकर यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर ते असे आहे :

‘चिनी खलित्यास आमचे प्रतिउत्तर तितक्याच स्पष्ट आणि परखड शब्दात दिले गेले असले तरी तिबेटवर चिन्यांचे सर्वाधिपत्य मानण्यावाचून आम्हाला गत्यंतर उरले नाही !’

भारत सरकारने मात्र नंतर या विषयावर काहीही प्रकटन केले नाही किंवा आपल्या वकिलाने उच्चारलेले सर्वाधिपत्य (Sovereignty) या शब्दाचा इन्कारही केलेला नाही, ही गोष्ट लक्षात घेणे भाग आहे.

तिबेट या विषयावर आपल्या सरकारचे काय धोरण आहे हें पंडित नेहरूंनी कधीही स्पष्टपणे सांगितले नाही.

६ आणि ७ डिसेंबर १९५० साली लोकसभेत निवेदन करताना नेहरू म्हणालें होते :

> ‘आम्ही तिबेटमधील चीनच्या आधिपत्याला आव्हानही देऊ शकत नाही किंवा नकारही देऊ शकत नाही. मी गृहाला या विषयाची ऐतिहासिक बाजू निवेदन करीत आहे. या विषयाच्या भवितव्याविषयी मी येथे चर्चा करीत नाही. ही एक ऐतिहासिक घटना आहे, आणि अनेक संदर्भांच्या साखळी-मधून, चीनचे तिबेटवरील आधिपत्य आम्ही मान्य केलेले आहे. मात्र ही मान्यता, जशी आम्ही तिबेटची अंतर्गत स्वायत्तता मान्य केलेली आहे तशीच आहे.’

परंतु मुख्य प्रश्न असा उपस्थित होतो की, भारताने चीनच्या तिबेटमधील आधिपत्याला का आव्हान दिले नाही ? ज्या आधिपत्याला काडीचाही ऐतिहासिक अथवा वांशिक आधार नाही ! १९१४ च्या परिषदेमध्ये देखील ब्रिटिश इंडियाच्या सरकारनेही चीनचे तिबेटवरील आधिपत्य मान्य केलेले नव्हते.

याच गृहासमोर बोलताना पंडितजी पुढे म्हणाले होते :

> ‘कृपा करून गृहाने ही गोष्ट लक्ष्यात घ्यावी की मी तिबेटच्या संदर्भात शब्द आधिपत्य (Suzerainty) वापरला आहे. सर्वाधिपत्य (Sovereignty) नाही. फार नसला तरी या दोन शब्दांच्या अर्थामध्ये सूक्ष्म फरक आहे !’

पंडितजींचे हे विधान आश्चर्यकारकच म्हणावे लागेल. Suzerainty आणि Sovereignty या शब्दांच्या अर्थामध्ये केवढा

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

तरी फरक आहे हे एखाद्या देशाच्या पंतप्रधानाला कोणी समजावून सांगावे असे थोडेच आहे ?

पुढे ३० मार्च १९५९ साली एका भाषणात पंडितजी म्हणाले होते :

'मी एवढेच सांगू शकतो की तिबेटवर चीनचे सर्वाधिपत्य ( Sovereignty ) आपण मानायला हवे.'

पंडित नेहरूंचे हे विधान परिस्थितीकडे कानाडोळा करणारे, इतिहासाचे वाभाडे काढणारे, तिबेटच्या कपाळावरचा स्वातंत्र्याच्या सौभाग्याचा टिळा पुसून टाकणारे आणि स्वतः भारताचेही भवितव्य धोक्यात आणणारे होते. दुर्दैवाने पंडितजी त्यावेळी देशाचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री होते. आणि तिबेटची आहुती त्यांच्या हातानेच पडायची होती असे विधिलिखित असावे !

माझ्या या विधानाला मागील इतिहासात शेकडो आधार आहेत. खुद्द ब्रिटिश इंडियाच्या सरकारने १९१४ साली केलेल्या तहातील प्रत्येक कलम पाहिले तरी ते तिबेटची स्वायत्तता सिद्ध करण्यास पात्र आहे. इतकेच नव्हे तर तेव्हापासून १९५४ पर्यंतची चाळीस वर्षे तिबेटचा इतिहास पाहिला तर तिबेट हा एक स्वतंत्र देश होता, सर्व सत्ता त्याच्याच नेत्यांच्या हाती होती, इतकेच नव्हे तर त्या काळात एकाही चिनी अधिकाऱ्याचे तिबेटमध्ये वास्तव्य नव्हते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे.

हे अगदी ढळढळीत उदाहरण म्हणून सांगितले. परंतु भारत, चीन आणि तिबेटचा प्राचीन इतिहास पाहिल्यास आपणास वरील सत्याशिवाय इतर काहीच सापडणार नाही. तिबेटच्या बाबतीत अमेरिका आणि ब्रिटन या राष्ट्रांनाही न्याय्य मदत करण्याची इच्छा होती असे त्यांच्या त्यावेळच्या वर्तनावरून आणि विधानावरून निष्कर्ष काढता येतात. परंतु परिस्थितीच अशी होती की या राष्ट्रांनी तिबेटला मदत करण्याचे ठरविले असते तरी प्रत्यक्ष भारताच्या अनुमतीशिवाय तशी मदत करणे या देशांना शक्य नव्हते. कारण तिबेटमध्ये जाण्यास मार्ग फक्त भारताच्या बाजूनेच सोयीचा आ

आणि भारताचाच दृष्टिकोन जर या विषयावर चीनपुढे लोटांगण घालणारा होता तर तिथे बाहेरच्या राष्ट्रांनी काय करावे ?

चिन्यांनी जेव्हा पाहिले की पंडित नेहरूंनी चीनचे सर्वाधिपत्य तिबेटमध्ये मान्य केले आहे तेव्हा त्यांची अभिलाषा दुप्पट जोराने उफाळून आली. कारण मागील कित्येक शतकांच्या इतिहासात पाश्चिमात्यांनी चिन्यांचे हे स्वप्न वास्तवात उतरू दिले नव्हते. इतक्या सहजासहजी ही गोष्ट होईल अशी चिन्यांना खात्री नव्हती. इतकेच नव्हे तर भारताने तिबेटमधील स्वतःच्या हितसंबंधांकडेही काना-डोळा केला तेव्हा तर चीनी सत्ताधाऱ्यांना स्वर्ग केवळ दोनच बोटे उरला असेल ! जसे भारताचे तसेच इतर देशांचेही चिन्यांनी पाहिले की, तिबेटचा प्रश्न यूनोमध्ये देखील उचलला जात नाही तेव्हा त्यांनी ल्हासामध्ये आपल्या फौजा उतरविण्यास सुरुवात केली. काही दिवसातच तिबेटच्या सर्व भागात चिनी फौजांनी आपले जाळे विणले. पश्चिम तिबेटपासून काशघर ( Kashgar ) पर्यंत आणि आक्साई चीनमधून सिकियांगच्या प्रदेशात आपला लष्करी अम्मल चिन्यांनी बसविला. १९५२ च्या सप्टेंबरमध्ये भारत सरकारने ल्हासामधून आपला पोलिटिकल एजंट काढून घ्यावा म्हणून चीनने भारतावर दडपण आणले. तसेच त्याच वर्षी ल्हासामधील आपल्या प्रतिनिधीचा दर्जा बदलून कॉन्सल–जनरल करावयास लावले. या गोष्टी तरी काय दर्शवितात ? म्हणजे पूर्वीचा तिबेटचा एक विशिष्ट दर्जा होता तो चीनने हुकूमशाहीने आणि धाक दडपशाहीने बदलला हेच दर्शवीत नाही काय ?

थोडक्यात म्हणजे तिबेट देशाची स्वातंत्र्याची ज्योत विझविली गेली.

या साऱ्या घटनांवर कडी करणारा आणखी एक ऐतिहासिक प्रसंग २९ एप्रिल १९५४ मध्ये घडला. हा चीन आणि भारत यांच्या-मध्ये झालेला तह होय. त्या अन्वये तिबेट हा चीनचा एक अविभाज्य भाग झाला. या तहान्वये जणू तिबेटच्या चीनशी सामीलनाम्यावर सरकारी शिक्कामोर्तबच झाले म्हणावे लागेल !

भारतातर्फे या साऱ्या गोष्टी अगदी न्यायाचा तराजू हातात घेऊनच झाल्या असे म्हणावयाचे असेल तर प्रश्नच मिटला. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, न्याय आणि ऐतिहासिक वस्तुस्थिति या गोष्टी भारताच्या विरुद्ध जातात. तिबेटविषयी आपले धोरण म्हणजे आपल्या परराष्ट्रीय धोरणाला आलेले धवधवीत अपयश आहे. पंचेचाळीस कोटी लोकसंख्या असलेल्या या प्रचंड देशाने एका आतताई आणि मुजोर शेजाऱ्यापुढे घेतलेली नामुष्कीची माघार आहे

ब्रिटिश नीतीला बदनाम करून, अमुक गोष्ट ही साम्राज्यवाद्यांची अवशेष आहे म्हणून आता तिचा स्वतंत्र भूमिकेवरून आणि तिच्या स्वतःच्या गुणवत्तेवरून विचार केला पाहिजे वगैरेसारखी गोंडस वाक्ये उच्चारतांना आणि सर्वसाधारण लोकांनाही ती ऐकताना गोड वाटत असली, तरी त्यांच्यामध्ये विष आणि पराभूत वृत्तीचे भूत छपलेंले आहे हे आपल्या नेत्यांच्या लक्ष्यात येत नाही; आले नाही.

१९५४ साली भारतीय नेत्यांनी जे तिबेटचे केले तसाच रंग आजच्याही एका बातमीत दिसत आहे. (१३-१२-६६). चीनमधील आपल्या वकिलातीमध्ये एक चित्रप्रदर्शन भरले होते. त्यामध्ये नेफाच्या नागरिकांची छायाचित्रे होती. चिनी लोकांनी त्या वकिलातीमध्ये येऊन आमच्या अधिकारीवर्गाला दम दिला आणि ती चित्रे तेथून हालवावयास सांगितली. त्याचे कारण देताना ते चिनी अधिकारी म्हणाले की, ‘ नेफाचे लोक हे मंगोलियन आहेत म्हणून चिनी आहेत; ते भारतीय नाहीत. तेव्हा ही चित्रे ताबडतोब काढून टाका. ’

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतीय वकिलातीमधील त्या चित्रांचे तेथून उच्चाटण झाले. त्याविषयी कारण विचारता, ‘ आम्ही चिन्यांपुढे नमलो नाहीं. दोन दिवसांनी चित्रे बदलावी लागतात. त्यानुसार आम्ही ही चित्रे बदलली ! ’ असे उत्तर मिळाले !

वास्तविक आपल्या वकिलातीत चित्रे लावणे हा आपला अधिकार आहे आणि चिनी अधिकाऱ्यांनी याविषयी आम्हाला दटावणी देऊन आमच्या अधिकाराचा भंग केला आहे, या आशयाचा

एक निषेधखलिता भारतातर्फे चीनकडे रवाना व्हावयास हवा होता, आणि जरी दोन दिवसांनी चित्रे बदलण्याची पाळी असते तरी या प्रकरणी हा नियम लागू न करता चित्रे आणखी ४।८ दिवस राहू द्यावयास हवी होती. आता नेफाचे प्रकरणही तिबेटसारखेच रंगले नाही म्हणजे मिळविली !

आपल्या सरकारचे अशी नांगी टाकण्याचे प्रकार भारतीय राजकारणात काही थोडे थोडके नाहीत. अगदी गेल्यावर्षीच्या भारत-पाक युद्धाच्या वेळची अशीच एक घटना आहे. भारताने पाक युद्धात हस्तगत केलेल्या पॅटन रणगाड्यांपैकी एक रणगाडा दिल्ली शहरात लोकांना पाहण्यासाठी ठेवला होता. परंतु तो रणगाडा पाकला अमेरिकेकडून मिळाला होता आणि अशी वस्तु प्रदर्शन म्हणून ठेवण्यात म्हणे अमेरिकेचा अपमान होत होता. अमेरिकेने तो रणगाडा तेथून हलविला जावा म्हणून मागणी करताच तो ताबडतोब हलविला गेला ! लाज त्यांना नाही, भीति मात्र आम्हाला आहे अशी गोष्ट होऊन बसलेली आहे. याची किंमत भविष्यकाळात आपल्याला दामदुपटीने द्यावी लागणार आहे याची जाणीव मात्र आजच्या राज्यकर्त्यांना दिसत नाही.

चिन्यांच्या राजकारणातील पवित्र्यांचे तर असे एक वैशिष्ट्य आहे की, ते अगोदर प्रतिस्पर्ध्याचा स्वभाव अभ्यासतात आणि मग पुढे आपले धोरण ठरवितात. आपले ३१ ऑक्टोबर १९५० चे उत्तर चिन्यांनी वाचले आणि दलाई लामांच्या विनंतीला यूनोमध्ये कोणी विचारीत नाही हे जेव्हा त्यांच्या लक्ष्यात आले तेव्हा लगेच सर्व तिबेटभर आपल्या फौजा घुसविण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. नंतरच्या एका भाषणात पंडित नेहरू म्हणाले होते की, 'तिबेटच्या प्रश्नाकडे आम्ही कानाडोळा केला !' परंतु हाच कानाडोळा आमच्या पंतप्रधानांना आणि भारतीय नेतृत्वाला किती महागात पडलेला आहे, आणि भविष्यकाळात आणखी त्याची आम्हाला किती किंमत द्यावी लागणार आहे कोण जाणे !

तिबेट हस्तगत केल्याबरोबर चिन्यांनी तेथे लगेच रस्तेबांधणीचे काम धुमधडाक्याने सुरू केले. ती रस्तेबांधणी तेथील तिबेटी नागरिकांच्या सोयीसाठी नसून भारताविरुद्ध मोर्च्यांची बांधणी करण्यासाठी आहे. हीही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. चेंगटू–ल्हासा रस्त्याच्या बांधणीविषयीचेच उदाहरण घेऊन असे सांगता येईल की हा रस्ता तेथील नागरिकांच्या सुखसोयीसाठी बांधलेला नाही. दक्षिणेकडे अत्यंत दुर्गम दऱ्याखोऱ्यांमधून आडवाटेने ही वाट गेलेली आहे. आणि अशी जाऊन ती थांबली आहे कुठे ? तर नेफा विभागापासून फक्त काही मैल अंतरावर ! चेंगटूपासून ल्हासापर्यंत आल्यावर हा रस्ता दक्षिणेकडे वळला आहे आणि फारी (Phari) आणि याटुंग करीत करीत पुन्हा हा रस्ता भारतीय सरहद्दीजवळ येऊन थांबला आहे. असाच एक रस्ता शिगात्से (Shigatse) वरून पश्चिमेकडे गेला आहे. तेथे ब्रह्मपुत्रा नदीवर त्यांनी एक भक्कम लोखंडी पूलही बांधला आहे. असाच आणखी एक नवीन रस्ता भारताच्या नैऋत्य सरहद्दीजवळ येऊन भिडलेला आहे.

या साऱ्या रस्त्यांची बांधणी इतक्या तातडीने आणि इतक्या विस्ताराने जी झालेली आहे ती काही केवळ तिबेटची भरभराट व्हावी आणि त्याला वश करावे म्हणून मुळीच झालेली नाही. कारण तिबेटची भरभराट व्हावी आणि त्याला वश करावे असा मूळ हेतु जर चिनी राज्यकर्त्यांच्या मनात असता तर त्यांनी तिबेटवर असले पाशवी आक्रमण केले नसते, आणि तिबेटचे नेते दलाई लामा यांच्या जिवावरही ते उठले नसते ! ही रस्त्यांची बांधणी भारताविरुद्ध आहे याविषयी आज तरी शंकेला मुळीच जागा राहिलेली नाही. कारण नेपाळखिंडीपर्यंत त्यांनी असाच एका रस्त्याचा फाटा तयार केलेला आहे. काश्मीर, लडाख, नेफा, नेपाळ अशा भारताच्या सरहद्दीवरील ठिकाणांचे भक्ष्य साधता येईल अशा बेताने ही रस्ताबांधणी झालेली आहे. आणि त्या त्या टोकापर्यंत चिनी फौजांच्या हालचाली होत असतात अशा बातम्या हल्ली आपण वर्तमानपत्रातून नेहमीच वाचीत असतो. या साऱ्या घडामोडींचा अर्थ काय घ्यावयाचा ? चिनी लोकांचे मुख्य

लक्ष्य तिबेट होते, का भारतावर उडी घेण्यासाठी तिबेटचा उंच प्रदेश त्यांना स्प्रिंगबोर्ड म्हणून हवा होता ही गोष्ट भारतीय मुत्सद्द्यांना जर कळलेली नसेल तर आम्ही मिळविलेल्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ राहणार नाही असेच म्हणावे लागेल !

तिबेटच्या इतिहासाकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास असे दिसून येईल की, चीनपेक्षा तिबेट हा भारतालाच अधिक जवळ आहे. तिबेटची संस्कृति, धर्म, आचार आणि विचार यांच्या बाबतीत तिबेटी लोकांचे भारतीयांशीच साहचर्य अधिक आहे. त्यांची चित्रकला जर अभ्यासिली तर तिच्यावर भारतीय चित्रकलेचाच अधिक प्रभाव असलेला दिसून येईल. बुद्धकाळातील भारतातील चित्रकला आणि तिबेटमधील चित्रकला यांच्यामध्ये विलक्षण साम्य आहे.

बुद्धकाळातील शिल्प जे आजही तिबेटमध्ये दिसते, त्याची आयात भारतातूनच झालेली असल्याच्या कथा प्रसिद्ध आहेत. इतकेच नव्हे तर भारतामध्ये प्रातिनिधिक म्हणून ओळखले जाणारे स्वस्तिक चिन्ह, या चिन्हाचा वापर तिबेटमध्ये नव वर्षारंभी शुभ चिन्ह म्हणून करतात हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. तसेच तिबेटचे आयुर्वेद शास्त्र हे देखील तेथे भारतातूनच गेलेले आहे. धर्माचा प्रभाव जो आज तिबेटवर आहे तो तर प्रामुख्याने भारतातील धर्माचाच आहे.

हे जसे धर्म, इतिहास आणि संस्कृतीचे नाते आहे तसेच भारताशी तिबेटचे व्यापारी संबंध अति प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत हीही गोष्ट इतिहाससिद्ध आहे.

या साऱ्या गोष्टींचा तिबेटच्या संदर्भात अभ्यास केल्यावर असे वाटते की, चीनपेक्षा तिबेट हा भारताच्या किती तरी जवळचा आहे. असे असताना तिबेटच्या संकटाच्या काळात आपण त्याच्या मदतीस धावून जाण्याऐवजी आपणच त्याच्यापासून अनंत योजने दूर सरकलो आहोत. तिबेटला भारताविषयी अंतरीची ओढ असल्याशिवाय का आक्रमणकाळी दलाई लामा भारतामध्ये आश्रयास आले ?

आपल्याला लागून असलेल्या, आपल्याशी अनेक दृष्टींनी संबंधित असलेल्या आणि संकटकाळी आपल्यावर सर्वस्वी विसंबून राहिलेल्या

या चिमुकल्या देशाच्या स्वातंत्र्याची ज्योत विझविण्यास आपण कारणीभूत झालो आहोत हा नामुष्कीचा डाग भारताला कधीही पुसता येणार नाही. इतिहास या बाबतीत आपल्याला क्षमा करणार नाही. चीनच्या दडपणाला आणि चीनच्या लष्करी शक्तीपुढे नमून भारताने तिबेटच्या बाबतीत जो पवित्रा घेतला तसाच पवित्रा आपल्यावर आलेल्या संकटाच्या वेळी आपल्या दोस्त राष्ट्राने घेतला तर आपली परिस्थिति काय होईल याचा आमच्या नेत्यांनी जरूर विचार करावा.

मी तर असे म्हणेन कीं, ज्या काळात ही परिस्थिति निर्माण झाली त्या काळी भारताची शक्ति अत्यंत मर्यादित होती ही गोष्ट खरी असली तरी, आणि आपण शस्त्रसज्ज होऊन तिबेटच्या मदतीस जाऊ शकत नसलो तरी भारताने तिबेटची स्वायत्तता मान्य करून तशी ती घोषित करावयास हवी होती आणि त्याच बरोबर 'तिबेटची मुक्ति ही शुद्ध लबाडी असून चीनचे ते तिबेटवर उघडे नागडे आक्रमण आहे' ही गोष्टही लोकसभेत घोषित करावयास हवी होती. भारताच्या या कृतीने तिबेटवर न्याय झाला असता आणि भारताचीही अब्रू राहिली असती.

एखाद्या देशाला दुसरा एखादा देश मदत करू शकत नसला तरी तो काही त्याचा दोष अथवा गुन्हा ठरू शकत नाही. परंतु मदत करणे तर दूरच, उलट एखाद्या देशाची न्यायाची बाजूच जर आपण दुर्लक्षू लागलो तर मात्र तो भयंकर गुन्हा आहे.

भारताने तिबेटच्या बाबतीत हा गुन्हा केला आहे. भावी काळातील राज्यकर्ते निदान हा कलंक धुवून काढतील अशी आपण आशा करू या !

● ● ●

तिबेटच्या शांततापूर्ण मुक्ततेसाठी चीनने तिबेटशी दि. २३ मे १९५१ रोजी सतरा कलमी करार केला त्याचा तपशील :

तिबेटचे राष्ट्रीयत्व हे ऐतिहासिक कालापासून चीनच्या राष्ट्रीयत्वाशी एकरूप झालेले आहे. त्याने ऐतिहासिक काळामध्ये आपल्या मातृभूमीसाठी अनेक ललामभूत गोष्टी केलेल्या आहेत. परंतु गेल्या शतकात साम्राज्यवाद्यांनी चीनमध्ये आणि तिबेटमध्ये अनेक दहशतवादी कृत्ये केली आणि चीनमधील तथाकथित राष्ट्रीय सरकारने या साम्राज्यवाद्यांशी हातमिळवणी करून चीनचे एकात्म विस्कळित केले. त्यातच तिबेटचे आणि चीनचे संबंध विस्कळित झाले. याच्याच जोडीलां तिबेटमधल्या सरकारनेही राष्ट्रविघातक भावनेचा अंगीकार करून आपल्या मायभूमीची प्रतारणा केली. अशा परिस्थितीत तिबेटी जनतेला एक प्रकारच्या गुलामगिरीतच दिवस काढावे लागले आणि अनेक दु:खांना तोंड द्यावे लागले. परंतु १९४९ साली चीनची क्रांति सफल झाली आणि घरगुती शत्रू असलेले चीनमधले प्रतिगामी सरकार उलथले गेले तसाच छुप्या साम्राज्यवादी शक्तींचाही नायनाट केला गेला. चीनच्या गणराज्याची स्थापना झाली आणि चीनच्या लोकांचे प्रातिनिधिक सरकार अस्तित्वात आले. या सरकारने अशी घोषणा केली की, चीनच्या विस्कळित झालेल्या साम्राज्याची आता पुनर्रचना केली पाहिजे आणि साऱ्या साम्राज्यातून प्रतिगामी शक्तींचे उच्चाटन केले पाहिजे. तेव्हापासून तैवान आणि तिबेट सोडून सर्व भागांचे लोकसत्ताक चीनमध्ये एकत्रीकरण झालेले आहे.

चिनी लोकसत्ताक सरकारच्या आधिपत्याखाली हे निरनिराळे घटक संपूर्ण स्वातंत्र्य, समता आणि आपल्या नैसर्गिक हक्कांचा उपभोग घेत आहेत. याच दृष्टिकोनातून पाहिले असता तिबेटमध्ये अजून प्रतिगामी साम्राज्यवादी शक्तींचा संपूर्ण नायनाट झालेला नाही. तेव्हा तेथील नागरिकांना धर्म, संस्कृति, स्वातंत्र्य यांचा लाभ व्हावा म्हणून त्यांची मुक्ती करणे आवश्यक आहे.

त्यासाठी लोकमुक्तिसेनेला आम्ही तिबेटमध्ये पाठवीत आहोत. (People's Liberation Army ) तसेच लोकसत्ताक चीनच्या अधिकाऱ्यांशी शांततापूर्ण बोलणी करण्यासाठी आम्ही तिबेटमधील जबाबदार शिष्टमंडळाला आमंत्रण देत आहोत.

एप्रिल १९५१ मध्ये तिबेटचे शिष्टमंडळ पेकिंगमध्ये येऊन दाखल झाले. चिनी राज्यकर्त्यांनीही काही जबाबदार व्यक्तींचे मंडळ स्थापून या तिबेटी शिष्टमंडळाशी वाटाघाटी केल्या. त्या वाटाघाटी-मधून खालील १७ कलमी करार अस्तित्वात आलेला आहे. त्यावर दोन्ही शिष्टमंडळांच्या प्रमुखांच्या सह्या आहेत, आणि जो करार 'आमच्याकडून धाकदपटशा, आणि जुलूम जबरदस्तीने' करवून घेतला असे नंतर दलाई लामा यांनी निवेदन केले तोच हा सतरा कलमी करार असा आहे.

१. तिबेटी लोकांनी एकत्र येऊन आक्रमक साम्राज्यवादी शक्तींचा नायनाट करावा आणि आपल्या मायभूमीशी संलग्न होण्यासाठी लोकसत्ताक चीनच्या छत्राखाली यावे.

२. तिबेटच्या स्थानिक सरकारने राष्ट्रीयत्वाच्या रक्षणासाठी तिबेटमध्ये शिरलेल्या लोकमुक्तिसेनेला (People's Libeartion Army) मदत करावी.

३. लोकसत्ताक चीनच्या राजकीय सल्लागार समितीने (CPPCC) नियोजित केलेल्या कार्यक्रमानुसार आपली प्रगति साधण्याचा तिबेटी लोकांना हक्क राहील. या हक्काची मर्यादा चिनी लोकसत्ताक सरकारच्या अधि-कारात राहून सांभाळली जावी.

४. मध्यवर्ती नेतृत्व तिबेटच्या राजकीय अधिकारात ढवळा-ढवळ करणार नाही. तसेच हे नेतृत्व दलाई लामा यांना मिळालेल्या कोणत्याही अधिकारात ढवळाढवळ करणार नाही. निरनिराळ्या श्रेणींचे अधिकारी आपापले अधि-कार अबाधित राखून काम करण्यास स्वतंत्र राहतील.

५. पंचेन लामांचेही सर्व अधिकार अबाधित राहतील.

६. दलाई लामा आणि पंचेन लामा यांच्या अधिकाराच्या कक्षा, तेराव्या दलाई लामा आणि नवव्या पंचेन लामा

यांना होत्या तशा राहतील. आपसातील त्यांचे संबंधही त्यानुसारच राहतील.

७. CPPCC च्या कार्यक्रमात ठरल्यानुसार धार्मिक स्वातंत्र्याचे धोरण राहील. धार्मिक भावना, रूढी आणि शिष्टाचार यांचे पालन केले जाऊन लामांच्या मठांचे संरक्षण केले जाईल. मठांच्या उत्पन्नात मध्यवर्ती सरकार कोणतेही बदल करणार नाही.

८. तिबेटी लष्कर हळू हळू लोकमुक्तिसेनेमध्ये विलीन केले जाईल. आणि नंतर हे लष्कर लोकसत्ताक चीनच्या लष्कराचा एक भाग समजले जाईल.

९. तिबेटमधील परिस्थितीनुसार तिबेटी बोली आणि लेखी भाषेचे संवर्धन केले जाईल. तसेच तेथील शाळांच्या स्थितीमध्ये देखील सुधारणा केली जाईल.

१०. तिबेटमधील राहणीमान, शेती, उद्योगधंदे आणि व्यापार यामध्ये देखील हळूहळू सुधारणा घडवून आणली जाईल.

११. निरनिराळ्या सुधारणा घडवून आणण्याच्या कामी तिबेटी जनतेवर चीनची मध्यवर्ती सत्ता बळजबरी करणार नाही. तिबेटचे स्थानिक सरकार आपल्या कार्यक्रमानुसार सुधारणा घडवून आणू शकेल किंवा मध्यवर्ती सरकारच्या सल्लामसलतीने आणि तिबेट मधल्या प्रमुख व्यक्तींच्या सल्ल्याने अशा सुधारणा घडवून आणता येतील.

१२. पूर्वीच्या साम्राज्यवादी अथवा कोमिंगटांग सरकारवादी व्यक्ती जर त्यांनी घातपाती कारवाया आरंभिल्या नाहीत तर त्यांना पूर्वीप्रमाणेच त्यांचे हक्क उपभोगिता येतील.

१३. लोकमुक्तिसेना तिबेटमध्यें आल्यावर ती वरील सर्व करारांचे आणि भावनांचे काटेकोर रीतीनें पालन करील आणि तेथील खरेदी आणि विक्रीच्या संदर्भात हीं सेना तेथील लोकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय करणार नाही.

१४. चिनी लोकसत्ताक सरकारने परराष्ट्रविषयक सर्व अधिकार आपल्या ताब्यात घेतले आहेत. सर्व शेजारी राष्ट्रांशी या सरकारचे मित्रत्वाचे संबंध राहतील आणि समान तत्त्वावर या देशांशी हे सरकार व्यापार वाढविण्याचा प्रयत्न करील.

१५. वरील करारांची अंमलबजावणी करण्यासाठी चिनी सरकार एक लष्करी आणि प्रशासकीय मंडळाची नियुक्ति करील. या लष्कराचे मध्यवर्ती ठिकाण तिबेटमध्ये असेल. आणि तिबेटी लोकांच्या सहकार्याने हे मंडळ आपले काम चालवील.

१६. या मंडळाच्या दैनंदिन कारभारासाठी आणि लोकमुक्तिसेनेसाठी लागणारा पैसा मध्यवर्ती सरकार पुरवील, मात्र तिबेटने त्यांच्या सर्व सुखसोयी पाहण्यासाठी त्यांना मदत करावयाला पाहिजे.

१७. हा करार, यावर उभय प्रमुखांच्या सह्या होता क्षणीच अंमलात येईल.

या करारपत्रकावर दोन्ही शिष्टमंडळांच्या सभासदांच्या सह्या दि. २३ मे १९५१ रोजी झाल्या.

या करारनाम्यानें तिबेटचे भवितव्य कायमचे ठरविले गेले. पूर्वी निवेदन केले आहेच की हा करारनामा चिनी सत्तेने बळजबरीने तिबेटी प्रमुखांकडून करवून घेतला होता. दलाई लामा जेव्हा गुप्त मार्गांनी भारतात येऊन दाखल झाले तेव्हा त्यांनी या करारनाम्या-विषयी मुक्तपणे खरे निवेदन केलेले आहेच.

अशा रीतीने तिबेटचा प्रश्न कम्युनिस्ट चीनने मोठ्या कौशल्याने आणि मर्यादित धाडसाने मिटवून टाकला. आणि जगातील बलाढ्य स्वतंत्र राष्ट्रे फक्त एकमेकांच्या तोंडाकडेच पाहात राहिली. तिबेटच्या मुस्कटदाबीविषयी इंग्लंडने मात्र यूनोच्या आमसभेमध्ये तिबेटच्या बाजूने आवाज उठविला होता, परंतु ज्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन या जगाच्या पाठीवर यूनोनें जन्म घेतला आहे, तीं ध्येयपूर्ती साधण्याचे बळ अजूनपर्यंत यूनोला प्राप्त झालेले नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

भारताने तर तिबेटच्या स्वातंत्र्याचे बलिदान नुसतेच डोळ्यांनी पाहिले नाही तर त्या बलिदानाची वेदी चिन्यांनी भारतापुढेही धर-लेली आहे ही गोष्ट तिबेटचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या लक्षात आली नाही.

तिबेटमध्ये चिन्यांनी १९५९ साली रक्तक्रांति घडवून आणली. आणि ज्या थाटात त्यांनी ' तिबेट हा चीनचा एक अविभाज्य भाग आहे ' अशी घोषणा केली त्याच वेळी त्यांनी भारताची २५०० मैलांची सरहद्दही टाचेखाली दाबून ठेवली होती.

इकडें तिबेट घशाखाली घालून चीनने आपली दृष्टि भारतीय सरहद्दीवर रोखली. ज्या साम्राज्यशाहीचा धिःक्कार करून तिबेटचा प्राचीन इतिहास चिन्यांनी पुसून टाकला होता, त्याच ब्रिटिश साम्राज्यशाही वर्तनाचा पुन्हा एकदा धिःक्कार करीत त्यांनी मॅक्-माहोन रेषेंने निश्चित होणारी सरहद्द नाकारली आणि भारताच्या हजारो मैल सरहद्दीवरील प्रदेशाची मागणी केली.

१९५९ सालापासून ६१ सालापर्यंत कधी आक्रमण तर कधी शिष्टाई; कधी नकाशातील बदल तर कधी गोड गोड पत्रव्यवहार

अशा जाळ्यात त्यांनी भारतीय नेत्यांना गुंतवून ठेवले. मग तिबेटचा आपण गिळलेला घास संपूर्णपणे आपल्या पचनी पडलेला आहे याची जेव्हा त्यांना खात्री पटली तेव्हा पुढील कार्यक्रम म्हणून चिन्यांनी १९६२ मध्ये भारतावर अगदी उघड उघड आक्रमण केले.

चीनचे भारतावर झालेले आक्रमण, हा काही या लेखाचा विषय नाही. तेव्हा त्याची चर्चा अर्थातच येथे अभिप्रेत नाही.

येथें फक्त एवढेच नमूद करावयाचे आहे ते हे की तिबेटच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या कामी भारताने घेतलेल्या मूर्खपणाच्या भूमिकेचे प्रायश्चित्त म्हणून १९६२ सालचे आक्रमण आमच्यावर झालेले आहे ही गोष्ट आपणास कधीही नाकारता येणार नाही !

इतकेच नव्हे तर भविष्य काळामध्ये चीन भारताचा जो इतिहास घडविणार आहे, त्यामध्ये तिबेटच्या बाबतीत आपल्याकडून झालेली चूक किती अक्षम्य होती हा इतिहास आमच्या भावी पिढीला वाचावाच लागेल यात काहीच शंका नाही !



डॉ. हो ची मिन्ह



अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री डल्लेस



दलाई लामा आणि पं. नेहरू



माओ त्से तुंग आणि दलाई लामा




जनरल मॅक्‌ऑर्थर आणि प्रेसिडेंट ट्रुमन



मार्शल स्टॅलिन



जनरल नाशासुन



डॉ. अब्दुल रहेमान सुकार्नो



जनरल सुहार्टो



जनरल डग्लस मॅकुऑर्थर

# कोरिया



# ३

पंचवीस जून १९५० रोजी उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केले. १९४१ च्या अखेरपासूनच मोठाल्या राष्ट्रांच्या आपसातील संबंधाबाबत तणातणीचे वातावरण निर्माण होऊ लागलेले होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात पूर्व विरुद्ध पश्चिम असा अटोतटीचा सामना, कधी शब्दांच्या माध्यमामधून तर कधी थंड्या लढाईच्या मार्गाने खेळला जाण्यास सुरुवात झालेली होती. दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि भरात आले तेव्हा जगातील बलाढ्य शक्तींचे लक्ष फक्त हिटलर आणि मुसोलनी यांच्या हालचालीवरच प्रामुख्याने केंद्रित झालेले होते. भस्मासूराचा अवतार घेऊन जगाच्या प्रांगणात नंगा नाच सुरू केलेल्या या दोन पाशवी शक्तींचा नायनाट केलाच पाहिजे अशी दुसऱ्या महायुद्धकाळातील प्रमुख भावना होती.

या एकाच नादाचे वेड लागलेले असल्यामुळे जगातल्या राजकीय दृष्टीने प्रमुख असलेल्या शक्ती आपसातील मतभेद विसरल्या होत्या आणि एकत्र येऊन या दोन असुरांचा नायनाट करण्याच्या उद्योगाला लागल्या होत्या. परंतु ही एकी फार काळ टिकू शकली नाही. ही एकी टिकून राहावी असे यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे प्रवाह देखील एकाच दिशेने वहात नव्हते. म्हणून दुसरे महायुद्ध संपले आणि काही

काळच आंतरराष्ट्रीय शांततेचें प्रस्थापन झाले आहे असे वाटले. ते वाटते न वाटते तोच शांततेचे वातावरण पातळ पातळ होऊ लागले.

पूर्व आणि पश्चिम असे दोन राजकीय गट आंतरराष्ट्रीय राजकारणात आकार घेऊ लागले. त्यांच्या कडा जास्तीत जास्त स्पष्ट होऊ लागल्या. या राजकीय नाटकाची सुरुवातच किती नाटयपूर्ण झाली पहा!

दुसरे महायुद्ध संपल्यावर जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रांना शांततेचे भलतेच मोल वाटू लागले. त्यांच्या या भावनेमधूनच यूनोचा जन्म झाला! म्हणजे एकीकडे यूनोची कचेरी वाढू लागली आणि दुसरीकडे थंडया युद्धाचे परिसरही वाढू लागले!

दक्षिण कोरियावर उघड उघड झालेले आक्रमण हे या दोन शक्तींमधील वैराने गाठलेला उच्चांकच म्हणावा लागेल! तसेच यूनोच्या कार्यक्षमतेची कसोटी पाहण्याचे कोरियाचे युद्ध हे एक निकषच ठरावे असाही हे युद्ध सुरू करण्यामागे हेतु असावा असे समजण्याइतका पुरावा हस्तगत झालेला आहे.

म्हणून कोरियाच्या युद्धापाठीमागची पार्श्वभूमी आणि त्या पार्श्वभूमीवरून व्यक्त होऊ पाहणारे, जगातील निरनिराळ्या राजकीय हालचालींचे रंग याची संपूर्ण संगती लावता यावी म्हणून कोरियाची अंतर्बाह्य ओळखच आपण करून घ्यायला हवी.

जवळ जवळ दोन हजार वर्षांपासून कोरियाचे चीनशी संबंध असल्याचे दिसून येते. चीनच्या सावलीखालीच जणू या देशाची वाढ झालेली आहे. कोरियाचे राजे चिनी सम्राटांकडून आपल्या अधिकारांची प्रतिष्ठापना करून घेण्यात धन्यता मानीत असत! ज्या ज्या वेळी चीनवर बाहेरून आक्रमणे झाली. त्या त्या वेळी त्या आक्रमणाची झळ कोरियालाही लागलेली आहे.


परंतु तीनशे वर्षांपूर्वी जपानने चीनवर आक्रमण केले. त्याचा परिणाम म्हणून तेव्हापासून कोरियाने आपले धोरण बदलले. राजकीय संबंधांचा संन्यास घेतलेले राष्ट्र म्हणून कोरियाने भूमिका घेतली. त्याने चीनशी असलेले आपले राजकीय संबंध स्थगित केले

आणि इतर कोणाशीही राजकीय संबंध ठेवले नाहीत. व्यापारी संबंध काय थोडेफार येतील तेवढेच ! हा राजकीय एकांत जवळ जवळ १९ व्या शतकाच्या शेवटपर्यंत टिकला.

पाश्चात्य शक्तींनी जेव्हा चीन, जापान आणि कोरियामध्ये शिरकाव करून घेतला तेव्हा कोरिया हा किती दुबळा देश आहे हे उघड झाले ! शासकीय आणि आर्थिक दृष्टीनेही कोरिया एक रक्त-क्षय झालेल्या माणसासारखा देश होता ! १९०५ मध्ये रशिया–जपान युद्धात जपानला जय मिळाला तेव्हा कोरिया जपानच्या आधीन होऊन राहिला ! १९१० साली जपानने कोरियाला आपल्या खिशात घातले आणि पुढील पस्तीस वर्षे तो जपानी सत्तेखालीच राहिला.

यानंतर पाश्चात्यांचा प्रभाव जपानच्या मार्गाने येऊन कोरिया-वर पडला. आणि त्यामुळे कोरियाचे जीवनमान, तसेच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. सामाजिक नीतिनियम, धर्म आणि रूढी आणि सरकारी कारभाराची पद्धत या साऱ्यांमध्ये, पाश्चिमा-त्यांच्या आगमनामुळे उलथापालथ झाली. वरील सर्व गोष्टींमध्ये नवीन पर्यायांचा स्वीकार करण्याच्या बाबतीत कोरियाने खिळखिळ केली. काही सुधारणांचा अंगीकार केला काहींचा धिःक्कार केला; काही पौर्वात्यांचे संस्कार घेतले, काही पाश्चात्यांचे घेतले. थोडक्यात म्हणजे कोरिया हा देश या काळात पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानाची, राजकारणाची आणि सुधारणांची खिचडी बनला. परंतु या बाबतीत एका गोष्टीचा मात्र आवर्जून उल्लेख करावा लागेल. ती गोष्ट म्हणजे एवढ्या साऱ्या निरनिराळ्या प्रभावांचा स्रोत अंगावर घेऊन देखील कोरियाने आपली भाषा आणि आपले राष्ट्रीयत्व यांचा त्याग केला नाही. जपानने अनेक वेळा अनेक प्रकारे कोरियन जनतेमधील राष्ट्रीयत्वाची भावना नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये त्यांना यश आले नाही !

जपानने तेथे एक सरकार स्थापन केले होते. त्या सरकारचा गव्हर्नर जनरल प्रामुख्याने जपानी सैन्यातील अधिकारी होता.


रशिया
व्हलाडिहोस्टॉक
मांचुरिया
यालु नदी
उत्तर कोरिया
पियांगयांग
३८ अक्षांश
सेऊल
दक्षिण कोरिया
जपान

कोरियाच्या नागरिकांपैकी काही सभासद या सरकारला साह्य देत असत, परंतु त्यांना विशेष सत्ता मिळत असे असे नाही. जपानमध्ये शिक्षण घेतलेले काही कोरियन लोक या सरकारात होते; परंतु त्यांना उच्चाधिकार मात्र दिले गेलेले नव्हते. लोकसत्ताक राज्याची भावना या लोकांमध्ये निर्माण होऊ नये याची मात्र जपान सरकार फार काळजी घेत असे. प्रमुख राष्ट्रवादी कोरियन लोकांनी मात्र कोरियाचे जपानीकरण होण्याविरुद्ध प्रतिकार केलेला आहे. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीसाठी या लोकांनी बऱ्याच चळवळी केलेल्या आहेत. संपूर्ण स्वातंत्र्य नसले तरी निदान प्रचलित राज्यपद्धती उदार व्हावी असे प्रयत्न त्यामध्ये होते.

जपान्यांनी आशियातील कित्येक देश जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगलेली होती आणि त्या मोहिमेत यशही मिळविले होते. या त्यांच्या कार्यात कोरियाला फार महत्त्व प्राप्त झालेले होते. कारण येथूनच इतर जिंकलेल्या देशासाठी मनुष्यबळ, अन्न, कच्चा माल आणि इतर कित्येक वस्तूंची निर्यात जपानला करता येत असे. कोरियाची आर्थिक प्रगती केवळ जपानच्या उदारतेवर अवलंबून होती. याच वसाहतवादाच्या काळात आशियातील इतर देशां-प्रमाणेच कोरियाचे अनेक प्रश्नही तीव्र होत गेले.

सर्वात प्रमुख प्रश्न कोरियापुढे होता तो जमिनीचा. कोरियाचे क्षेत्रफळ ८५ हजार चौरस मैलांचे आहे. परंतु त्यापैकी फारच थोडी जमीन लागवडीसाठी योग्य अशी आहे. कोरियाची तीन कोटींची लोकसंख्या एक पंचमांश क्षेत्रफळात सामावलेली आहे. उत्तर, मध्य आणि दक्षिण कोरियामध्ये उंच उंच पर्वताच्या रांगा उभ्या आहेत. या रांगांच्या जाळ्यातून वाचलेली अशी फार थोडी जमीन पठारांच्या स्वरूपात शिल्लक आहे. आणि पठारे देखील फार सुपीक नाहीत. तसेच धान्यउत्पादनासाठी कोरियाचे हवामानही प्रतिकूलच आहे. कोरियाचा उत्तर भाग हा धान्योत्पादनाच्या दृष्टीने अनुकूल हवामान नसलेला भाग समजला जातो. तेथे थंडी अत्यंत कडाक्याची असते.

त्या मानाने दक्षिण कोरियाचे हवामान साधारण अनुकूल आहे. उन्हाळ्यात होणारी पर्जन्यवृष्टी तांदुळाच्या पिकास चांगली आहे.

मात्र त्यात आश्चर्याची गोष्ट अशी की, सबंध कोरियाचे हवामान शेतीसाठी अनुकूल नसले तरी पण त्याच्या लोकसंख्येपैकी ८५% लोकसंख्या शेतकरी आहे !

जमिनीची ही अशी परिस्थिती. तसेच हवामान शेतीला प्रतिकूल आणि तरीही तेथील नागरिकांवर शेतीवरच पोट भरण्याची आलेली पाळी या सर्व बाबींचा विचार केल्यास तेथील नागरिकांची आर्थिक परिस्थिती कशी असेल याचा विचारच केलेला बरा ! त्यातही जपानी लोकांनी जमिनीच्या सारा पद्धतीत केलेली वाढ आणि कूळ व जमीनमालक यांच्या संबंधात निर्माण केलेली विषमता यामुळे तेथील शेतीवर परिणाम होणे अपरिहार्य होते. तसेच जपान्यांनी तेथील मोठमोठाल्या जमिनी आपल्याकडे कसण्यासाठी घेतलेल्या असल्यामुळे सामान्य गरीब नागरिकांची आर्थिक परिस्थिती काय स्वरूपाची असेल याची कल्पना करावी.

भारतात देखील ब्रिटिश आमदनीच्या काळात जमिनीची जी परिस्थिती होती, मोठमोठाल्या जमिनी जरी प्रत्यक्षपणे ब्रिटिशांनी, कोरियातील जपान्यांसारख्या स्वतःच्या ताब्यात ठेवलेल्या नसल्या तरी जमीनदारी, बक्षीसपत्रे, वतनदारी तसेच संस्थानिकांना सर्फेखास ( स्वतःसाठी खर्च ) अशा निरनिराळ्या मार्गांनी जमिनी गुंतवून टाकलेल्या होत्या. त्यामुळे भारतातील बहुसंख्य सामान्य शेतकरीवर्ग हा प्रत्यक्ष जमीन कसणारा असला तरी स्वतःच्या जमिनी अभावी त्याला वरील जमीनदारांच्या जमिनीमध्ये दोन वेळच्या भाकरीवारी मेहनत करावी लागत होती. म्हणजे जमीन कसणारा शेतकरी आणि काहीही न करता वारेमाप नफा खाणारा जमीनदार असे विषम गणित होऊन बसलेले होते. आज जसा कारखानदार आणि कामगार यांचे संबंध आणि स्थिती आहे तशी पूर्वीच्या काळात जमीनदार आणि कसणारा शेतकरी यांच्यातले नाते आणि स्थिती होती. फरक एवढाच, की शेतकरीवर्ग हा अशिक्षित, अज्ञानी होता आणि आजचा

कामगारवर्ग थोडा शिक्षित आणि तीव्र भावना असलेला आहे. परंतु असे असून देखील तो आज विसाव्या शतकात देखील अर्धपोटी ठेवून कामाखाली धोपटला जात आहेच ना? मग भारताच्या आणि कोरियाच्या पराधीनतेच्या काळातील एकोणिसाव्या शतकात ही परिस्थिती किती तीव्र असेल याची सहज कल्पना येईल!

कोरियामध्ये प्रामुख्याने भातशेती चांगली होत होती. मोठमोठाल्या जमिनींमध्ये भाताची पिके काढली जात होती आणि त्यासाठी कृत्रिम खतांची आयात जपानमधून होत होती. परंतु हा सारा तांदूळ जो पिकत होता तो कोरियन जनतेसाठी नव्हता तर जपानसाठी होता. कोरियाने तांदूळ पिकवावा आणि जपानने तो भरून न्यावा. आणि कोरियन जनतेने आपल्या पोटात भरण्यासाठी मांचुरियाकडून बाजरी–नाचणीसारखे हलके धान्य आयात करावे. अशी ही श्रमविभागणी आणि अन्नविभागणी होती! त्यात पुन्हा लोकसंख्येतही भर पडत होती. १९१३ मध्ये कोरियाची लोकसंख्या एक कोटी पंचावन्न लाख होती, ती १९५० मध्ये तीन कोटी झाली; म्हणजे चाळीस वर्षांत ती दुप्पट झाली होती!

सुपीक जमिनीची कमतरता आणि लोकसंख्येत झपाट्याने होणारी वाढ याचा परिणाम देश गरीब होण्यात होणे अपरिहार्य होते. शिवाय वर निवेदन केल्याप्रमाणे ज्या पद्धतीने जमिनी कसण्याचे आणि पीक काढण्याचे तंत्र अवलंबिले गेले होते ती पाहता देशावरचा गरिबीचा डाग धूवून निघणे कसे शक्य होते? तीस वर्षांतील जपानी अम्मल हा असा होता!

जपान जेव्हा युद्धतयारीला लागला तेव्हा मात्र त्याच्या या वसाहतीमध्ये औद्योगिक विकास घडवून आणणे त्याला आवश्यक झाले. हळूहळू घरगुती उद्योगधंदे मावळून त्यांची जागा मोठाल्या उद्योग धंद्यांनी घेतली. कारखानदारी आली, दळणवळणाची साधने वाढली, यालू नदीवर बाऊल्डर धरण बांधले (Boulder Dam) गेले. त्यापासून प्रचंड वीजशक्ति निर्माण केली गेली.

युद्ध सुरू झाले तेव्हा थोड्या फार प्रमाणात कोरियाला झीज

सोसावी लागली. परंतु जपानच्या पाडावानंतर कोरियावर अमेरिकेचा प्रभाव वाढला आणि अमेरिका जपान अशी युति कोरियाच्या कुंडलीवर पसरली. आणि जमीन, लोकसंख्या आणि राहणीमान हे प्रश्न सुटण्यात कोठूनही वाट मोकळी होऊ शकली नाही! उलट अडतीस अक्षांशावर कोरियाची फाळणी झाली आणि या अडचणी-देखील तेव्हापासून खूप मोठ्या प्रमाणात वाढविल्या गेल्या. ही रेषा अगोदर अमेरिका आणि रशिया यांच्यातील सत्तातोलाची सरहद्द म्हणून अस्तित्वात आली. तेव्हा युद्धामध्ये जपानने शरणागती पत्करली असल्यामुळे कोरियाची मालकी जणू काही अमेरिकेकडे आलेली होती!

दुसऱ्या महायुद्धानंतर बदललेल्या परिस्थितीचे हे चित्रण आहे. कोरियाच्या पटावर दुसरीच प्यादी आपला खेळ रंगवू लागली होती. १९४५ साली पोटसडॅम येथे रशिया आणि अमेरिका यांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये बोलणी झाली आणि याच बैठकीत ३८ अक्षांश या रेषेविषयी चर्चा झाली होती असे अनुमान होते किंवा फेब्रुवारी १९४५ रोजी याल्टा येथील बैठकीत ती झालेली असावीत! परंतु काहीही असले तरी जपानच्या पाडावानंतर कोरियाची सर्व परिस्थिती हाता-ळण्याची मालकी अमेरिकेकडे आलेली होती हा इतिहास आहे. अगोदर ३८ अक्षांशाच्या निमित्ताने त्यांनी अगोदर एक सर्वसाधारण अशी आखणी करून घेतली आणि सेऊल ही कोरियाची राजधानी अमेरि-केने आपल्या हातात ठेवली. या सर्व बनावाला ३८ अक्षांश ही विभा-गणी दोघांनाही योग्य वाटली.

परंतु त्यात खरे राजकारण असे होते की या विभागणीने कोरियाचे दोन तुकडे व्हावेत आणि त्याच्या आर्थिक, राजकीय, सामा-जिक आणि दळणवळणविषयक शक्ती विस्कळीत व्हाव्यात! ऐक्य लोप पावावे. साम्राज्यवाद्यांचे हे नेहमीचेच धोरण आणि ओळखीचेच झालेले डावपेच होते.

संपूर्ण कोरियाची मिळून जी एकता होती, जी शक्ती होती; व्यापाराच्या, शेतीच्या आणि उद्योगधंद्याच्या बाबतीत जे एकमेका-

मध्ये सहकार्य होते ते सारे या ३८ अक्षांशाने खिळखिळे करून टाकले. बैलाचे निर्बीजीकरण करून त्याला आपल्या कामासाठी गुलाम करावे तसे कोरियाचे झाले होते !

रशिया आणि अमेरिकेमध्ये बेबनाव होण्याला कोरिया कारणीभूत झाला. कोणत्याही विषयावर त्या दोघांमध्ये एकमत होणे शक्य नव्हते. मतभेदाचे विषय त्यांच्या चर्चेच्या प्रांतात येतच नव्हते. दुर्दैव या दोन राष्ट्रांचे होते आणि कोरियाचे अधिक होते ! कोरियाच्या राजकारणाशी रशियाचा अनेक वर्षे संबंध आलेला होता. गेल्या शतकात जे सत्तावर्चस्वाचे कारस्थान खेळले गेले होते त्याच्याशी कोरियाचा संबंध फार निकटचा आलेला होता. १९०४–१९०५ मध्ये जे जपान–रशिया यांच्यामध्ये युद्ध झाले त्यामध्ये रशियाची शक्ती पणाला लागली होती आणि त्या पणात रशियाला हारही खावी लागलेली होती. दुसऱ्या महायुद्धामध्ये जपानने हार खाल्ली तेव्हा रशियाने १९०४—०५ साली आपली जी स्थिती झाली होती तिचा वचपा काढला आणि १९०४ पूर्वी रशियाची जी सत्ता व हक्क होते त्यांची आता यावेळी त्याने मागणी केली ! कोरियाचा संबंध रशियाशी आला तो फक्त रशिया हे राष्ट्र कोरियापासून केवळ अकरा मैलांच्या अंतरावर आहे म्हणून ! व्हलाडिव्होस्टाक (Vladivostok) हे कोरियाच्या बंदरापासून फक्त शंभर मैल अंतरावर आहे. रशियाच्या म्हणण्याप्रमाणे १९३७ मध्ये १,७०,००० कोरियन लोक सैबेरियात राहात होते. त्यामधील काहीजण सरहद्दीच्या प्रांतात कायमचेच रहिवाशी झालेले होते आणि काहीजण राजकीय कारणासाठी हद्दपार झालेले होते. या संख्येतील जो तरुणवर्ग होता तो बहुतांशाने कम्युनिस्ट होता. त्याचप्रमाणे आणखी बहुसंख्य कोरियन लोक जपानमध्ये, चीनमध्ये आणि काही खुद्द कोरियात होते. हे सारे प्रामुख्याने कम्युनिस्टच होते. या व्यतिरिक्त रशियाला कोरियाविषयी आणखी जवळीक होती ती व्यापारविषयक स्वार्थबुद्धीची होती.

कोरियाभोवती ज्या निरनिराळ्या शक्ती होत्या त्यांचा विचार करता कोरिया कोणत्याही एका शक्तीच्या हातातील बाहुले-

होणे राजकीय सत्तातोल राखण्याच्या दृष्टीने इष्ट नव्हते ! जपानची मुख्य भूमी कोरियापासून १२० मैलांवर होती. ही कोरियाच्या आग्नेय दिशेकडील शक्ती. चीनचे शांटुंग द्वीपकल्प कोरियाच्या पश्चिमेकडे तेवढ्याच अंतरावर होते. आणि मांच्यूरिया हा कोरियाच्या उत्तर सरहद्दीला, रशिया भिडतो तेवढा भाग सोडून भिडलेला आहे,

ही चतु:सीमा लक्ष्यात घेतल्यावर सत्तास्पर्धेच्या दृष्टीने कोरियाचे काय महत्त्व आहे हे सहज लक्ष्यात येऊ शकेल !

कोरियामध्ये रशियापेक्षा अमेरिकेचे हितसंबंध कमी होते. कारण दुसऱ्या महायुद्धापूर्वी इतरांशी अमेरिकेचे संबंध मुख्यत: मानवतावादी आणि अंशत: आर्थिक नात्याचे होते. तसेच कोरिया हा अमेरिकेपासून खूप दूर असलेला देश होता. म्हणून साहजिकच कोरियाशी अमेरिकेचे संबंध कमी दृढ होते. मात्र बरेच कोरियन अमेरिकेतून शिक्षण घेऊन आलेले होते आणि जवळ जवळ बारा हजार कोरियन हवाई आणि कॅलिफोर्निया येथे स्थायिक झालेले होते. अमेरिकन धर्मप्रचारक मात्र कोरियामध्ये इतर धर्मप्रचारकांच्या मानाने अधिक यशस्वी झालेले होते.

युद्धामध्यें अमेरिकेने जपान आणि कोरियाच्या भूमीचा ताबा घेतला तेव्हा अमेरिकन कार्यक्रमाचा कोरिया एक भाग बनला. आणि काही हद्दीपर्यन्त अमेरिकेने कोरियामध्ये जपानची जागा घेतली असे जें म्हटलं जाते ते बरोबर आहे. अळेबळे का होईना, अमेरिकेला शांतता रक्षणाचे कार्य करणारा देश तेव्हा म्हटले जात होते ही गोष्ट अक्षरश: खरी होती ! कोरियाच्या बाबतीत मात्र अमेरिका ही भूमिका घेण्यास तितकीशी खूष नव्हती. याचे कारण कोरियाची लष्करी, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती अमेरिकेला समाधान-कारक वाटत नव्हती. थोडक्यांत म्हणजे तेथे परिस्थितीच अशी निर्माण झालेली होती की कोरिया ही एक डोकेदुखी होऊन बसलेली होती. आणि त्या डोकेदुखीचे औषध अमेरिकेच्या हाताशी नव्हते ! परंतु हा काळही असा होता की नेमका तेव्हाच थंड्या युद्धाचा दाब वातावरणात वाढत होता. आणि लवकरच असे प्रत्ययास आले की

अमेरिका आणि रशिया यांच्यामधला ताण वाढण्यास कोरियाची भूमीच कारणीभूत होत आहे ! प्रखर राष्ट्रवाद असून देखील राजकीय जागृतीच्या किंवा एकात्मतेच्या बाबतीत जपानी आमदानीत कोरियाची काहीही प्रगती होऊ शकलेली नव्हती. कोरियाची मुक्ति झाल्यानंतर स्वातंत्र्याची फळे दीर्घ मुदतीपर्यन्त आपणास उपभोगिता येतील ही कोरियाची कल्पना त्यामुळे दुबळी ठरली होती. जपानने शरणागती पत्करण्याच्या वेळी कोरियामध्ये त्यांच्या लोकांची निरनिराळी मंडळे स्थापन झालेली होती. अर्थात ही मंडळे निवडणूक लढवून अस्तित्वात आलेली नव्हती. या जपानी शरणागतीच्या काळात कोरियातील निरनिराळ्या राजकीय पक्षाचे लोक तुरुंगांतून मुक्त झालेले होते; त्यामध्ये बरेच कम्युनिस्टही होते. हे लोक निरनिराळ्या सभा भरवून लोकांच्या राजकीय आशा–आकांक्षांचा आपण एक भाग आहोत असे दाखवीत असत आणि यापैकीच बहुतेक लोक कार्यकारी मंडळातून देखील काम करीत होते. ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी होती की दुसरे काही खरेखुरे कार्यकर्ते, जमीनदार, व्यापारी, शिक्षक आणि अशापैकीच बरेच लोक, यांनीही आपापली मंडळे बनविली होती आणि हे लोकही कोरियामध्ये कामाला लागलेले होते. या मंडळातील जे अधिकारी लोक होते त्यांच्यावर जनतेचा विश्वास होता.

थोडक्यात म्हणजे अमेरिकेचा या देशात शिरकाव होण्याचे वेळी कोरियामध्ये लोकमंडळे निर्माण झालेली होती. वरीलप्रमाणे ही मंडळे दोन निरनिराळ्या प्रकारची होती. अर्थात यामधील एकावर अमेरिकेचा ताबा किंवा प्रभाव होता तर दुसऱ्या प्रकारच्या मंडळांवर रशियाचा होता !

उत्तर कोरियातील मंडळावर रशियाचा प्रभाव होता आणि दक्षिणेतील मंडळांवर अमेरिकेचा होता. हा प्रभाव टिकविण्यासाठी उत्तर कोरियामध्ये मांच्युरिया आणि उत्तर चीनकडून कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची आवक झाली होती. उत्तर कोरियाच्या प्रतिनिधींनी १९४६ च्या फेब्रुवारीमध्ये एक समिति स्थापन केली आणि तिच्या

साह्याने त्यांनी उत्तर कोरियामध्ये एका कम्युनिस्ट सरकारची स्थापना केली. त्या सरकारचा प्रमुख रशियामध्ये शिक्षण घेतलेला एक तरुण कार्यकर्ता होता. त्याचे नाव किम इल्संग (Kim Ilsung) असे होते.

मध्यंतरीच्या काळात दक्षिण कोरियामध्ये अमेरिकेचे लष्करी सरकार स्थापन होण्यापूर्वी काही दिवस त्या भागावर जपानचा अंम्मल होता. याच दोन वर्षांच्या काळात वर्षानुवर्षे कोरियाबाहेर राहात असलेले कोरियन नागरिक कोरियात परतले होते. हे लोक चीन आणि अमेरिकेतून परतलेले होते. अमेरिकेचे लष्करी सरकार जरी राजकारणात निष्णात असले तरी भाषेचा प्रश्न त्यांना खूप नडत होता आणि त्यामुळे राजकीय व्यवस्थेमध्यें अडथळे येत होते. नेहमीच त्यांना दुभाषांवर अवलंबून राहावे लागत होते. तिकडे रशियन आणि इकडे अमेरिकन कमांडर्स सर्व दृष्टीने आपापली कर्तव्ये पार पाडण्यास दिवसेंदिवस असमर्थ ठरत होते. त्या अडचणींना तोंड देण्यासाठी सोव्हिएट–अमेरिकन अधिकाऱ्यांचे एक कमिशन डिसेंबर १९४५ मध्ये नियुक्त करण्यात आले. या कमिशनने कोरियामधील लोकशाही पक्षांशी विचारविनिमय करून प्रांतिक सरकारांच्या निर्मितीला मदत करावयाची होती. आणि या चार राजकीय शक्तींच्या (रशिया–अमेरिका–चीन आणि जपान) निरीक्षणाखाली स्थापन झालेल्या मंत्रीमंडळांनी पाच वर्षेपर्यंत आपला कारभार करावयाचा होता. आणि त्या सरकारांचा अनुभव जमेला धरून मग एका स्वतंत्र सरकाराची स्थापना करावयाची असे ठरलेले होते. या साऱ्या गोष्टी डिसेंबर १९४५ मध्ये मास्को येथे परराष्ट्र मंत्र्यांची बैठक भरली असता तेथे ठरल्या होत्या आणि एका कराराच्या स्वरूपात त्यावर सह्या झालेल्या होत्या. परंतु हा करार यशस्वी होऊ शकला नाही.

पुन्हा या संयुक्त राष्ट्रांचे कमिशन १९४६ मध्ये एकत्र आले. पुन्हा विचारविनिमय होण्याइतपत त्या कमिशनने प्रगती केली आणि कोरियातील निरनिराळ्या राजकीय पक्षांना भेटण्याच्या बाबतीत रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये मतभेद झाले. रशियाचे म्हणणे

असे होते की मागे ज्या पक्षांनी रशियामध्ये झालेल्या करारांवर आक्षेप घेतले आहेत त्यांच्याशी आता या कमिशनने विचारविनिमय करू नये. परंतु रशियाचा हा विचार अमेरिकेला पटला नाही. अमेरिकेचे म्हणणे याबाबतीत असे होते की, या प्रकारच्या निर्णयामुळे कोरियातील विचारस्वातंत्र्याची मुस्कटदाबी होते.

आणि याही पुढे जाऊन अमेरिकेच्या लष्करी सरकारने एका तात्पुरत्या कायदेमंडळाची देखील रचना केली. त्यासाठी त्याने १९४६ च्या नोव्हेंबरमध्ये कोरियात निवडणुका घेतल्या. अप्रत्यक्ष निवडणुकाद्वारे अर्धे आणि लष्करी गव्हर्नरने नियुक्त केलेले अर्धे सभासद अशांचे एक कायदेमंडळ अस्तित्वात आलें. निवडून आलेल्या सभासदांमध्ये प्रामुख्यानें उजव्या पक्षातील लोक होते आणि नियुक्त केलेल्या सभासदांमध्ये उदारमतवादी उमेदवारांचा भरणा होता. या लष्करी सरकारने कारभार आणि कायदेविषयक अधिकतर जागा कोरियन उमेदवारांकडेच सुपूर्त केल्या होत्या.

दरम्यानच्या काळात पुन्हा अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये विचारविनिमय झाले. आणि २१ मे, १९४७ रोजी एक बैठक भरली. तीमध्ये खूप वादविवाद होऊन, शेवटी कोरियामधील कोणत्या पक्षांना विचारविनिमय करण्यासाठी विश्वासात घ्यावे या पूर्वीच्याच मुद्द्यावर मतभेद होऊन बैठक अयशस्वी झाली. याच वर्षात अमेरिकेने पुन्हा या चार शक्तींनी एकत्र येऊन कोरियाच्या प्रश्नावर विचारविनिमय करावा म्हणून आवाहन केले. अमेरिकेचे हे आवाहन रशियाने धुडकावून लावले तेव्हा कोरियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अमेरिकेने यूनोच्या आमसभेकडे नेला. १४ नोव्हेंबर १९४७ रोजी आमसभेने कोरियाच्या प्रश्नावर मतदान घेतले. (तेव्हा रशिया या मतदानात सहभागी झाला नाही.) आणि कोरिया प्रश्नासाठी यूनोने एका तात्पुरत्या कमिशनची स्थापना केली. या कमिशनने आपल्या निरीक्षणाखाली कोरियातील निवडणुका घ्यायच्या आणि एका राष्ट्रीय समितीची स्थापना करून तिच्या साहाय्याने कोरीयामध्ये स्वतंत्र सरकारची स्थापना करायची. हे काम यूनोने नियुक्त केलेल्या समिती-

कडे सोपविले गेले. या समितीने आपले हे काम अनेक अडचणींना आणि स्थानिक विरोधाला तोंड देऊन बऱ्याच प्रमाणात यशस्वी रीतीने पार पाडले. आमसभेने नियुक्त केलेली ही समिती जेव्हा कोरियामध्ये पोहोचली तेव्हा उत्तर कोरियामध्ये तिच्या कार्याला जबरदस्त विरोध झाला, परंतु तिला मिळालेल्या सूचनेनुसार या समितीने आपले काम दक्षिण कोरियामध्ये चालू ठेवले. या निवडणुका १० मे १९४८ रोजी व्हावयाच्या होत्या.

या काळात समितीचे काम चालू असता कोरियातील राजकीय कारवायांना ऊत आला होता. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी भले बुरे मार्ग अवलंबिलेले होते. डाव्या विचारसरणीच्या पक्षांनी रशियाचा मार्ग अवलंबिला होता. त्याने यूनोनियुक्त समितीवर बहिष्कारच घातलेला होता, परंतु बऱ्याच समजदार व्यक्तींनी आणि त्यांच्या पक्षांनी देखील या समितीशी असहकार पुकारला होता. त्यांनी या बाबतीत दिलेली कारणे मात्र विचार करण्यासारखी आणि पटण्यासारखी होती. त्यांचे म्हणणे असे होते की उत्तर कोरियाचे अशा कार्यवाहीस सहकार्य नसता मुसंडी न्यायाने हे कार्य चालू ठेवले तर दक्षिण विरुद्ध उत्तर हे मतभेद तीव्र होतील. आणि एका देशाचे दोन तुकडे होतील ! काही उदारमतवादी आणि उजव्या पक्षाच्या नेत्यांनी विशेषत: किम कू ( Kim Koo ) आणि किम् कियूसिक ( Kimm Kiusic ) यांनी दक्षिण आणि उत्तर कोरियाची संयुक्त बैठक जी पियाँगयांग ( Pyongang ) येथे भरली होती तेथे एकत्र जमून विचारविनिमय केला. पियाँगयांग हे उत्तर कोरियाच्या राजधानीचे शहर आहे. ही बैठक भरविण्याची कल्पना उत्तर कोरियाच्या नेत्यांच्या डोक्यातूनच निघालेली होती. आणि दक्षिण कोरियाच्या, वर म्हटले त्याप्रमाणे बऱ्याच नेत्यांनी प्रतिसाद दिला होता. बैठकीत फक्त एकाच गोष्टीवर जोर देण्यात आला होता आणि ती गोष्ट म्हणजे यूनोच्या समितीमार्फत होणाऱ्या निवडणुका हाणून पाडणे. परंतु हा विचार सम्मत झाला नाही आणि ही बैठक उधळली गेली.

दक्षिण कोरियामध्ये निवडणुकांची धामधूम सुरू झाली. निर

निराळ्या पक्षांच्या लोकांमध्ये चुरसीचे, अटीतटीचे सामने सुरू झाले. पक्ष तसेच वैयक्तिक असेही स्वरूप प्रचाराला येऊ लागले. हॅंकुक डेमॉक्रॅटिक पार्टीचा ( Hankook Democratic Party ) प्रमुख किम् साँगस् ( Kim Songsoo ) ही एक दक्षिण कोरियामधील प्रभावी व्यक्ती होती. हा माणूस मोठा जमीनदार आणि कारखानदार म्हणून सारे लोक त्याला ओळखीत होते. दुसरा उजव्यांचा एक पक्ष National Association for the Rapid Realization of Korean Independence ) या नावाने ओळखला; जात होता. त्याचा प्रमुख होता. डॉ. सिग्मन ऱ्ही ( Dr. Syngman Rhee ) याचे सारे शिक्षण अमेरिकेत झालेले आणि त्याचे बरेच वास्तव्यही अमेरिकेत झालेले होते. आणखी कोरियन इंडिपेंडन्स पार्टी ( Korean Independence Party ) नावाचा एक पक्ष होता. त्याचा प्रमुख होता किम् कू ( Kim Koo) तसाच तो पूर्वीच्या कोरियन प्रांतिक सरकारचाही प्रमुख होता. या पक्षाने मात्र निवडणुकावर बहिष्कार टाकला होता ! या तीन प्रमुख पक्षांव्यतिरिक्त तेथे इतर शेकडो तरुण या किंवा त्या पक्षाशी संलग्न राहून कार्य करीत होते.

या निवडणुकांमध्यें मतदान होऊन कमी अधिक प्रमाणात निरनिराळ्या पक्षांचे लोक निवडून आले आणि १७ जुलै १९४८ ला घटना समितीची नियुक्ति झाली. तिने अध्यक्ष निवडला आणि डॉ. सिग्मन ऱ्ही यांची अध्यक्ष म्हणून बहुमताने निवड झाली. नंतर २४ ऑगस्टला नव्या सरकारने यूनोच्या समितीला कळविले की अमेरिकेशी निरनिराळ्या प्रकरणी आमचे अनेक करार झालेले असल्यामुळे आता या समितीशी विचारविनिमय करण्याची काही आवश्यकता उरलेली नाही. १५ ऑगस्ट रोजीच लष्करी सरकारने कोरियाच्या कायदेशीर सरकारकडे आपली सर्व सत्ता सुपूर्त केली होती. आणि अमेरिकन सैन्य काढून घेण्याविषयी त्यांच्यामध्ये बोलणी सुरू झालेली होती. अमेरिकेने या कोरियाच्या सरकारला निरनिराळ्या करारान्वये आर्थिक आणि लष्करी मदत देण्याचे अभिवचन दिलेले होते.

घटना समितीने, संपूर्ण कोरिया हा नव्या प्रस्थापित झालेल्या सरकारच्या अधिकाराखाली येत असल्याची घोषणा केली. परंतु प्रत्यक्षत: ३८ अक्षांशापलिकडे आपल्या अधिकाराचा विस्तार वाढविण्यासाठी या सरकारने काही हालचाली केल्या नाहीत. दक्षिण कोरियाच्या सरकारचे अधिकारी उत्तर कोरियाच्या नेत्यांशी समेट करण्याच्या मन:स्थितीत मुळीच नव्हते. १९४८ सालाच्या शेवटी यूनोच्या आमसभेच्या समितीने कोरियामधील घटनासमिती, निवडणुका आणि प्रस्थापित सरकार यासंबंधींचा आपला अहवाल आमसभेला सादर केला. १२ डिसेंबर १९४८ रोजी आमसभेने मतदान घेऊन बहुमताने घोषणा केली ती अशी :

> 'नव्या लोकसत्ताक कोरियाचे सरकार हे कायदेशीर सरकार असून हे सरकार पद्धतशीर निवडणुका होऊन प्रस्थापित झालेले आहे. कोरियाच्या ज्या भागातील लोकांनी मतदान करून आपलें सरकार अस्तित्वात येण्यासाठी मदत केलेली आहे त्या कोरियाच्या भागासाठी हे सरकार अधिकृत सरकार समजले जाईल.'

या आमसभेच्या एका ठरावान्वयें कोरियासाठी एका समितीची नियुक्ति केली गेली.या समितीचे काम कोरियन सरकारला सर्व कोरियात राजकीय ऐक्य घडवून आणण्यासाठी मदत करणे हे होते. १ जानेवारी १९४९ रोजी अमेरिकेने या नव्या कोरियन सरकारला मान्यता दिली आणि पाश्चात्य गटातील बड्या देशांनीही अमेरिकेचे अनुकरण केले.

याची प्रतिक्रिया उत्तर कोरियामध्ये होणे अपरिहार्य होते. तेथील राजकीय कार्यकर्त्यांनी यूनोच्या मध्यस्थीने प्रस्थापित झालेल्या दक्षिण कोरियामधील सरकारचा निषेध केला. त्यांनी १९४६ च्या फेब्रुवारीमध्ये जी उत्तर कोरियासाठी एक तात्पुरती लोक–नियुक्त समितीची स्थापना केलेली होती, त्या समितीतर्फेच त्यांनी एका मंत्रीमंडळाची स्थापना केली. ३ नोव्हेंबर १९४६ रोजी या मंडळाने एका सुप्रीम कोर्टाची स्थापना केली. यूनोच्या समितीवर त्यांनी

बहिष्कार घातल्याचे मागे निवेदन केलें आहेच. ९ सप्टेंबर १९४८ रोजी उत्तर कोरियाने आपलशाही सरकारची स्थापना केली. त्यांच्या राजधानीचे नाव पियांगयांग (Pyongyang) असे होते. किंग इल्संग (King Ilsung) याची पंतप्रधान म्हणून नेमणूक झाली. उत्तर कोरियाच्या कायदेमंडळाने अमेरिकेस आणि रशियास कोरियामधून आपले लष्कर काढून घेण्याची विनंती केली. १९ सप्टेंबर रोजी सोव्हिएटच्या अध्यक्षांनी कोरियाच्या विनंतीला उत्तर पाठविले आणि १ जानेवारी १९४९ पर्यन्त आपले लष्कर कोरियामधून काढून घेण्याचे मान्य केले. नंतर रशियाने उत्तर कोरियाचे लोकसत्ताक सरकारला मान्यता दिली त्याचेच अनुकरण रशियाच्या इतर सहप्रवासी देशांनीही केले !

किंग इल्संग, किम डू वाँग आणि इतर नेत्यांनी मास्कोला भेट दिली आणि आर्थिक व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्याचा करार त्यांनी १९४९ साली केला. याच साली दक्षिण कोरियाने अमेरिकेशी आपले संबंध दृढ केले. इतकेच नव्हे तर दक्षिण कोरियाच्या सल्लागार मंडळावरदेखील काही प्रतिष्ठित अमेरिकन लोकांची नेमणूक झाली आणि कोरियाच्या सरकारमध्येहीं अमेरिकन लोक समाविष्ट झाले.

बऱ्याचशा पाश्चिमात्य देशांनी दक्षिण कोरियाचे सरकार हे सबंध कोरियाचेच सरकार आहे या विचाराला मान्यता दिली. आणि यूनोमध्ये देखील या सरकारला सभासदत्व मिळावे म्हणून खूप राजकारण लढविले, परंतु प्रत्येक वेळेस रशियाचा विरोध आड आला आणि त्यांचे हे राजकारण फसले. कोरियाच्या या सरकारला यूनोच्या अन्न आणि शेतीविषयक तसेच जागतिक आरोग्य-संघटनेचे सभासदत्व मिळाले ! इतरही काही यूनोच्या दुय्यम शाखांमध्येही त्याला शिरकाव मिळाला होता.

यूनोचे कमिशन, जे १९४८ साली, पूर्वीच्या तात्पुरत्या कमिशनच्या जागी स्थापन केले गेले होते त्या कमिशनने आपले कार्य दक्षिण कोरियामध्ये चालूच ठेवलेले होते. मात्र आता त्याच्या कार्यात

अनंत अडचणी निर्माण होऊ लागलेल्या होत्या. या कमिशनने उत्तर कोरियाच्या सरकारशी संपर्क साधण्याचा खूप वेळा प्रयत्न केला. उत्तर आणि दक्षिण कोरियामध्ये ऐक्य प्रस्थापित व्हावे, म्हणजे त्यांना संपूर्ण कोरियाच्या प्रगतीसाठी कार्य करणे सोपे जाईल या भावनेसाठी यूनोच्या कमिशनने केलेले सर्व श्रम आणि हालचाली अयशस्वी झाल्या.

शेवटी १९४९ च्या जुलैमध्ये या कमिशनने यूनोला आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये त्याचे प्रतिपादन फार कडक होते. त्यात एक शेरा असा होता की, 'पूर्वीच्या परिस्थितीपेक्षाही आजची कोरियामधील परिस्थिती अधिक खालावली आहे आणि याचे कारण जगामध्ये रशिया आणि अमेरिका यांच्या आपसातील वैमनस्याचा निर्माण झालेला ताण हे आहे!'

एका कोरियाचे असे दोन भाग झालेले असल्यामुळे विशेषत: दक्षिण कोरियाला त्याचे वाईट परिणाम भोगावे लागत होते. हे परिणाम अंशत: पूर्वीच्या जपानी कारभारामुळे उत्पन्न झालेले होते. आणि अंशत: पाणी, वीज, उद्योगधंदे यांच्यावर या राजकीय विभाजनामुळे परिणाम घडून आलेला होता. मुख्य अडचण शेतीची होती. पूर्वीच्या जपानी अमलाखाली लोकांच्या गेलेल्या जमिनी पुन्हा त्यांना मिळवून देण्याचे काम प्रचंड होते. १९४९ मध्येच दक्षिण कोरियाच्या सरकारने जमीन सुधारणेचे आणि पुनर्वाटपाचे कार्य हाती घेतले होते परंतु हे कार्य पूर्ण होण्यापूर्वीच कोरियात युद्ध भडकले, आणि जमिनीच्या प्राथमिक वाटणीचे कार्य देखील पूर्णपणे पार पडू शकले नाही.

आणि अन्नाचा प्रश्न हा एशियातील इतर देशांप्रमाणेच कोरियातीलही एक अत्यंत बिकट प्रश्न होऊन बसलेला होता. दक्षिण कोरिया हा मुख्यत: शेतीप्रधान भाग असल्याचे मागे आलेलेच आहे. तेव्हा याच प्रश्नाला जर एकदम खो बसला तर त्या देशाची परिस्थिती काय झालेली असेल याची कल्पनाच केलेली बरी. कारखानदारीची मोठमोठाली केंद्रे उत्तर कोरियामध्ये होती. इतकेच नव्हे तर जी काही थोडी फार कारखानदारी दक्षिण कोरियामध्ये होती

तिच्यासाठी लागणाऱ्या विजेचा पुरवठा उत्तर कोरियामधून होत होता. आणि १४ मे १९४८ रोजी राजकीय कार्यक्रमांचा निवडणुकीतील एक भाग म्हणून उत्तर कोरियाने हा विजेचा पुरवठा देखील बंद केलेला होता ! त्यानंतर दक्षिण कोरियाला आपल्या कारखानदारीच्या जीवितासाठी कोळशाचा उपयोग करावा लागलेला होता.

दक्षिण आणि उत्तर कोरियामधील असहकाराचा, बेबनावाचा आणि वैमनस्याचा इतिहास असाच रेंगाळत रेंगाळत चाललेला होता. यूनोचे कमिशन आपले काम करीत होते. त्यात त्याला म्हणावे असे तर सोडाच पण कुठलीच यशप्राप्ती होत नव्हती.

उत्तर कोरिया हा रशियाच्या गोटातील असल्यामुळे साहजिकच पोलादी पडद्याआड, आतमध्ये काय हालचाली होत होत्या याचे जगाला ज्ञान होत नव्हते. कोणत्याही उलटसुलट प्रकारच्या बातम्या नित्यनैमित्तिकपणे उत्तर कोरियातून प्रसारित होत होत्या. पहिल्या बातमीवर विश्वास ठेवण्याची तयारी करीपर्यंत लगेच पहिल्या बातमीचाच गळा कापणारी दुसरी बातमी उत्तरेकडून येऊन थडकत होती. आणि मरून पडलेल्या पहिल्या बातमीला सोडून दुसऱ्या बातमीकडे धावावे तर तीही मृगजळाप्रमाणे फसवी ठरत होती ! परंतु असे असले तरी राजकीय क्षेत्रातील काही हालचालींचा अन्वयार्थ लावता येण्यासारखा होता. उत्तर कोरियातील कम्युनिस्ट सरकार हे रशियाच्या धर्तीवरच स्थापन झालेले होते. त्याचे एक प्रेसिडियम, एक मंत्रिमंडळ आणि एक सुप्रीम कोर्ट होते.

१९४८ च्या शेवटी रशियाने उत्तर कोरियातून आपले लष्कर काढून घेतले होते. फक्त उत्तर कोरियातील लोकांना लष्करी शिक्षण देण्यासाठी एक लष्करीमंडळ मात्र मागे ठेवलेले होते ! ३० जानेवारी १९४९ रोजी उत्तर कोरियाचा एक वकील रशियामध्ये नेमला गेला. तसेच रशियाच्या विचारसरणीच्या इतर अनेक राष्ट्रांनी उत्तर कोरियाच्या या सरकारला मान्यता दिली होती ! १९४९ सालापासून रशियाने उत्तर कोरियाला सर्व कोरियाचे कायदेशीर सरकार म्हणून मान्यता मिळविण्यासाठी यूनोमध्ये खूप प्रयत्न केले होते.

यूनोच्या आमसभेने उत्तर कोरियाला अशी मान्यता देण्याचे साफ नाकारले. इतकेच नव्हे तर उत्तर कोरियाचा प्रतिनिधी यूनोमध्ये ठेवण्यास देखील तिने मान्यता दिली नाही.

उत्तर कोरियाच्या कार्याचा प्रमुख भाग म्हणजे उठल्यासुटल्या दक्षिण कोरियाविरुद्ध प्रचार करणे, घुसखोर लोक दक्षिण कोरिया-मध्ये घुसवून तेथील राजकीय स्थैर्य दुबळे करणे, आपले राजकीय दलाल वेड्यावाकड्या मार्गांनी दक्षिणेकडे पाठवून काही घातपाती कारवाया त्यांच्या मदतीने घडवून आणणे, वैमनस्याने भरलेले रेडिओ कार्यक्रम सतत घडवून आणणे.

सूडाने आणि वैमनस्याने एका सलग देशाचे हे दोन देश. याचा इतिहास पाहिला म्हणजे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांची आठवण येते.

उत्तर कोरियामध्ये सामाजिक चळवळींवर तेथील सरकारने अनेक निर्बंध घातले होते. तसेच शैक्षणिक दृष्टिकोन देखील आमूलाग्र बदलण्याचा आणि शैक्षणिक क्षेत्रांमध्ये आपला संपूर्ण ताबा ठेवण्याचा आग्रह तेथील सरकारने कायम ठेवला होता आणि तसा ताबा मिळविलाही होता. वरील प्रकारांचा हेतू साध्य करण्यासाठी तेथील सरकारने अनेक सार्वजनिक कार्यक्रमांचा उपक्रम चालू केला होता. रस्त्यांवरून सामुदायिक संचलने, निरनिराळ्या कार्यक्रमांचे मोठमोठाले फलक राजरस्त्यांवरील भिंतीवरून टांगलेले दिसत होते. थोडक्यात म्हणजे तेथील जनतेला सतत कुठल्या ना कुठल्या तरी कार्यक्रमात, विचारात किंवा उपक्रमात दंग ठेवण्याचे धोरण तेथील सरकारने आखलेले होते. तसेच जपानी अंमलाचे वेळी उत्तर कोरिया-मध्ये बरेचसे चर्चेस बांधले गेले होते. अनेक ख्रिश्चन लोक तेथे नियमितपणे धार्मिक आयुष्य आणि प्रार्थनेमध्ये आपले जीवन व्यतीत करीत होते.

थोडक्यात म्हणजे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राज-कीय जीवनात उत्तर कोरियामध्ये प्रचंड क्रांति होऊ लागली. अगदी एकदम नव्हे तरी हळूहळू चर्चेसच्या इमारती जमीनदोस्त होऊ

लागल्या. मोठ्या शेतकरीवर्गावर अनेक निर्बंध येऊ लागले, त्यामुळे तेथील जीवन विस्कळित, अस्थिर आणि दहशतीचे होऊ लागले होते. त्याचा परिणाम निर्वासितांचा लोंढा दक्षिण कोरियाकडे येण्यात झाला. काही लोक तेथील निर्बंधांना आणि पारतंत्र्याला कंटाळून दक्षिण कोरियामध्ये आले, तर काही लोक उत्तर कोरियातील सरकारला जे नको होते, त्यांना त्या सरकारने हाकलल्यामुळे दक्षिण कोरियात आले. त्यामुळे दक्षिण कोरियावर दिवसेंदिवस विलक्षण भार पडू लागला. त्यांचे आर्थिक जीवन विस्कळित होऊ लागले आणि याच्या भरीला म्हणून उत्तर कोरियाच्या सरकारकडून दक्षिण कोरियामध्ये घातपाती कृत्येही घडवून आणली जाऊ लागली. या साऱ्याचे पर्यवसान दोन्ही सरकारमध्ये तेढ निर्माण होण्यात झाले. आणि पुढे त्याचा जो परिणाम व्हावयाचा तोच झाला !

दक्षिण कोरियावर प्रत्यक्ष आक्रमण होण्यापूर्वी उत्तर कोरियामधून दोन्ही कोरियाच्या एकीकरणाविषयींचा राजकीय प्रचार जोरात चालू होता. दक्षिण कोरियातले काही बोटचेपे कार्यकर्ते हाताशी धरून उत्तर कोरियाच्या नेत्यांनी ही मोहीम आखलेली होती. या प्रचारामध्ये फक्त डाव एवढाच होता की या निमित्ताने दोन्ही कोरियातील जनतेच्या मनात एकीकरणाच्या भावनेला उठाव द्यावा. म्हणजे आक्रमण केल्यास त्याचा धक्का बसू नये अथवा विपरीत भावनांचा उद्रेक होऊ नये. परंतु कम्युनिस्टांचा हाही डाव फसला ! ३८ अक्षांशावर उत्तर कोरियाने आपली फौज जमविण्यास सुरुवात केली आहे अशा बातम्या प्रसृत होऊ लागल्या आणि २५ जून १९५० रोजी प्रत्यक्ष आक्रमणही झाले.

आक्रमणाची ही बातमी येऊन धडकताच अमेरिकेने आणि यूनोनेही कल्पनातीत चपळाईने हालचाली करण्यास सुरुवात केली.

पहिली बातमी, अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेन्टला २४ जून रोजी रात्री नऊ वाजून सव्वीस मिनिटांनी मिळाली. आणि दुसऱ्या दिवशी पहाटे तीन वाजता अमेरिकेने सुरक्षा समितीची बैठक बोलावली. ती बैठक देखील त्याच दिवशी दुपारी भरली. अमेरिकेने मांडलेला एक

ठराव त्या बैठकीत नऊ विरुद्ध शून्य मताने पास झाला. या बैठकीत रशिया गैरहजर होता. आणि युगोस्लाव्हियाने मत दिले नाही. या ठरावान्वये सुरक्षा समितीने उत्तर कोरियाने केलेल्या आक्रमणाला 'शांततेचा भंग' या शब्दांनी वाच्यता दिली आणि 'उत्तर कोरियाने आपल्या फौजा ३८ अक्षांशापलिकडे काढून घ्याव्यात' म्हणून आदेश दिला, तसेच हा ठराव प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी सुरक्षासमितीने यूनोच्या सभासद राष्ट्रांना, मदत देण्याविषयी आवाहन केले. आणि उत्तर कोरियाला त्याचे ईप्सित साध्य करण्याचे कामी कोणी मदत करू नये म्हणून आदेश दिला.

त्याच रात्री अमेरिकेने जनरल डग्लस मॅक्आर्थर यांना दक्षिण कोरियाच्या साह्यासाठी लष्करी मदत घेऊन जाण्याविषयी आदेश दिला. यापेक्षाही अधिक निर्णायक धोरण, अमेरिकेने २६ जूनच्या सायंकाळी एक सभा घेऊन ठरविले. दुसऱ्या दिवशी दुपारी अध्यक्ष ट्रुमन यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले.

'कोरियावरील आक्रमण हे कम्युनिझमने शांतताप्रिय आणि स्वतंत्र देशांविरुद्ध उचललेले एक विध्वंसक पाऊल आहे. हे पाऊल आक्रमक आणि शस्त्रसिद्ध आहे. म्हणून मी आमच्या हवाई आणि सागरी तुकड्यांना कोरियन सरकारच्या मदतीसाठी जाण्याचा आदेश दिलेला आहे.' तसेच अध्यक्ष ट्रुमन यांनी फॉर्मोसावरही आक्रमण होऊ नये म्हणून सातव्या आरमाराला सिद्ध राहण्याविषयी आदेश दिला. त्याबरोबरच राष्ट्रीय चीनला त्यांनी सांगितले की कम्युनिस्ट चीनविरुद्ध कसल्याही प्रकारच्या हवाई अथवा सागरी हालचाली सध्या त्यांनी करू नयेत. तें काम त्यांनी सातव्या आरमाराकडे सोपविले. तसेच अध्यक्ष पुढे म्हणाले की, 'फॉर्मोसाच्या संरक्षणाच्या बाबतीत आणि त्या साऱ्याच आखाताच्या संरक्षणाच्या संदर्भात जपानला विश्वासात घेतले जाईल आणि यूनोलाही सतत जागरूक ठेवले जाईल. शिवाय या नव्या संकटाला तोंड देण्यासाठी मदतीचें आवाहन फिलिपिन्स, फ्रान्स आणि इंडोचायना या देशांना केले जाईल.'

२७ जूनला पुन्हा सुरक्षा मंडळाची बैठक भरली. याच वेळी

कोरियातील यूनोच्या निरीक्षक समितीने आपला अहवाल पाठविला होता. त्यामध्ये उत्तर कोरियावर तिने आक्रमणाचा आरोप ठेवला होता. आणि वर असे म्हटले होते की, दक्षिण कोरियाला आपल्या युद्धाचे क्षेत्र वाढवावे लागले ते केवळ बचावासाठी. यासोबतच उत्तर कोरियाने यूनोला मदतीचे केलेले आवाहन यूनोच्या या समि• तीमार्फत पाठविले गेले.

सुरक्षा समितीच्या या बैठकीमध्ये दुसरा एक ठराव पास झाला. त्या ठरावान्वये सुरक्षा समितीनें यूनोच्या सभासदांना एक विनंती केली होती. ती अशी की, 'दक्षिण कोरियावर झालेल्या आक्रमणाच्या निवारणार्थ यूनोच्या सभासद-राष्ट्रांनी दक्षिण कोरियाच्या लोकसत्ताकाला न्याय आणि शांततेच्या रक्षणासाठी मदत करावी.'

हा ठराव मतास टाकला गेला तेव्हा ठरावाच्या बाजूने सात सभासदांनी मत दिले. यूगोस्लाव्हियाने विरुद्ध मत दिले, भारत आणि इजिप्त यांनी मतदानात भाग घेतला नाही याचे कारण तेथील सभासदांना त्यांच्या सरकारकडून अद्याप काही सूचना आलेल्या नव्हत्या. मात्र भारताने २९ जून रोजी या ठरावाला आपला पाठिंबा जाहीर केला. हा ठराव पास होण्यापूर्वीच अमेरिकेने दक्षिण कोरियाच्या सरकारला लष्करी मदत जाहीर केलेली होती आणि त्या मदतीला पूरक हालचालीही सुरू झालेल्या होत्या. अर्थात अमेरिकेच्या या कृतीला यूनोचा जणू पाठिंबाच असल्याप्रमाणे हा ठराव पास झालेला होता!

उत्तर कोरियापुढे दक्षिण कोरियाचा निभाव लागत नाही ही गोष्ट ३० जून रोजी अमेरिकेच्या लक्षात आली तेव्हा अमेरिकेच्या अध्यक्षांनी जाहीर केले की, 'दक्षिण कोरियाच्या सरकारला लष्करी पायदळाची मदत अमेरिका पुरवील तसेच आपण अमेरिकेच्या हवाई दलाला उत्तर कोरियाच्या लक्ष्यावर बाँबिंग करण्याचे देखील हुकूम दिलेले आहेत!'

या एकाच कृतीवरून आणि उक्तीवरून असेच सिद्ध होते की अमेरिकेने दक्षिण कोरियाच्या संदर्भात स्वतःला गुंतवून घेतलेले होते!

२८ जूनला ब्रिटनने जाहीर केले की, 'अति पूर्वेकडे आमचे नाविक दल आम्ही अमेरिकेच्या साह्यासाठी आणि यूनोच्या आदेशानुसार सज्ज ठेवलेले आहे!' असेच धोरण ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलँड यांनीही जाहीर केले!

७ जुलै रोजी एका ठरावान्वये सुरक्षा समितीने अमेरिकेला आदेश दिला की, 'ही निरनिराळ्या देशांची सैन्ये एकत्र केली जावीत आणि त्यांचे संचलन यूनोच्या झेंडयाखाली व्हावे.'

दुसऱ्याच दिवशी हा आदेश अमलात आणला गेला आणि यूनोच्या या सैन्याचा कमांडर म्हणून जनरल मॅक्‌आॅर्थर यांची नियुक्ति झाली!

सुरक्षा समितीच्या या धोरणाला यूनोच्या बहुतेक सभासदराष्ट्रांनी पाठिंबा दिला. फक्त रशिया आणि यूगोस्लाव्हियाने विरोध व्यक्त केला.

यूनोच्या सरचिटणिसांनी सभासद-राष्ट्रांना केलेल्या आवाहनानुसार ३ सप्टेंबर रोजी सोळा राष्ट्रांनी कोरियामध्ये आपले लष्कर पाठविण्याचे मान्य केले आणि बारा राष्ट्रांनी निरनिराळ्या प्रकारची, उदाहरणार्थ, औषधे, अन्न काही कच्चा माल—मदत देण्याची घोषणा केली.

राष्ट्रीय चीनने आपले तीन डिव्हिजन सैन्य देण्याचे ठरविले होते पण जनरल मॅक्‌आॅर्थर यांनी त्याचा स्वीकार केला नाही. कारण त्यांच्या मते हे सैन्य राष्ट्रीय चीनच्या कम्युनिस्ट चीनपासुनच्या रक्षणालाच लागणार होते. शिवाय या नकारामध्ये दुसराही एक हेतू असा होता की, जर राष्ट्रीय चीनचे हे लष्कर दक्षिण कोरियाच्या भूमीवर उभे केले तर उत्तर कोरियाच्या रणभूमीवर कम्युनिस्ट चीन आपले सैन्य आणण्याची दाट शक्यता होती. आणि असे झाले असते तर युद्धक्षेत्र वाढले असते, युद्धविषयक जबाबदाऱ्याही

वाढल्या असत्या आणि जगाला नवीनच समस्यांना तोंड द्यावे लागले असते !

राजकीय निरीक्षकांचे अनुमान असे होते की, प्रत्यक्ष हुकुमामुळे नसले तरी रशियाच्या इच्छेनुसारच उत्तर कोरियाने हे आक्रमण केलेले होते !

हे आक्रमण झाले तेव्हा २७ जून रोजी अमेरिकेचे रशियातील वकील श्री. कर्क यांनी रशियाला विनंती केली की, 'उत्तर कोरियाने केलेल्या या असमर्थनीय आक्रमणाविरुद्ध रशियाने आपली शक्ती वापरावी. आणि या आक्रमणापासून उत्तर कोरियाला परावृत्त करावे ! ' परंतु रशियाने त्याला उत्तर दिले की, 'हे आक्रमण उत्तर कोरियाने केलेले नसून दक्षिण कोरियाच्या युद्ध–खुमखुमीला उत्तर कोरियाने दिलेले ते उत्तर होय ! '

२९ जून रोजी रशियाने यूनोच्या सर चिटणीस ट्रिग्वे ली यांना पत्र लिहून कळविलें ते असे :

> 'यूनोच्या सुरक्षा समितीचा २७ जूनचा ठराव बेकायदेशीर आहे. कारण ज्या दोन कायम सभासदांच्या मतदानाची अशा ठरावाच्या मंजुरीसाठी आवश्यकता होती ते दोन सभासद, म्हणजे रशिया आणि चीन गैरहजर होते. तसेच चीनचे राष्ट्रीय सरकार संपूर्ण चीनचे यूनोमध्ये प्रतिनिधित्व करू शकत नाही. '

आणखी ११ जुलैच्या आपल्या एका पत्रात रशियाने सुरक्षा समितीला लिहिले होते की, ७ जुलैचा ठराव म्हणजे अमेरिकेला कोरियामध्ये लष्करी हालचाली करण्यासाठी पुरविलेले घडयाळ होय ! या लष्करी हालचाली म्हणजे कोरियाच्या जनतेवर केलेले आक्रमणच आहे असे आम्ही समजतो !

कोरियाचे प्रकरण या साऱ्या उलटसुलट घटनांमुळे फारच किचकट अवस्थेत येऊन पोहोचले. अमेरिकेच्या उत्साही हालचाली आणि रशियाचा तटस्थ निषेध. या दोन शक्तींनी घेतलेल्या परस्पर विरुद्ध भूमिकेमुळे आशियातील राजकारणाचा तोल पार बिघडून

गेला. दुसरे महायुद्ध होऊन गेल्याला फार वर्षे लोटली नव्हती, तर लगेच जगाच्या अंगणात पुन्हा तिसऱ्या महायुद्धाची पावले उमटू लागली होती. हे दुश्चिन्ह होते, आणि आशियाच्या दृष्टीने तर मोठेच दुश्चिन्ह होते. याचे कारण असे की युद्धाला तोंड फुटले तर ते आशियातच फुटणार होते. आणि तिबेट, फॉर्मोसा, इंडोचायना, कोरिया हे देश जणू तिसऱ्या महायुद्धासाठी पेरून ठेवलेले सुरूंगच होते !

दुसऱ्या महायुद्धाने मागासलेल्या आणि पारतंत्र्यात असलेल्या आशियाला स्वातंत्र्य दिले होते आणि आता तिसरे महायुद्ध झाले तर या स्वातंत्र्याबरोबरच आशिया खंडच बेचिराख होण्याची भीती होती.

यावेळी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी कोरियामध्ये शांततेचे रक्षण व्हावे म्हणून खूप प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांचा पहिला भाग हा होता की रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये कोरियाच्या निमित्ताने निर्माण झालेले वितुष्ट नाहीसे करणे; निदान कमी करणे. नेहरूंनी १३ जुलै रोजी अमेरिकेचे डीन अॅचेसन आणि रशियाचे स्टालिन यांना पत्र लिहून कळविले की, 'कोरियामध्ये युद्धाचा धोका कमी करणे या एकमेव उद्दिष्टाशिवाय इतर काहीही उद्दिष्ट असता कामा नये. युद्धाचा धोका टाळून शांतता प्रस्थापित करण्यासाठी सध्या यूनोमध्ये जो पेचप्रसंग निर्माण झालेला आहे तो सर्वांनी मिळून सोडविणे आवश्यक आहे. या बाबतीत कम्युनिस्ट चायनाला आपल्या मतप्रदर्शनाचा अधिकृत हक्क नाकारण्यात काहीच अर्थ नाही. उलट त्यामध्ये जागतिक अनहित आहे. अमेरिका, रशिया आणि चीन ही कोरियाच्या प्रकरणातील संबंधित राष्ट्रे. यांनी जगातील इतरही शांतताप्रिय राष्ट्रांच्या विचारांची मदत घेऊन विचारविनिमय करावा आणि हा पेचप्रसंग सोडवावा.'

१५ जुलै रोजी एक पत्र लिहून स्टालिन यांनी पंडित नेहरूंच्या सूचनांचे स्वागत केले आणि अशा पद्धतीने कोरियाचा प्रश्न सोडविण्याची सोव्हिएट रशियाची तयारी असल्याचे मान्य केले. परंतु अॅचेसन यांना हा विचार पसंत पडला नाही. त्यांनी १८ जुलै रोजी

नेहरूंना कळविले की, 'कोरियाचा प्रश्न इतर प्रश्नांवर अवलंबून ठेवून तो सोडविता येईल असे आम्हाला वाटत नाही!' त्यांच्या पत्रात पुढे त्यांनी असे स्पष्ट केले होते की, 'कम्युनिस्ट चीनला मान्यता देणे हा निर्णय कोरियावर झालेल्या बेकायदेशीर आक्रमणाच्या संदर्भात घेणे इष्ट नाही.' अॅचेसन यांनी पुढे असेही भविष्य वर्तविले होते की, 'मनात आणल्यास रशिया हे युद्ध केव्हाही थांबवू शकेल!'

आणखी दोन दिवसांनी पंतप्रधान अॅटली यांनीही नेहरूंच्या प्रस्तावाला विरोध दर्शविला. परंतु नेहरूंनी आपली शिष्टाई चालूच ठेविली.

मध्यंतरीच्या काळात कोरियातील युद्धाने आपलेही काही परिणाम दाखविण्यास सुरुवात केली. उत्तर कोरियाच्या आक्रमक फौजा आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असल्यामुळे दक्षिण कोरियावर त्या मात करीत गेल्या आणि आठवड्याच्या आतच त्यांनी दक्षिण कोरियाची राजधानी, सेऊल हे शहर पादाक्रांत केले! यामुळे पश्चिमी गोटात गडबड उडाली. अमेरिकेची जपानमध्ये असलेली थोडी फौज लगेच दक्षिण कोरियाच्या रक्षणासाठी रवाना करण्यात आली. ही फौज अमेरिकेकडून प्रत्यक्ष मदत येईपर्यन्त प्राणपणाने लढली. अमेरिकेकडून कुमकीची पहिली तुकडी ३१ जुलै रोजी आली. उत्तर कोरियाच्या लष्कराला दक्षिण कोरियातील गोरील्ला संघटना मदत करीत होती!

उत्तर कोरियातून आलेल्या आक्रमकांच्या मागोमाग राजकीय प्रचारकांचे पथकही दक्षिण कोरियामध्ये येऊन धडकले. या प्रचारकात बहुतांशी भरणा शेतकरीवर्गाचा होता. त्या पाठोपाठ उत्तर कोरियाच्या रेडिओने प्रचाराला सुरुवात केली. प्रचारामध्ये प्रामुख्याने शेतीसुधारणांवर विशेष जोर दिलेला होता आणि असेही आश्वासन देण्यात आले होते की, 'उत्तर कोरिया या शेतीविषयक सुधारणा लगोलग दक्षिण कोरियालाही लागू करणार आहे!'

कोरियाच्या युद्धाचे रूप या प्रचाराने बदलू लागले. या

प्रचारातून अशी भीति निर्माण झाली की अमेरिका अथवा पाश्चिमात्य राष्ट्रे युद्धाच्या तयारीत असतानाच रशिया आणि त्याचे सहप्रवासी देश कोरियाच्या भूमीची मुक्तता करण्याच्या विचारात दिसत होते. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी नाझींचे युद्धामध्ये यश मिळविण्याचे जे पवित्रे होते त्या पवित्र्यांचेच प्रतिबिंब कोरियात निर्माण झालेल्या या परिस्थितीत दिसत होते !

या परिस्थितीची पाहणी करून निष्कर्ष काढताना अध्यक्ष ट्रुमन यांनी काँग्रेसला केलेल्या निवेदनात रशियाचा प्रत्यक्ष उल्लेख न करता म्हणाले की, ' घडणाऱ्या घटनांच्या मालिकांचे भविष्य वर्तवीत न बसता साऱ्यांचा एकमेव परिणाम म्हणून मी सांगतो की, यापुढे जगामध्ये नवीन आक्रमण करून विजय संपादन करण्याची स्वप्ने कोणीही पाहू नयेत. अशा आक्रमणाची आणि शांतताभंगाची गय केली जाणार नाही.'

अमेरिकेच्या अध्यक्षांच्या या निवेदनावर भाष्य करताना राजकीय निरीक्षकांनी विश्लेषण केले की, ' स्वतःची समर्थता लक्षात न घेता अमेरिकेने अशा परिस्थितीत असली धाडसी विधाने करू नयेत ! '

अमेरिकेतील बहुसंख्य जनतेची दृष्टी मात्र कोरियाच्या परिस्थितीच्या संदर्भात आपल्या सरकारच्या कृतीविषयी स्पष्ट होती. अमेरिका या वेळी यूनोच्या कार्याचाच एक भाग पार पाडीत होती. दक्षिण कोरियावर अकारण झालेले आक्रमण मोडवून धरण्याची जबाबदारी अमेरिकेने उचलली होती. कम्युनिस्टांच्या आक्रमणाला प्रतिबंध हेच तिचे एकमेव उद्दिष्ट होते.

परंतु आशियातील राजकीय मुत्सद्द्यांचे निष्कर्ष मात्र अमेरिकेविरुद्ध होते. आशियातील बहुसंख्य जनता अमेरिकेच्या या हालचालींच्या पाठीशी नाही असे त्यांचे मत होते. कारण तिचे हेतु शुद्ध नाहीत याची जाणीव त्यांना आहे असे त्यांचे निरीक्षण होते. अमेरिकेनें ज्या प्रकारे चँग-कै-शेकला हाताशी धरलेले आहे, दक्षिण कोरियामध्ये आपलाच हस्तक म्हणून सिंगमन ऱ्ही याची नियुक्ति केली आहे आणि अगदी अलिकडे दक्षिण व्हिएतनामच्या संदर्भात बाओ दाय

याला हाताशी धरले; त्या साऱ्यांच्या रसायनातून जे चित्र निर्माण होते ते आशियातील जनतेला आपली प्रतिकृति वाटत नाही !

याच्याही पुढे जाऊन परिस्थितीचे विश्लेषण करताना असे म्हणावे लागते की अमेरिकेचा आशियामधील हा हस्तक्षेप म्हणजे आशियात धर्मयुद्धाला चालना देणेच होय !

परंतु हा विचार देखील वर वर विचार करतादेखील अतिरेकी वाटेल. त्याचप्रमाणे कम्युनिस्ट चीनची भूमिका देखील अतिरेकीच आहे. या दोन्ही राष्ट्रांच्या भूमिकेत फरक एवढाच आहे की अमेरिकेने आशियाच्या राजकारणात घेतलेली भूमिका ही वर वर विचार करणाऱ्यांना अतिरेकी वाटते; परंतु खोलवर आणि सबंध जगाच्या राजकारणाचा तोल विचारात घेता अमेरिकेची ही भूमिका निश्चितपणे विचार करण्यासारखी आहे. तसे मात्र चीनच्या बाबतीत विचार करतांना वाटत नाही. चीनचे सर्वच राजकारण हे स्वार्थावर आणि कम्युनिझमच्या एककल्ली पुरस्कारावर आधारलेले आहे. जुन्या काळात मुसलमानांनी जसा आपल्या धर्माचा प्रसार आणि राज्याचा विस्तार एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन केला, आज तीच प्रतिमा चीनच्या हुकमशहाची डोळ्यापुढे येते !

अलिकडे पाकिस्तानचे आणि चीनचे जे एवढे मेतकूट जमले आहे त्याचे कारण तरी काय ? दोघांचा धर्म एक नाही, दोघांचे राजकारण एक नाही, उलट अयूबखान धर्माच्या नावाखाली वर्षातून असंख्य वेळा डरकाळ्या फोडीत असतात, आणि कम्युनिझमला तर धर्माचे वावडेच नाही तर तिरस्कार आहे ! तरी पण त्या दोन राष्ट्रांचे हात एकमेकांच्या हातात घट्ट गुंतलेले आहेत ! याचे कारण काय ? कारण एवढेच की त्यांची वृत्ति एक आहे, त्यांचा स्वार्थ एक आहे !

कोरियन युद्धाच्या बाबतीत चीनचे धोरण यापेक्षा निराळे नव्हते. याचे एक उदाहरण असे : ' ऑगस्ट २८ रोजी पेकिंग सरकारने यूनोच्या सर चिटणिसांना कळवून अशी तक्रार नोंदविली की अमेरिकन हवाई जहाजांनी चीनची सरहद्द ओलांडून आमच्या प्रदेशावर

आक्रमण केले. त्यात आमच्या प्रदेशातील बऱ्याच भागावर बाँब टाकले गेल्यामुळे तेथे आमचे अगणित नुकसान झाले आहे.'

या आरोपाला उत्तर देतांना अमेरिकेने कबूल केले की, 'आमच्याकडून अजाणता एखादे वेळी चीनची सरहद्द ओलांडली गेली असेल व काही बाँब तेथे पडले असतील तर त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. त्याबद्दल नुकसानभरपाई देण्यास आमची तयारी आहे. यासाठी यूनोने चीनला मान्य होईल अशा भारत आणि स्वीडन या देशांच्या प्रतिनिधींचे एक कमिशन नेमून चीनच्या 'त्या' प्रदेशाची त्या कमिशनमार्फत पाहणी करावी. तें कमिशन जो निकाल देईल तो आम्हाला मान्य असेल.'

परंतु चीनने कमिशन नेमून चौकशी करण्याची गोष्ट मान्य केली नाही!

ही बारीकशी घटना आणि या पाठीमागचे दोन्ही राष्ट्रांचे दृष्टिकोन काय दर्शवितात?

परंतु या प्रश्नाचे उत्तर घडलेल्या प्रसंगावरून काढणे योग्य होणार नाही! या दोन्ही देशांचा एकमेकाविषयींचा द्वेष फार जुना नसला तरी कोरियाच्या युद्धापूर्वीचा आहे. उलट असेही म्हणता येईल की या द्वेषाचेच पर्यवसान कोरियाचे युद्ध भडकण्यात झालेले आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशियाच्या राजकारणाकडे आणि आर्थिक स्थैर्याकडे अमेरिका ज्या सक्रिय सहानुभूतीने पाहात होती, तो दृष्टिकोन तर सोडाच परंतु अमेरिकेचे आशियातील अस्तित्वही डळमळावे अशी घटना घडली. ती घटना म्हणजे चीनमध्ये क्रांति होऊन चँग-कै-शेकचे सरकार गडगडले. त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी चीनच्या बाबतीत चँग-कै-शेक यांना हाताशी धरून चीनमध्ये स्वतंत्र लोकसत्ताक राज्यपद्धति निर्माण करण्याचे प्रयत्न चालविले होते. त्यासाठी त्यांनी चिनी कम्युनिस्ट आणि कोमिंटाँग यांच्यात सलोखा निर्माण करण्याचा खूप प्रयत्न केलेला होता. या पाठीमागे रूझवेल्ट यांचा विचार असा होता की आशिया

मध्ये पन्नास कोटी लोकसंख्या असलेले खूप मोठे लोकसत्ताक राज्य निर्माण झाल्यास ब्रिटन आणि अमेरिका यांचा आशियातील दोस्त म्हणून या महान शक्तीचा जागतिक राजकारणासाठी फार चांगला उपयोग करून घेता येईल.

परंतु चिनी कम्युनिस्टांनी मिळविलेल्या प्रचंड विजयामुळे अमेरिकेचे हे स्वप्न धुळीला मिळाले. एवढेच नव्हे तर चँग-कै-शेकला परागंदा व्हावे लागले. आशियामधील दुसरा महान देश भारत याने देखील या अगोदर स्वातंत्र्य मिळविले होते. अशा रीतीने आशियातील वसाहतवादाचे दिवस भरत आले होते आणि इंग्लंड-अमेरिकेची स्थिती केविलवाणी होऊ लागलेली होती. भारताच्या स्वातंत्र्याच्या एक वर्ष अगोदर अमेरिकेने फिलिपिन्सला स्वातंत्र्य बहाल केले होते, परंतु त्या दोघांनी आपसामध्ये ठराव करून फिलिपिन्सने अमेरिकेची आर्थिक आणि लष्करी मदत स्वीकारून अमेरिकेचे अस्तित्व तेथे राहू दिले होते.

रुझवेल्ट गेले आणि त्यांच्या जागेवर ट्रुमन आले. ट्रुमन यांच्या कारकीर्दीत परिस्थितीमध्ये सुधारणा तर झाली नाहीच उलट आशियामध्ये थंड्या युद्धाला जोर चढला आणि कोरियातील युद्ध भडकले. रशियाचे एके काळचे अमेरिकेशी जे थोडे फार सलोख्याचे संबंध होते ते देखील या काळात आणि कोरियाच्या युद्धाच्या निमित्ताने संपुष्टांत आले. ट्रुमन यांच्या धोरणातील दांडगाई आणि मुत्सद्देगिरीचा अभाव यामुळे आशियाचे भवितव्यच धोक्यात येते की काय अशी जबरदस्त भीति निर्माण झाली. चँग–कै–शेक आणि फॉर्मोसा यांच्या निमित्ताने कम्युनिस्ट चीन यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झाले आणि कोरियाच्या युद्धामुळे आणि त्या युद्धातील अमेरिकेच्या विक्षिप्त डावपेचांमुळे रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये उघड उघड शत्रुत्वाची भावना पेटू लागली.

या साऱ्या परिस्थितीमुळे कोरियाच्या निमित्ताने तिसऱ्या जागतिक महायुद्धाचा डोंब उसळतो की काय अशी साधार भीति निर्माण झाली. या ठिकाणी जागतिक राजकाणातील एक शक्ति

म्हणून प्रथमच भारताच्या अलिप्ततावादी राजकीय शक्तीचा प्रभाव पडला. केवळ अलिप्त राष्ट्रांच्या शिष्टाईमुळे आणि पंडित नेहरूंच्या डोळस परिश्रमामुळे कोरियाचे युद्ध जागतिक युद्धाची नांदी ठरली नाही ! शिवाय 'वाईटातून चांगले' म्हणतात त्याप्रमाणे कोरियांच्या युद्धानेच जगातील अलिप्ततावादी राजकीय शक्तीला (Political Power) बाळसे आले असे म्हणावे लागते. या अलिप्ततावादी राष्ट्रांनीच रशिया आणि अमेरिका यांच्यामधील संघर्षाने उद्भवणारी आपत्ति टाळली.

तरीपण आधुनिक जगाच्या घडणीतील कोरियाचे युद्ध ही अत्यंत मूर्खपणाची कृतीच म्हणावे लागेल ! हे युद्ध तीन वर्षे आणि बत्तीस दिवस चालले. हे युद्ध थांबावे म्हणून जी शांततेची बोलणी झाली ही बोलणी दोन वर्षांपेक्षा अधिक काळ चालली. या युद्धामध्ये मृत्यू पावलेल्यांची संख्या : दक्षिण कोरियाचे तीन लक्ष लोक, या युद्धात भाग घेणाऱ्या यूनोच्या सेवकांपैकी पंधरा हजार आणि जवळ जवळ पंधरा लक्ष लोक उत्तर कोरिया आणि चीनचे मिळून मृत्यूमुखी पडले. दक्षिण कोरियातील इतर दहा लक्ष लोक कामी आले तसेच उत्तर कोरियातील वीस लाख लोक कामी आले. आणि या युद्धात एकंदर निर्वासित झालेल्यांची संख्या तीस लक्ष आहे.

वरील आकड्यांवरून या युद्धाची भीषणता सहज लक्षात येईल. परंतु एवढ्याच भीषणतेवर हे युद्ध थांबले नाही तर या युद्धाने आशियाखंडामध्ये थंडे युद्ध आणले ही त्याहीपेक्षा फार मोठी भीषण घटना आहे असे म्हणावे लागेल.

१९५३ साल हे मात्र कोरियाच्या इतिहासात नवे पर्व निर्माण करण्यासाठी उजाडले हे जितके खरे तितकेच ते अमेरिका आणि रशिया यांच्या राजकारणातही बदल करणारे ठरले !

अमेरिकेत १० जानेवारी रोजी आयसेनहॉवर अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९२९ सालानंतर रिपब्लिकन पक्षाला मिळालेले हे पहिलेच अध्यक्षपद. तसेच ५ जानेवारीला मार्शल स्टॅलिन यांचा अंत

झाला. स्टॅलिन यांचा मृत्यूही अशीच एक लक्षणीय घटना होती. कारण जवळ जवळ वीस वर्षे या पुरुषाने एखाद्या हुकूमशहाप्रमाणे रशियाचा राज्यकारभार आपल्या हाताशी घेतलेला होता! अशा प्रकारे या दोन राष्ट्रांच्या राजधान्यामध्ये दोन नवे प्रमुख उदयाला आले. आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये आयसेनहॉवर यांनी 'आपण कोरियाच्या युद्धाचा अंत करू.' असे आश्वासन दिले होते. शिवाय लगेच त्यांच्या या घोषणेला उत्तम प्रतिसाद मार्शल स्टॅलिन यांच्याकडून मिळाला होता. एका अमेरिकन पत्रकाराला मुलाखत देताना स्टॅलिन म्हणाला होता: आम्ही या नवीन दृष्टिकोनाचे स्वागत सहकार्य देऊन करू! पुढे स्टॅलिन वारला, परंतु यूनो, अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट आणि रशिया, अमेरिका आणि चीन यांनी मिळून जुलै २७, १९५३ रोजी कोरियाच्या युद्धाचा शेवट केला.

कोरियाचे युद्ध संपले. परंतु ३८ अक्षांश ही रेषा कोरियाच्या नशिबातली टळली नाही. युद्ध थांबले म्हणजे रक्तपात टळला. व्हिएतनामसारखे कुंड धगधगत राहिलेले नाही हेच त्यातल्या त्यात एक समाधान.

परंतु या युद्धाच्या निमित्ताने आणि युद्धबंदीच्या निमित्ताने नवोदित आशियाचे भवितव्य त्याच्या स्वतःच्या हाती राहिले नसून दोन बलाढ्य जागतिक शक्तींच्या हाती गेलेले आहे ही गोष्ट नाकारता येत नाही. यात आणखी दुर्दैवाची गोष्ट मला अशी वाटते ती अशी:


रशिया आणि अमेरिका यांचा प्रभाव तर आशियावर आहेच. जागतिक सत्तेचा तोल कायम राखण्यासाठी या दोन शक्तींचे डाव-पेच आशियाच्या भूमीवर चाललेले आहेत. कुठे आर्थिक आणि लष्करी शक्तींचा प्रभाव तर कुठे आर्थिक आणि लष्करी शक्तींचे दान असे स्वरूप त्या डावपेचांचे असल्यामुळे मागासलेल्या आशियाला त्यांचा प्रतिकार करता येत नाही. परंतु या मद-तीने आणि प्रभावाने या खंडातील देशांचा विकासच होत आहे असे म्हणणे भाबडेपणाचे आहे! कारण मदतीपाठीमागचा या दोन

बलाढ्य शक्तींचा हेतू त्या त्या देशातील प्रगतीला हातभार लावण्याचा नसून स्वतःचा राजकीय प्रभाव वाढविण्याचा आहे. हा एक नवा वसाहतवादच आहे असे म्हणावे लागेल.

या दोन बलाढ्य शक्तींच्या आशियातील या कारवायांना समर्थपणे तोंड देण्याची ताकद असणारे आशियात दोनच देश आहेत. पहिला चीन आणि दुसरा भारत. परंतु दुर्दैवाने या दोन्ही देशांच्या राजकीय विचारसरणीत जमीन अस्मानाचे अंतर आणि विरोध आहे. यामुळे आशियात निर्माण होऊ शकणाऱ्या प्रचंड शक्तीला आपोआपच छेद जात आहेत. आणि त्याची चांगली फळे रशिया आणि अमेरिकेला मिळत आहेत. कोरियाची फाळणी, व्हिएतनामची फाळणी, भारताची फाळणी, चीनची फाळणी, काश्मीरचा प्रश्न, फॉर्मोसाचा प्रश्न, मंगोलियाचा प्रश्न; या फाळण्या आणि हे प्रश्न, यामागील शक्तींचे विश्लेषण केले तर ते कशाचे द्योतक आहे आणि कशाची ती फळे आहेत हे सहज लक्षात येऊ शकेल!

म्हणून आज तरी असे म्हणावेसे वाटतें की कोरियाचे युद्ध जरी संपलेले असले तरी आशियाचे पारतंत्र्य अजून संपलेले नाही!

• • •


इंडोनेशिया
व
फिलिपाइन्स बेटे
फिलिपाइन्स बेटे
पालावान
सुमात्रा
बोर्निओ
(कालिमतान)
सेलेबिस
न्यू गिनी
जावा

# इंडोनेशिया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १७२२०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५५७५० वि. इं.प्र.
क्रमांक ........ दि. २२।३।६१



# ४

इंडोनेशिया हा एक द्वीपसमूह आहे. जवळ जवळ दोन हजार बेटे एकत्र येऊन त्याचा मिळून हा देश बनलेला आहे. आज इंडोनेशियाची लोकसंख्या सात कोटी ऐंशी लक्षापेक्षा थोडी अधिक असेल, आणि त्याचा भूभाग सर्व मिळून ७,३५,२६८ चौ. मैल आहे. इंडोनेशियाच्या मुलुखात जावा, सुमात्रा, दक्षिण बोर्निओ, सेलिबीज, बाली, लोबॉक, फ्लोरिस, तिमूरचा काही भाग आणि मोलक्काची बेटे समाविष्ट आहेत.

इंडोनेशिया हा देश प्रशांत महासागर आणि भारताच्या मध्ये तसाच ऑस्ट्रेलिया आणि आशिया या खंडांच्याही मध्येच वसलेला आहे.

या देशाच्या भवितव्याला जागतिक राजकारणात फार महत्त्व येऊ लागलेले आहे.

इंडोनेशिया स्वतंत्र होण्यापूर्वी जवळ जवळ तीनशे वर्षे डचांच्या हूकूमतीखाली होता. त्या अगोदर तो पोर्तुगीजांच्या आधिपत्याखाली होता. इंडोनेशियाची लोकसंख्या ही अनेक जातींच्या आणि अनेक धर्मांच्या लोकांची मिळून बनलेली आहे. अगोदर हिंदु संस्कृती, त्यानंतर बुद्ध, मग इस्लामिक, चिनी आणि अरबी अशा क्रमाने जपानपर्यंतचे लोक या द्वीपसमूहात येऊन मिसळलेले आहेत. यामुळे

इंडोनेशियाची लोकसंख्या जितकी मजेशीर आहे तितकीच राज्य-कारभारासाठी तेथील परिस्थिती बिकट झालेली होती.

१६०९ साली डचांनी आपल्या पहिल्या गव्हर्नर जनरलची येथे नेमणूक केली. १६१९ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीने जकार्ता राज्याचा ताबा घेतला. डचांच्या अद्ययावत अशा सागरी शक्तींनी डच ईस्ट इंडिया कंपनीला येथील प्रदेश सर करण्याच्या कामी मदत केली. ३१ डिसेंबर १७९९ साली कंपनीचा कारभार संपुष्टात आला आणि इंडोनेशियाची बेटे प्रत्यक्षपणे डच सरकारच्या आधिपत्या-खाली आली.

एकोणिसाव्या शतकात डचांनी इंडोनेशियामध्ये कॉफी आणि रबराच्या लागवडीस सुरुवात केली आणि मसाल्याच्या पदार्था-बरोबरच वरील दोन वस्तूंच्या निर्यातीला धूमधडाक्याने सुरुवात केली.

डचांच्या पारतंत्र्यातून आपली सुटका करून घेण्यासाठी इंडो-नेशियाला खूप मोठमोठे लढे द्यावे लागलेले आहेत. १८०६ ते १९०७ या काळात इंडोनेशियामध्ये जवळ जवळ पंचवीस वेळा बंडे झाली. सर्वात अधिक भीषण लढा जो १८७२ ते १९०४ या काळात सतत लढला गेलेला आहे. आणि या लढ्याचे पर्यवसान म्हणून इंडोनेशिया-मध्ये प्रथमच 'बोयेदी ओटोमो' ( Boedi Oetomo ) नावाच्या राजकीय संघटनेने जन्म घेतला. ही संघटना १९०८ साली अस्तित्वात आली. आणि तिच्याकडे इंडोनेशियाचा बुद्धिवादी वर्ग आणि सरकारी अधिकारीवर्ग देखील आकर्षिला गेला.

त्यानंतर १९११ मध्ये 'सारीकत इस्लाम' ( Sarikat Islam ) नावाची दुसरी एक राजकीय संस्था अस्तित्वात आली. तिचे ध्येय स्वराज्याचा हक्क मिळविणे हे होते. हळू हळू ही संघटना चांगलीच वाढली. ठराविकपणे या संघटनेमध्येही डावे–उजवे कार्य-कर्ते निर्माण झाले आणि त्यामुळे ही संघटना फुटून तिचे दोन पक्ष बनले. १९१२ मध्ये आणखी एक राजकीय संघटना अस्तित्वात आलेली होती. तिचे रूपांतर क्रांतिकारकांच्या संघटनेत झाले. १९२७

साली कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली इंडोनेशियामध्ये एक बंड झाले. त्या बंडाचा बीमोड करण्यात आला. आणि या बंडानंतर 'पार्टी नॅशनल इंडोनेशिया' नावाची एक संघटना डॉ. सुकार्नो यांच्या नेतृत्वाखाली अस्तित्वात आली. १९३९ साली अनेक राजकीय पक्ष एकत्र आले आणि त्यांनी मिळून एक संघटना निर्माण केली. तिचे नाव Gabungan Politik Indonesia असे होते. या संघटनेने स्वतंत्र लोकसभेची मागणी केली आणि कायदा आणि शासनविषयक अधिकारांची मागणी केली.

१९४१ च्या डिसेंबरमध्ये प्रशांत महासागरामध्ये युद्ध भडकले. अगोदरच युरोपच्या युद्धामध्यें डचांचा पाडाव झालेला होता, त्यामध्ये या धक्क्याने डचांचे इंडोनेशियातील शासन कोलमडले आणि १९४२ मध्यें इंडोनेशिया जपान्यांच्या अधिकाराखाली आला. मग मात्र दुसऱ्या महायुद्धात जपानचा जेव्हा पाडाव झाला तेव्हा डॉ. सुकार्नो यांनी इंडोनेशियात स्वातंत्र्याची घोषणा केली. स्वतंत्र इंडोनेशियाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. सुकार्नो यांची नियुक्ति झाली आणि डॉ. मुहम्मद हाटा यांना उपराष्ट्राध्यक्ष म्हणून नेमले गेले.

१९४५–४६ च्या दरम्यान डचांच्या लष्करी तुकड्या पुन्हा इंडोनेशियाकडे परतल्या. आणि इंडोनेशियन राष्ट्रवाद्यात आणि त्यांच्यात चकमकी उडाल्या. १४ ऑक्टोबर १९४६ रोजी डच आणि इंडोनेशियन्स यांच्यामध्ये एक तह झाला. प्रत्यक्षतः या करारावर २५ मार्च १९४७ रोजी सह्या झाल्या. या करारान्वये, १ जानेवारी १९४९ रोजी इंडोनेशियाला स्वराज्य बहाल केले जाणार होते! जावा, सुमात्रा आणि मादूरा यांच्यावरील सध्याची सत्ता डचांनी मान्य केली होती. परंतु पुढे काही तरी निमित्तावरून डचांनी इंडोनेशियाशी भांडण उपस्थित केले आणि २१ जुलै १९४७ रोजी इंडोनेशियामध्ये 'पोलीस कारवाई' ला सुरुवात झाली. यामुळे आशियाकडील हा पूर्वभाग अस्थिर आणि धोक्याचा बनला. इतर देशांना या राजकीय अस्थैर्याकडे दुर्लक्ष करता येणे अशक्य होते.

त्याचे पर्यवसान भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी ३० जुलै रोजी यूनोच्या सुरक्षा मंडळाला पत्रे लिहून इंडोनेशियामधील अस्थिरतेबद्दल काळजी व्यक्त केली. ३ ऑगस्ट रोजी सुरक्षा मंडळाने युद्धबंदी आणि शांततापूर्ण वाटाघाटीसाठी या देशांना आवाहन केले. तसेच लगेच एक समितो (बेल्जियम, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका या सभासद राष्ट्रांची) स्थापन करून हा प्रश्न त्या समितीकडे सोपविला.

परंतु वर्षाअखेर डचांनी इंडोनेशियामध्ये पुन्हा एक मोठी लष्करी कारवाई घडवून आणली. २४ डिसेंबर १९४८ रोजी सुरक्षा मंडळाने तेथे ताबडतोब युद्धबंदीचा आदेश दिला. आणि तेथील राजबंद्यांची सुटका केली जावीं असे आवाहन केले.

त्यानंतर नव्या दिल्लीमध्ये इंडोनेशियाचा प्रश्न विचारात घेण्यासाठी पंधरा राष्ट्रांची एक बैठक भरली. या बैठकीत पंधरा राष्ट्रांनी निर्णय घेऊन डचांना, इंडोनेशियातील राष्ट्रवाद्यांशी वाटाघाटी करण्यास भाग पाडले.

हेग येथे १९४९ मध्ये या दोघांमध्ये बोलणी झाली आणि २७ डिसेंबर १९४९ रोजी इंडोनेशियाचे संयुक्त स्वतंत्र सरकार अस्तित्वात आले. मात्र त्याचा दर्जा डच–इंडोनेशियन संघातील एक घटक असा राहिला.

इंडोनेशियाने स्वातंत्र्यासाठी अत्यंत चिकाटीने केलेली चळवळ जगातील स्वातंत्र्यलढ्यांच्या इतिहासात फार लक्षणीय आहे. कारण अशा चळवळीसाठी देशात जे वातावरण लागते, जी एकी लागते ते वातावरण आणि ती एकी अनेक दृष्टींनी दुरापास्त होती. कारण इंडोनेशिया हा देश अनेक बेटांचा मिळून बनलेला आहे हे मागे सांगितलेच आहे. ही वेगवेगळी बेटे अखंडत्वाच्या भावनेत अडथळा होती. लोकांची भाषा एक नव्हती, धर्म एक नव्हता, जात एक नव्हती. अशा परिस्थितीत प्रत्येकाच्या मनामध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटवून शक्ति एकत्र करणं किती अवघड काम होते याची निदान आपणा भारतीयांना तरी कल्पना असावयास पाहिजे. परंतु हे काम

तेथील नेत्यांनी फार जबाबदारीने आणि कुशलतेने केलेले आहे. जातीय, धार्मिक, वंशीय ऐक्य तर तेथे नव्हतेच परंतु आणखी मोठी अडचण ही होती की तेथे शिक्षणाचा अभाव होता. सुविद्य नागरिक तर सोडाच परंतु साधे शिक्षित नागरिकदेखील तेथे बहुसंख्येने मिळणे दुरापास्त होते.

डचांच्या कारकीर्दीत इंडोनेशियाच्या अंदाजपत्रकात शिक्षणा-वर केवळ पांच ते आठ टक्के खर्चाची तरतूद केलेली असे. १९३० च्या अहवालात तेथील नागरिकांचे साक्षरतेचे प्रमाण सहा टक्के दाखविलेले आहे. पुढे देखील हे प्रमाण अत्यंत मंद गतीनें वाढत गेलेले दिसते.

यावरून एक गोष्ट सहज लक्षात येईल की स्वातंत्र्यभाव-नेचा प्रसार सामान्य जनापर्यन्त आणून पोहोचविणे किती कठीण कर्म होते.

धर्माच्या दृष्टीने विचार केल्यास इंडोनेशियात इस्लाय धर्माचे प्राबल्य अधिक दिसून येते. आणि इस्लामी धर्मामध्ये एकीची बरीच बीजें आहेत. शिवाय इंडोनेशियाचा इतिहास पाहिला तर जवळ-जवळ नव्वद टक्के लोक या धर्माला चिकटून राहिल्याचे दिसते. तरीही स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेसाठी ही धर्मभावना नेत्यांना उपयोगी पडली नाही. कारण राष्ट्रीयत्वाच्या चळवळीने प्रभावित झालेल्या तेथील नेत्यांना धर्मभावनेने स्वातंत्र्यदेवतेला आवाहन करण्यापेक्षा निधर्मी भावनेने सर्व शक्ति एकत्र आणणे हिताचे वाटले.

जरी नेत्यांनी वरील निधर्मी पद्धतीने स्वातंत्र्य मिळविण्याच्या मार्गाचा अवलंब केला तरी त्यामध्येदेखील त्यांना बरेच अडथळे येत होते. ते अडथळे प्रामुख्याने सुशिक्षित–अशिक्षित; सुधारणावादी परंपरावादी; पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार केलेले आणि पाश्चात्य संस्कृतीचा तिरस्कार करणारे अशा परस्परविरोधी किती तरी शक्ति एकमेकांना छेद देत होत्या, नेत्यांच्या पुढे अडचणींचे डोंगर रचून ठेवीत होत्या. परंतु त्यामुळेच नेतृत्वाला आव्हान मिळत होते, तसेच चैतन्य आणि स्फूर्तीही मिळत होती. वेगवेगळ्या पातळ्यांवर नेतृत्वाचे

नवनवीन पैलू निर्माण होत होते, आणि अशा तऱ्हेने ही स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन भिडत होती.

अशा प्रकारच्या नेतृत्वाचा नवीन आविष्कार १९३९ साली उलित झाला. या साली निरनिराळ्या पातळ्यांवरून स्वातंत्र्याचे कार्य करणाऱ्या राजकीय संस्था एकत्र आल्या आणि त्यांनी आपले एक संयुक्त मंडळ स्थापले. हे मंडळ देशातील सहकारवादी आणि असहकारवादी मनोवृत्तींना एकत्र आणून त्यांच्यामध्ये एकी निर्माण करण्यात बरेच यशस्वी ठरले. या चळवळीमध्ये देशातील तरुण होते, स्त्रिया होत्या, कामगारमंडळे होती, शाळेतील विद्यार्थी होते आणि निरनिराळी सांस्कृतिक मंडळेही होती.

या प्रकाराने देशात निर्माण झालेल्या शक्तीला तोंड देणे डचांना फार कठीण जात होते. त्याची प्रतिक्रिया म्हणुन डचांनी देशामध्ये दडपशाहीचे धोरण चालू केले. यातच १९२६–२७ चा देशव्यापी उठाव झाला. राष्ट्रवाद्यांनी केलेला हा एक प्रचंड उठाव होता. या उठावाला प्रतिउत्तर म्हणून तेवढीच प्रखर दडपशाही डचांनी सुरू केली. त्यामध्ये देशातील अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली. मोठमोठाले कार्यकर्ते डॉ. सुकार्नो आणि ह्राटा यांच्यासारख्या प्रभावी नेत्यांची धरपकड झाली आणि त्यांना न्यू गिनीमध्ये हद्दपार केले गेले. ज्या छोट्या मोठ्या नेत्यांची धरपकड झालेली नव्हती त्यांना डचांच्या कायद्यांची बंधने पाळून स्वातंत्र्याची चळवळ चालू ठेवणे फार कठीण जाऊ लागले. एका विशिष्ट प्रकारच्या पोलीस बातमीदारांचे जाळे डचांनी देशात पसरवून दिले. त्यामुळे कार्य-कर्त्यांना कसल्याही प्रकारच्या स्वातंत्र्यविषयक हालचाली करणे जवळ जवळ अशक्यच होऊन बसले. परंतु स्वातंत्र्य–चळवळीचे हे कुंड भडाडून पेटू शकलें नसले तरी त्या काळात तें संपूर्ण विझलेही नव्हते. ते धगधगत राहिले होते. अनेक गुप्तसुप्त मार्गांनी स्वातंत्र्याची चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचत होती आणि उठाव करण्यासाठी संधीची वाट पाहात राहिली होती.

आणि १९३० साली तिचा पुन्हा एकदा उठाव झाला.

लोकांनी संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली. परंतु डचांनी या मागणीला मुळीच दाद दिली नाही. १९४० साली नेदरलँडचा ताबा घेतल्यानंतर तर दडपशाहीसाठी त्यांनी उत्तम मोर्चाची बांधणी केली.

जपानी लोक जेव्हा इंडोनेशियामध्ये आले तेव्हा इंडोशियन लोकांचे सरकार हे नाममात्रच होते. मध्यवर्ती सरकारच्या स्वरूपात तेथे एक मंत्रीमंडळ होते. या मंडळाला अधिकार आणि कायदेकानू करण्याविषयी मर्यादित अधिकार होते. त्यांचा जो वरिष्ठ–गव्हर्नर जनरल होता त्याला नकाराचा अधिकार होता.

या मंत्रीमंडळाची रचना कशी होती पाहा ! ज्या इंडोनेशियन लोकांचे आणि लोकांसाठी हे मंत्रीमंडळ होते, त्या इंडोनेशियन लोकांचे देशांतील एकंदर लोकसंख्येशी प्रमाण अठ्ठ्याण्णव टक्के होते. परंतु त्यांच्या प्रतिनिधींना मंत्रीमंडळात केवळ पन्नास टक्के जागा होत्या. सर्व सत्ता जपान्यांच्याच हाती होती. हा कारभार असाच रेंगाळत चाललेला होता. लोकजागृति होत नव्हती आणि लोकनेत्यांची स्वराज्यविषयक आणि स्वातंत्र्यविषयक स्वप्ने अस्तित्वात येत नव्हती.

परंतु जपान्यांच्या अंतिम हिताच्या दृष्टीनेही ही परिस्थिती निराशाजनकच होती असे म्हणावे लागेल. कारण इंडोनेशियाचे लोक-नेते निराश होते; अनेक राजकीय बंधनामध्ये जखडले गेले होते, त्यामुळे बहुजन समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य थंडावले होते. इंडोनेशियातील बहुसंख्य लोक कार्यविन्मुखच राहिले होते, कारण परकीय सरकार हे त्यांना आपले वाटत नव्हते आणि उत्पादन वाढीसाठी त्यांच्यावर जी जुलूमजबरदस्ती केली जात होती, त्यामुळे तर त्यांच्या नाराजीमध्ये भरच पडली होती. जेवढा धाक दडपशा अधिक तेवढी उत्पादनातील प्रगति कमी. शिवाय जपानी लोकांनी इंडोनेशियाला स्वातंत्र्यदानाचे जे आश्वासन दिले होते ते एक प्रचंड ढोंग आहे याची प्रचीति जपान्यांच्या प्रत्येक कृतीवरून येत होती. त्यामुळे एकंदर राष्ट्रीय वृत्तीमध्ये निराशा पसरलेली दिसत होती.

या साऱ्यांचा परिणाम एकच झाला. तो म्हणजे दुसऱ्या महायुद्धामध्ये जपानला जबरदस्त तडाखा बसला आणि वसाहतीमध्ये त्याने पेरून ठेवलेली शक्ति खिळखिळी झाली तेव्हा इंडोनेशियामधून त्याला आपले चंबूगबाळे उचलावे लागले.

आग्नेय आशियामध्ये जपान्यांना इतक्या अनपेक्षितपणे शरणागती पत्करावी लागली याचे दोस्तांना आश्चर्य वाटले. याचा फायदा घेऊन राष्ट्रवादी लोकनेत्यांनी १७ ऑगस्ट १९४५ रोजी लोकसत्ताक राज्याची घोषणा केली. या चळवळीचे नेतृत्व डॉ. सुकार्नो आणि महंम्मद हाटा यांच्याकडे होते. जपान्यांचा इंडोनेशियातील जोर कमी झाल्याबरोबर ती जागा भरून काढण्याचा ब्रिटिशांनी प्रयत्न केला. सप्टेंबर १९४५ मध्ये ब्रिटिश फौजांनी जावामध्ये हळूहळू शिरकाव करण्यास सुरुवात केली. परंतु तेव्हा इंडोनेशियाचे लोकसत्ताक राज्य एक महिन्याचे झाले होते. डचांचा अंदाज असा होता की, इंडोनेशियाचे हे गणराज्य जपानमध्ये उदयास आलेले असले पाहिजे आणि त्याची सूत्रे तिकडूनच हलत असली पाहिजेत. अर्थात् इंडोनेशियाच्या जनतेचा त्याला पाठिंबा नसावा. परंतु त्यांचा हा अंदाज चुकीचा होता. इंडोनेशियाचे सरकार हे खरेखुरे राष्ट्रवादी आणि संपूर्ण इंडोनेशियाचे प्रातिनिधिक सरकार होते. त्याची पकड इंडोनेशियाच्या जनतेवर आणि तेथील राजकारणावर जबरदस्त होती.

तरीही ब्रिटिशांच्या फौजांच्या हालचालीमुळे एक गोष्ट सुकर झाली ती म्हणजे इंडोनेशियामध्ये पुन्हा डचांचे आगमन सुकर झाले. हळूहळू डचांनी पुन्हा तेथे सत्ता आणि लष्कर यांची प्रतिष्ठापना करण्यास सुरुवात केली ! ब्रिटिशांना त्यावेळी ब्रह्मदेश, सयाम, मलाया, दक्षिण इंडोचायना आणि इंडोनेशिया येथे लष्करी साह्य द्यावयाचे असल्यामुळे त्यांना इंडोनेशियामधील राज्यकर्त्यांना परिमित स्वातंत्र्य दिले आणि त्यांचा विश्वास संपादन केला. परंतु त्याच वेळी, ब्रिटिशांनी डचांनादेखील इंडोनेशियातील बटाव्हिया, बांडुंग, सेमरंग आणि सुराबाजा येथे आपले लष्कर आणि मुलकी अधिकारी ठेवण्यास परवानगी दिली.

ब्रिटिश आणि डचांची एकीकडे अशी कारवाई चालू असताना दुसरीकडे इंडोनेशियातील लोकसत्ताक सरकारही केवळ गप्प बसून राहिलेले नव्हते. जाकार्तामध्ये आणि इतर शहरांमध्ये, एकीकडे ब्रिटिश आणि डचांशी बोलणी करीत आणि दुसरीकडे सत्ता बळकट करीत या सरकारचीही वाटचाल चालूच होती. याठिकाणी ब्रिटिशांच्या जवळ ज्या लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांच्या तुकड्या होत्या त्यांमध्ये हिंदी लोकांचाच भरणा अधिक होता, आणि राजकीय उद्दिष्टे साधण्यासाठी ब्रिटिशांना या लोकांवर विसंबून राहणे सुरक्षितपणाचे वाटत नव्हते ! त्यामुळे ब्रिटिशांनी या उद्दिष्टांसाठी जपानी तुकड्यांची मदत घेण्यास सुरुवात केली. याचा परिणाम इंडोनेशियाच्या बाबतीत अगदी उलट झाला. सारा इंडोनेशिया या कारवाईमुळे आणि लष्करी हालचालीमुळे खवळून उठला. या प्रचंड उठावामुळे पुन्हा एकदा इंडोनेशिया जगाचे दृष्टिपथात आला.

याचा परिणाम म्हणून यूनोला या प्रकरणी लक्ष घालावे लागले. ज्याप्रमाणे डच, जपान, ब्रिटन यांचे कारस्थान जगापुढे आले तसेच अमेरिकेचा हातही लोकांच्या दृष्टिपथात आला.

या साऱ्यांचा परिणाम म्हणून इंडोनेशियाच्या सरकारशी वाटाघाटी करून हा पेचप्रसंग सोडवावा ही कल्पना हेगनेंही मान्य केली.

परंतु या वाटाघाटी एकीकडे चालू असता डचांनी एक नवीन चाल चालण्यास सुरुवात केली. इंडोनेशियाचे लोकसत्ताक सोडून इतर ठिकाणी म्हणजे बोर्निओ, सुंडास (Lesser Sundas), मलाक्का आणि सेलिबीस येथे तथाकथित स्वयंशासित सरकारे स्थापन केली.

या चालीत त्यांचा हेतु उघड होता. इंडोनेशियामध्ये हळूहळू आपला प्रभाव वाढविणे आणि तेथील लोकराज्याला आपल्या या राज्याचा शह निर्माण करणे. म्हणजे पुढे मागे साऱ्या इंडोनेशियाचे जे एक एकावयवी, संयुक्त सरकार स्थापन होणार होते त्याला चांगली खीळ बसणार होती.

ऑक्टोबर १९४६ मध्ये पुन्हा वाटाघाटींना सुरुवात झाली. ब्रिटिशांनी इंडोनेशियामधून आपले लष्कर काढून घेण्याविषयी संमति दिलेली होती. आणि त्यानंतर इंडोनेशियामध्ये डच लष्कराच्या अस्तित्वाविषयी एक करार झाला. त्या करारान्वये असे ठरले की ब्रिटिशांनी आपले जेवढे लष्कर इंडोनेशियामधून काढून घेतलेले असेल त्या संख्येपर्यंत डचांनी आपले लष्कर इंडोनेशियात ठेवावे.

इंडोनेशियातील या लष्करी परिस्थितीचे गणित असे होते : डच सैन्यापेक्षा इंडोनेशियाचे स्वतःचे सैन्य जवळ जवळ दुप्पट होते. परंतु अद्ययावतपणाच्या दृष्टीने इंडोनेशियाचे सैन्य निकृष्ट होते. १५ नोव्हेंबर १९४६ रोजी नेदरलॅन्डस् आणि प्रजासत्ताक इंडोनेशिया यांच्यामध्ये एक राजकीय करार झाला. आणि ३० नोव्हेंबर रोजी ब्रिटिश लष्कराची शेवटची तुकडी इंडोनेशिया सोडून गेली. इंडोनेशिया आणि नेदरलॅन्डस्‌मध्ये जो करार झाला तो लिंगाडजती (Linggadjati) करार या नावाने ओळखला जातो. या करारातील कलमानुसार हेगने जावा, सुमात्रा आणि मादुरा येथील सरकारला कायदेशीर सरकार म्हणून मान्यता दिली. राहिलेली बेटे जी डचांच्या आधिपत्याखाली होती ती त्यांनी १ जानेवारी १९४९ पर्यंत इंडोनेशियाच्या लोकसत्ताकाच्या स्वाधीन करावयाची होती. आणि याच तारखेला नेदरलॅन्डस् आणि इंडोनेशियाचे लोकसत्ताक हे स्वतंत्र सार्वभौम लोकशाही संघराज्य म्हणून अस्तित्वात यावयाचे होते. ज्याला ‘युनायटेड स्टेटस् ऑफ इंडोनेशिया’ असे संबोधिले जाणार होते. त्या राज्याचे तीन विभाग होणार होते : (१) इंडोनेशियाचे लोकसत्ताक (२) बोर्निओचा प्रदेश आणि (३) पूर्व इंडोनेशियाचा प्रदेश. या विभागणीमध्ये अशीही एक सोय होती की कुठल्याही एका प्रदेशातल्या लोकांना जर इंडोनेशियाच्या संघराज्यात सामील व्हावयाचे नसेल तर तसे त्याने लोकशाही मार्गाने ठरवावे. अशा लोकांना इंडोनेशियाचे लोकसत्ताक आणि नेदरलॅन्डस् यांच्याशी खास संबंध प्रस्थापित करता येत असत.

युनायटेड स्टेटस् ऑफ इंडोनेशियाच्या या तीन राज्यातील

प्रतिनिधींनी, लोकशाही पद्धतीने निवडून येऊन आपली एक घटना-समिति स्थापन केली आणि तिने युनायटेड स्टेटस् ऑफ इंडोनेशियाची घटना निश्चित करण्याचे काम सुरू केले.

१ जानेवारी १९४९ रोजी नेदरलॅन्डस् आणि इंडोनेशियाचे युनियन स्थापन होणार होते. त्यांच्यावर राजमुकुटाचे आधिपत्य राहणार होते. मात्र ही दोन्हीही राज्ये स्वतंत्र आणि सार्वभौम म्हणूनच राहणार होती. नेदरलॅन्डस्ने असेही प्रसिद्ध केले की असे युनियन अस्तित्वात आल्याबरोबर आम्ही इंडोनेशियाला यूनोचे सभासदत्व मिळावे म्हणून अर्ज करू. तसेच लिंगाडजती करारानुसार काही मतभेद निर्माण झाले तर एखाद्या मध्यस्थामार्फत आम्ही ते दूर करू. आणि अशा मध्यस्थीचा मुद्दा आणि मध्यस्थी स्वीकारण्याची दोघांची अनुकूलता यांचा यूनोत फार गाजावाजा झाला. शेवटी इंडोनेशियाचा प्रश्न शांततेने मिटला याचे सर्वांना समाधान वाटले.

तथापि, असे असले तरी जावा आणि सुमात्रा या बेटांमध्ये युद्धसदृश हालचाली चालूच होत्या. बारीक बारीक मुद्द्यावरून कुरबुरीला सुरुवात होत होती आणि त्याचे रूपांतर चकमकीत होत होते. विशेषतः व्यापारविषयक जे धोरण डचांनी १९४७ साली आखलेलें होते त्याची पद्धतच अशी होती की त्यामुळे इंडोनेशियाच्या लोकसत्ताकाचा कोंडमारा व्हावा! तसेच नेदरलॅन्डस्ने देखील इंडोनेशियाशी आपले धोरण सहकाराचे राहू दिले नाही. त्यांनी आपला आणि इंडोनेशियाचा ग्रह असा करून दिला की इंडोनेशियामध्ये नवे लोकसत्ताक अस्तित्मात येईपर्यंत त्याची सर्व जबाबदारी आपल्यावरच आहे. तसेच करारामधील 'संयुक्त' शब्दाचा अर्थ त्यांनी असा घेतला की इंडोनेशियातील इतर स्वतंत्र प्रांतांना इंडोनेशियाच्या लोकसत्ताकाइतकाच स्वतंत्र राहण्याचा हक्क आहे.

अशा सर्व मुद्द्यांमुळे आणि त्या मुद्द्यानुसार होणाऱ्या डचांच्या हालचालीमुळे लिंगाडजती करार तर धोक्यात आलाच, परंतु त्याहीपेक्षा अधिक म्हणजे इंडोनेशियाची परिस्थिती अधिक खिळखिळी होण्याचा धोका निर्माण झाला.

याचे पर्यवसान असे झाले की शेवटी डचांनी इंडोनेशियाच्या सरकारला एक निर्वाणीचा खलिता पाठविला. त्यामध्ये त्यांनी इंडोनेशियाचे एक स्वायत्त ( Federal ) राष्ट्र बनविण्याचे आवाहन केले. त्यामध्ये डचांच्या अधिकाराखाली जे प्रांत होते त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य राहणार होते. तसेच त्यांना परराष्ट्र धोरण, लष्कर आणि अर्थविषयक धोरणात स्वातंत्र्य राहावे असा डचांचा आग्रह होता. इंडोनेशियाच्या सरकारने डचांच्या या पत्राला उत्तर पाठवून फक्त एक तात्पुरते स्वायत्त सरकार स्थापण्याला सम्मती दिली होती, परंतु त्यांचे इतर मुद्दे मात्र त्यांनी धुडकावून लावले होते.

अर्थात या वाटाघाटीमध्ये पुन्हा मतभेद निर्माण झाले आणि त्या मतभेदाचे रूपांतर तणातणीत झाले. त्यातच दुसऱ्या महायुद्धामुळे साऱ्या जगावर जी मंदीची लाट आलेली होती तिचाही परिणाम इंडोनेशियाच्या परिस्थितीवर झाला होता.

या साऱ्या परिस्थितीमुळे डचांची मनोराज्ये सफळ होण्यात अडथळे येत होते, मात्र या दोन वर्षात इंडोनेशियाचे लोकसत्ताक अगदी अनपेक्षितपणे लोकप्रिय होऊ लागले होते. या राष्ट्रीय सरकारचे सूत्रधार अध्यक्ष म्हणून डॉ. सुकार्नो आणि उपाध्यक्ष म्हणून महमद हाटा होते. त्यांचे छोटेसे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि त्यांची कार्य करण्याची पद्धती बरीच लोकप्रिय झालेली होती. आणि तिला इंडोनेशियाच्या घरगुती राज्यकारभारात प्राधान्य मिळत चालले होते. तसेच आर्थिक क्षेत्रातही इंडोनेशियाच्या सरकारने यश मिळविले होते. सर्वात मोठी आणि अधिक परिणामकारक गोष्ट अशी होती की इंडोनेशियातील कामगारवर्ग हा सारा एकत्र होऊन राष्ट्रीय सरकारच्या पाठीशी उभा होता. त्यांची संख्या जवळ जवळ १२,००,००० होती. त्यामुळे बाहेरच्या राष्ट्रांनाही इंडोनेशियाबरोबर आर्थिक व्यवहार करण्यात धोका वाटेनासा झाला आणि त्या सरकारचे पारडे जड होऊ लागले.

अर्थात् ही परिस्थिती डचांना आवडणे शक्यच नव्हते. राष्ट्रीय सरकारचे पारडे स्वदेशात आणि बाहेरच्या देशात अशा रीतीने जड

होऊ लागले तर तो डचांच्या सत्तेला सुरुंगच नव्हता काय ? याचा परिणाम म्हणून २१ जुलै १९४७ रोजी डचांनी तेथे पोलिस कारवाईला सुरुवात केली. पुन्हा एकदा साऱ्या इंडोनेशियामध्ये अस्थैर्य माजले. परंतु यावेळी यूनोच्या सुरक्षा मंडळाने लगेच कारवाई करून डच आणि इंडोनेशियन्स यांच्यामधील युद्ध थांबविले. परंतु याचा परिणाम इंडोनेशियाला भोगावाच लागला. तो असा की या पोलिस कारवाईचा परिणाम म्हणून जवळ जवळ जावा बेटाचा अर्धा भाग इंडोनेशियाच्या हातून निसटला आणि इंडोनेशियाचे लष्करी बळ जे अगोदरपासूनच डचांपेक्षा कमकूवत होते ते अधिक विस्कळित झाले.

यूनोच्या सुरक्षा मंडळाने जरी युद्धबंदीचा आदेश दिलेला होता तरी तो आदेश परिणामकारक रीतीने पाळला जात नव्हता. याचे कारण साम्राज्यवाद्यांच्या कारवाया होत्या ही गोष्ट उघड होती. ब्रिटन, फ्रान्स आणि बेल्जियम यांची भूमिका अशी होती आणि 'यूनोला नेदरलॅन्डसच्या अधिकारकक्षेतील प्रदेशाविषयी काहीही न्यायनिवाडा देण्याचा अधिकार नाही.' असे त्यांचे म्हणणे होतें. याउलट फिलिपिन्स आणि भारताची भूमिका होती. २५ ऑगस्ट १९४७ रोजी सुरक्षा मंडळाने एक ठराव पास केला. हा ठराव अमेरिकेच्या पुढाकाराने संमत झालेला होता आणि रशिया, पोलंड आणि सीरिया या राष्ट्रांनी मतदानात भाग घेतलेला नव्हता. या ठरावान्वये सुरक्षा मंडळाने आपल्या दोन कचेऱ्या नेदरलॅन्डस् आणि प्रजासत्ताक इंडोनेशियामध्ये स्थापन करावयाच्या होत्या. नेदरलॅन्डस् आणि इंडोनेशियाने अनुक्रमे बेल्जियम आणि ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधी या कचेऱ्यातील मंडळांसाठी निवडले. पुढे या प्रतिनिधींनी अमेरिकेस तिसरा सभासद म्हणून निवडले.

त्यानंतरही डच आणि इंडोनेशियन सरकार यांच्यामध्ये चकमकी झडतच गेल्या. शेवटी यूनोच्या या कचेऱ्यातील सभासदांनी डच आणि इंडोनेशियन सरकारच्या प्रतिनिधींची एक बैठक इंडोनेशियाबाहेर बोलावली. तिच्यात बऱ्याच वाटाघाटी झाल्या. या वाटाघाटी-

मध्ये अमेरिकेने खूप मोठी कामगिरी बजावली आणि शेवटी या बैठकीचा शेवट एक ठराव पास करण्यात झाला, ज्याला रेनिव्हाईल (Renville) करार म्हणून ओळखले जाते जानेवारी १९४८ मध्ये हा रेनिव्हाईल करार सुरक्षा मंडळाकडे पाठविण्यात आला.

तसे काही फार मोठे, परिणामकारक मुद्दे या करारात मुळीच नव्हते. लिंगाडजती कराराप्रमाणेच याही करारात बऱ्याच पळवाटा होत्या. परंतु ऐतिहासिक दृष्टीने हा करार म्हणजे इंडोनेशियातील राजकीय घडामोडींची आणखी एक पायरी होती असे म्हणता येईल! युद्धबंदी परिणामकारक करणे, निर्लष्करी पट्टा वाढविणे, दोन्हीकडून शत्रूत्व वाढेल अशा कारवाया न करणे अशासारख्या नीतीतत्वाच्या पाठाप्रमाणें या करारातील सूचना होत्या.

या रेनिव्हाईल करारामध्ये जनमत–कौलाचेही एक कलम होते. वादग्रस्त टापूमध्ये अशा प्रकारे, सहा महिन्यापासून वर्षाचे आत जनमत कौल घ्यावा आणि तेथील प्रश्न सोडवावा असे ते कलम होते. या तरतुदीमुळे इंडोनेशियाच्या लोकसत्ताकाला जणू आपली विस्कळित झालेली पक्कड पुन्हा नीट बसविण्याची संधीच दिली गेली होती. अशा निवडणुका घेण्याच्या पूर्वीच्या काळात लोकांना राजकीय मतप्रदर्शन मोकळेपणाने करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले होते. शिवाय कुठल्याही प्रांतात लोकांच्या अनुमतीशिवाय कोणत्याही प्रकारचा शासकीय बदल होणार नाही याविषयी आश्वासन दिले गेले होते. आणखी, युनायटेड स्टेटस् ऑफ इंडोनेशियाची घटना बनविण्यासाठी प्रत्येक प्रांतामधील प्रतिनिधींना पाचारण करण्यात येईल आणि प्रतिनिधींना आमंत्रण करण्याचे प्रमाणात त्या त्या प्रांतातील लोकसंख्येच्या प्रमाणाशी सुसंगत असेल अशीही एक सोय होती. देशातील व्यापार आणि आर्थिक स्थैर्य हे पूर्वपदावर आणण्याचें कसोशीने प्रयत्न केले जातील याविषयीही या कलमातून आश्वासन दिले गेलेले होते.

शेवटी एकदाची स्वतंत्र इंडोनेशियाची घटना ठरविली गेली. त्यानंतर प्रत्येक प्रांतातील मंत्रीमंडळाने ठराव पास करून इंडोनेशि-

याचे संयुक्त प्रजासत्ताक बनविण्याचे ठरविले आणि या साऱ्या भावनांचा मथितार्थ लक्षात घेऊन जकार्ताच्या स्वायत्त लोकसभेने ३ मार्च १९५० रोजी सर्व इंडोनेशियाचे मिळून एक लोकसत्ताक सरकार स्थापण्याचा ठराव केला.

हे लोकसत्ताक लोकसभेने तात्पुरत्या बनविलेल्या घटनेनुसार राज्यकारभार पाहू लागले. ही तात्पुरती घटना सर्वसाधारणपणे अमेरिकेच्या घटनेप्रमाणे होती. या तात्पुरत्या घटनेनुसार कार्यकारी मंडळाचा प्रमुख म्हणून अध्यक्ष राहणार होता. आणि अध्यक्षांना मदतगार म्हणून उपाध्यक्षांची योजना होती. आणि पहिला उपाध्यक्ष हा गृहाच्या प्रतिनिधि मंडळाने निवडावयाचा होता. परंतु त्यालाही अध्यक्षांची अनुमति असणे आवश्यक होते.

स्वतंत्र इंडोनेशियाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. सुकार्नो यांची प्रचंड बहुमताने निवड झाली आणि उपाध्यक्ष म्हणून महम्मद हाटा यांची निवड झाली. प्रत्येक चार वर्षांनी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड होणार होती. तसेच सरकार हे प्रत्यक्षपणे अध्यक्षांना जबाबदार राहणार नसून प्रतिनिधि मंडळाला जबाबदार राहणार होते. म्हणजे इंडोनेशियाची घटना जरी तोंडावळयाने अमेरिकेच्या घटनेप्रमाणे असली तरी मंत्रीमंडळाचे कार्य मात्र ब्रिटिश मंत्रीमंडळाप्रमाणे चालणार होते.

अशा तऱ्हेने इंडोनेशियाने स्वातंत्र्य मिळविले, स्वराज्य स्थापन केले आणि आपल्या देशाच्या प्रगतीसाठी, भरभराटीसाठी तेथील नेत्यांनी अपार कष्ट सोसले. मी वर म्हटलेच आहे की मूलतःच इंडोनेशिया हा देश नैसर्गिक साधनांनी फार सधन आहे. तथापि, डचांबरोबरच अनेक देशांच्या सरकारांचा या देशावर स्वातंत्र्यपूर्वकाळात फार प्रभाव होता. त्यामुळे येथे साहजिकच अनेक राजकीय पक्षांची स्थापना झालेली होती. साधारणतः लहानमोठे मिळून येथे बावीस राजकीय पक्ष होते. अर्थातच देशामध्ये निरनिराळ्या राजकीय विचारसरणीची माणसे असणेही अगदी साहजिकच होते. या विचारसरणीचा परिणाम तेथील राज्यकर्त्यांच्या विचारसरणींवरही पडलेला

दिसून येतो. याचे एक उदाहरण असे की डॉ. हाटा हे कम्युनिस्टांचे सहप्रवासी नसले तरी त्यांच्या मनाचा कल तिकडे झुकलेला होता. याविषयी मतप्रदर्शनाची वेळ आली तेव्हा ते म्हणाले होते : मुस्लिम धर्माचा एक अनुयायी म्हणून माझे कम्युनिस्ट विचारसरणीशी सख्य असायचे काही कारण नाही; परंतु मी लोकशाही विचारसरणीचा माणूस असल्यामुळे एक विचारसरणी म्हणून कम्युनिस्ट विचारसरणी मी नष्ट करू शकत नाही !

राजकीय मनोवृत्तींचे कडबोळे हे येथील नेत्यांच्या एकत्र येण्याने कसे निर्माण झाले होते याचे वरील एक उत्तम उदाहरण आहे. येथील राजकीय तोल सांभाळण्यासाठी निर्माण करावे लागलेले दुसरे एक तत्वज्ञान म्हणजे स्वत: अध्यक्ष डॉ. सुकार्नो यांच्याच आवडत्या शब्द-प्रयोगात सापडते. तो शब्दप्रयोग म्हणजे ' नासाकोम ' Nasakom. याचा अर्थ राष्ट्रवाद, धर्म आणि कम्युनिझम यांचे एकत्रीकरण.

म्हणजे स्वतंत्र झालेल्या या साऱ्या बेटांवर एकछत्री राज्य करण्यासाठी लोकशाही राज्यपद्धतीमध्ये देखील परिस्थितीनुरूप आणि तेथील वातावरणानुरूप कसा बदल करणे आवश्यक होते याची वरील दोन उदाहरणांवरून सहज कल्पना येऊ शकेल.

आता इंडोनेशियाने स्वातंत्र्य मिळविले तेव्हा त्याची स्थिती कशी होती हे थोडक्यात पाहू : इंडोनेशियावर जपान्यांनी कब्जा केला होता तेव्हा राजकीयदृष्ट्या इंडोनेशियाची स्थिती फार केविलवाणी झालेली होती. तसेच त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचीही कोंडी झालेली होती; शिवाय ते दिवस दुसऱ्या महायुद्धाचे होते आणि जपान्यांनी त्या युद्धामध्ये प्रत्यक्ष भाग घेतलेला असल्यामुळे इंडो-नेशियन जीवनावर युद्धाचा देखील परिणाम होणे अपरिहार्य झालेले होते. पुष्कळशा भागातून जमीन अत्यंत खराब झालेली होती, त्यामुळे राष्ट्राला आर्थिक विपन्नावस्था आलेली होती. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी चळवळींना दुहेरी संकटांना तोंड द्यावे लागलेले होते. राजकीय कार्यक्रमांबरोबरच आर्थिक कार्यक्रमही त्यांना हाती घ्यावा लागलेला होता. अशातऱ्हेने इंडोनेशियाच्या खऱ्या सत्वपरीक्षेला

१ जानेवारी १९५० पासूनच खरीखुरी सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. भारताला देखील नेमक्या याच परिस्थितीतून जावे लागलेले आहे. फक्त भारताची भूमि ही निरनिराळ्या बेटांनी बनलेली नाही हे एकच ह्या दोन राष्ट्रांमधील वेगळेपण. या व्यतिरिक्त स्वातंत्र्य-प्राप्तीच्या वेळी आर्थिक हालाखी, महायुद्धाची (अप्रत्यक्ष) झळ, निरनिराळ्या धर्मांचा पगडा, शेतीला उपयुक्त असणाऱ्या जमिनींची अत्यंत हालाखीची परिस्थिती या साऱ्या गोष्टी दोन्ही राष्ट्रांमध्यें समान आहेत.

## अंतर्गत व्यवस्था :

या व्यवस्थेचे कार्य फार मोठे होते. वेगवेगळ्या बेटांवर, वेगवेगळ्या जातीधर्मांच्या विचारसरणीवर आणि राजकीय अज्ञाना-वर आधारलेल्या समाजाला एकात्मतेच्या भावनेनें बांधून घेणे हें पहिले काम होते. त्यासाठी राजकीय स्थैर्य, सामाजिक दृष्टिकोन आणि लष्कर मजबूत असणे आवश्यक होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात देशात कायदा नव्हता आणि राष्ट्रीय सरकारचे लष्कर फार कमजोर होते. पूर्वीच्या डच काळातील लष्करात भरती झालेल्या लोकांची राष्ट्राकडे पाहण्याची दृष्टी बदलणे जसे आवश्यक होते तसेच नवीन भरती करताना नव्याजुन्याचा सांधा बेमालूमपणे जोडून घेऊन हे लष्कर राष्ट्ररक्षणासाठी सन्मुख करणे सोपे काम नव्हते. परंतु १९५० सालाच्या मध्यावर सरकारने ते काम बहुअंशी यशस्वीपणे पार पाडले.

## अंतर्गत सुस्थिति :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारला प्रथमतः दोन प्रमुख गोष्टींकडे लक्ष पुरविणे आवश्यक होते; त्या म्हणजे दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा पुरवठा आणि देशात भरमसाट झालेल्या चलनवाढीला आळा घालणे. या संकटाचा रोजगारीवर परिणाम झालेला होता. पैशाला किंमत राहिलेली नव्हती आणि त्यामुळे कामगारवर्गाचे कामावरून लक्ष उडत चालले होते. याचा परिणाम उत्पादनावर आणि देशाच्या

आयात–निर्यातीवर होणे अपरिहार्य होते. तसा अनिष्ट परिणाम झालेलाही होता. यासाठी अवमूल्यनासारखे उपाय योजून देशाची निर्यात वाढविणे आणि आयातीवर बंधने घालून देशांतर्गत उत्पादनाला संरक्षण देणे आवश्यक होते. देशाची ही अंतर्गत स्थिति सुधारण्यासाठी आर्थिक उपाय योजणे आणि ते यशस्वी करणे आवश्यक होते.

## आर्थिक पुनर्रचना :

देशाच्या उभारणीसाठी दूरदृष्टी वापरून भविष्यकाळ उज्ज्वल करणे आवश्यक होते. त्यासाठी इंडोनेशियाने अमेरिकेच्या बँकेकडून कर्जाची उभारणी केली. आणि त्या पैशामधून अनेक देशोपयोगी मोठमोठाल्या योजनांची आखणी केली. तसेच आणखी निरनिराळ्या देशांशी इंडोनेशियाने आर्थिक करार केले आणि देशाबाहेरच्या लोकांना येथे आपले भांडवल गुंतवून उद्योगधंद्यांची उभारणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

१९५० सालात या सर्व हालचालींची चांगली फळे दिसून येऊ लागली आणि युद्धपूर्व आर्थिक परिस्थिति निर्माण होण्याची आशा निर्माण झाली. परंतु त्याबरोबर अनेक अडचणीही उभ्या राहिल्या होत्या. पहिली म्हणजे मोठमोठाल्या योजनांसाठी कामगार कमी पडू लागला, तसेच निरनिराळी यंत्रसामुग्री आणि साधनसामुग्री कमी पडू लागली. दळणवळणाची साधनेही पुरेशी नव्हती. सुमात्रासारखा निर्यातीचा प्रमुख प्रदेश पण तिथे कामगारांची चणचण भासू लागली आणि पारतंत्र्याच्या काळात जमीन बेकायदेशीरपणे बळकावून बसलेले जमिनीचे तथाकथित मालक, हाही उत्पादनामध्ये फार मोठा अडथळा होऊन बसलेला होता. तसेच ज्यांच्या ताब्यात मोठमोठ्या इस्टेटी होत्या त्या लोकांना, पुढच्या काळात त्या त्या इस्टेटी आपल्याकडेच राहतील याविषयी अभय हवे होते. त्याशिवाय उत्पादनाची भविष्यकालीन योजना ते निर्भयपणे आखू शकत नव्हते.

## परराष्ट्रनीति :

नवस्वतंत्र इंडोनेशियाने भारताप्रमाणेच अलिप्ततावादाचा पुरस्कार केलेला होता. बऱ्याचशा बाबतीत इंडोनेशियाचे भारतीय राजकारणाशी आणि भारतीय प्रदेशांशी साम्य आहे असे मी मागेच म्हटलेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी डॉ. सुकार्नो यांच्यापुढे प्रथमतः महात्मा गांधींच्या राजकारणाचा आदर्श होता ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. अर्थात पुढे पुढे निरनिराळ्या राजकीय मतप्रवाहामध्ये आणि हितप्रवाहामध्ये सापडून इंडोनेशियाने गेल्या वर्षी (१९६५) साली उघड उघड पाकिस्तानची बाजू घेऊन 'भारताला चिरडा' मोहीम सुरू केली. ही गोष्ट अलाहिदा ! परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या काळात इंडोनेशियाने अलिप्ततावादाचे राजकारण प्रमाणभूत मानलें. त्या काळातील इंडोनेशियाची प्रगति आणि प्रतिष्ठा अभ्यासण्या- सारखी आहे. यूनोचे सभासदत्वही याच धोरणामुळे त्याला ताबड- तोब आणि मानाने मिळाले होते. तसेच रशिया, चीन, अमेरिका वगैरे देशांशी कसे संबंध असावेत हे अत्यंत काळजीपूर्वक ठरवून निश्चित करण्याची पात्रता इंडोनेशियाने दाखविलेली आहे.

परंतु हळूहळू जागतिक राजकारणाचे उभे आडवे वारे आशि- यातून वाहू लागले आणि स्पर्धेच्या राजकारणाला सुरुवात झाली. इंडोनेशिया हे नव्याने स्वतंत्र झालेलें राष्ट्र हळूहळू या सत्तास्पर्धेच्या राजकारणात गुरफटले जाऊ लागलें. वास्तविक एवढ्या परिश्रमाने मिळविलेल्या स्वातंत्र्याची महती कितीतरी मोठी, त्यातही प्रथमतः या देशाने अलिप्ततावादी धोरण आखलेले, परंतु कम्युनिझम विरुद्ध लोकशाही अशा राजकीय स्पर्धेच्या झगड्यात इंडोनेशिया हा देश कम्युनिस्ट विचारसरणीच्या प्रवाहाखाली येत गेला. आणि शेवटी त्याची परिणती काय झाली याचा इतिहास फार ताजा आहे. १९५६ साली त्या देशात लष्करी उठाव झाला. त्या उठावाच्या पाठीमागे कम्युनिस्ट विचारसरणीचा म्हणण्यापेक्षा कम्युनिस्ट चीनचा फार मोठा हात होता. शेवटी हा उठाव फसला आणि लक्षा-

वधी लोकांच्या प्राणांची आहुती पडल्यानंतर राजकारणाची सूत्रे जनरल सुहार्तोच्या हाती आली. कम्युनिस्टांचे तोंड काळे झाले आणि चीनच्या अघोरी विस्तारवादाच्या आणि माओच्या पिसाट राजकारणाच्या पेकाटात आणखी एक जबरदस्त लाथ बसली; हा सारा इतिहास नुकताच घडून गेलेला आहे.

इंडोनेशियामध्ये झालेला हा लष्करी उठाव आणि त्यापाठीमागची राजकीय बीजे यांचे सूक्ष्मावलोकन केले तर असे दिसून येते की, डॉ. सुकार्नो यांनी स्वत:चे आणि स्वत:च्या देशाचे स्वत्त्व विसरून जी कम्युनिस्ट चीनकडे वाटचाल केली तीच त्यांच्या अंगलट आली. या संदर्भात भारतीय राजकारणात अलिप्ततावादाचे जे तत्त्व पंडितजींनी अवलंबिलेले आहे त्याची महती लक्षात येते. ज्याला आपल्या देशाचा विकास साधावयाचा आहे, त्याला आपल्या देशाचे व्यक्तिमत्वही ओळखता आले पाहिजे. चीनशी लगट डॉ. सुकार्नोच्या इतकी अंगलट आली की तिचा परिणाम म्हणून इंडोनेशियाच्या या महात्म्याला आपले आसनही गमावून बसावे लागले त्यात नवल नाही,परंतु या लगटीची परिणती तेथील लक्षावधी निरपराधी लोकांच्या जीवननाशात व्हावी, हा या विसाव्या शतकात डॉ. सुकार्नोच्या नावाला लागलेला एक अत्यंत शोकांत आणि भीषण कलंक आहे.

आपले स्वत्व विसरून दुसऱ्याच्या कच्छपी लागलेल्या देशांच्या राजकारणाचे आणि भवितव्याचे कसे दिवाळे वाजते याचे या जगातले इंडोनेशिया हे काही एकमेव उदाहरण नाही. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नादी लागलेल्या देशांचा शेवटही असाच झालेला आहे.

तसेच डॉ. सुकार्नो चीनच्या आहारी जाऊन त्यांनी यूनोमधून देखील आपल्या सभासदत्वाचा राजीनामा दिला होता. परंतु असे करताना आपल्या संपूर्ण पकडीखाली इंडोनेशियाला घेण्याचा चीनचा तो एक डाव होता हे राजकीय बुद्धिभ्रम झालेल्या सुकार्नोच्या ध्यानात तेव्हा आले नाही. पाकिस्तानने चीनच्याच चिथावणीने भारताबरोबर युद्ध सुरू केले तेव्हा देखील या डॉ. सुकार्नोंनी भारतावर मूठ वळवून 'Crush India' ची डरकाळी फोडली होती!

हा कोणता कैफ होता, अथवा या मुठीत शक्ति कोणाची होती आणि ती ज्या कोणाची शक्ति होती ती शेवटी आपल्यावरच उलटणार आहे याची बिचाऱ्या अध्यक्ष सुकार्नो यांना तेव्हा कल्पना आली नाही!

परंतु काही दिवसातच पारडे फिरले. आणि चीनचे श्वापद त्या देशावर उलटलें!

कम्युनिस्टांच्या देशभर उठावानें ही क्रांति सुरू झाली. अगोदर तेथील तथाकथित कम्युनिस्टांनी जेव्हा या रामटोल्याला सुरुवात केली तेव्हा त्यांनी सर्वप्रथम इंडोनेशियामधील मोठमोठाल्या लष्कराधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार केले. त्यानंतर काही लष्करी अधिकाऱ्यांना जिवंत पकडून आपल्या ताब्यात घेतले. त्यांना पळविण्यात आले आणि अज्ञात स्थळी ठेवण्यात आले म्हणण्यापेक्षा त्यांना मगरी-सुसरींच्या बिळांत नेऊन ठेवण्यात आले. तेथे त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. त्यांचे हात-पाय बांधून त्यांना खांबाशी बांधून ठेवण्यात आले आणि जेथे त्यांना असे बांधून ठेवले गेले होते त्या प्रचंड हॉलमध्ये नग्न तरुणींचा नाच करण्यात येत असे आणि नाचाच्या शेवटी या तरुणी आपल्या हातातील तीक्ष्ण सुऱ्यांनी यांचे कोथळे बाहेर काढीत असत अथवा बुबुळे ओरबाडीत असत.

या साऱ्या अत्याचाराच्या आणि दुर्दैवाच्या पाशवी कृत्यांच्या मुळाशी जसे कम्युनिस्ट आणि चीन होता तसेच सुदैवाने इंडोनेशियामध्ये दुसरी एक गोष्ट चांगली होती, ती म्हणजे इंडोनेशियन जनतेचा कम्युनिझमला कडवा प्रतिकार! कित्येक ठिकाणी गरीबीत आणि दुर्दैवात जीवन कंठणारे इंडोनेशियाचे नागरिक हे वृत्तीने कम्युनिझमविरोधी आहेत. हा कट उलथून पाडण्यास म्हणूनच तेथील जनशक्तीचा फार उपयोग झाला. तेथील मुस्लिम समाज हा तर आपल्या धर्मनिष्ठेनेच कम्युनिस्टांचा कट्टा विरोधक होता.

थोडक्यात म्हणजे जनतेची ही प्रचंड शक्ति अत्याचारी कम्युनिस्टाच्या पाशवी कृत्याविरुद्ध चवताळून उठली आणि रस्त्यात गल्लीत, दुकानात, मंडईत, दवाखान्यात, शाळेत कॉलेजात सापडेल

त्या ठिकाणी कम्युनिस्टांचे शिरच्छेद करू लागली. एकीकडे ही चवताळून उठलेली जनता आणि दुसरीकडे लष्करातील राष्ट्रवादी वृत्तीचे अधिकारी या दोन शक्तींनी मिळून हा अजगरविळखा कापून काढला. जनरल नोशशिन आणि जनरल सुहार्तो यांनी प्रयत्नांची, मुत्सद्देगिरीची आणि शौर्याची पराकाष्ठा करून या उठावाचा संपूर्ण बीमोड केला आणि डॉ. सुकार्नोचे देखील कंबरडे मोडून काढले !

परंतु या साऱ्या गंडाळीत मनुष्यहत्त्या प्रचंड प्रमाणात झाली. रस्त्यावर, गल्ली-बोळात, दुकानासमोरच्या फुटपाथवर, रानात, गटारात मेलेल्या माणसांची प्रेते पडली होती. त्यांची सर्वांची विल्हेवाट लावणे केवळ अशक्य होऊन बसलेले होते. शेकडो प्रेते समुद्रात फेकून दिली जात होती. त्यामुळे इंडोनेशियन लोकांनी काही महिने मासे पकडणे आणि खाणे सोडून दिले होते. कारण एखादे वेळी माशाबरोबर मनुष्याचे प्रेतच जाळयात यायचे आणि माशांच्या पक्वान्नाबरोबर एखाद्या दुर्दैवी प्राण्याच्या बोटाचा तुकडा पानात येऊन पडायचा !

या सर्वांवरून असा प्रश्न मनात येतो की कम्युनिस्टांविरुद्ध तेथील जनता एवढी एकजुटीने चवताळून का उठली ? याचे उत्तर कुठल्यातरी अमुक एका कारणामुळे, असे देता येणार नाही. त्याला अगणित कारणे आहेत. चीनप्रमाणेच इंडोनेशियाच्या अनेक प्रांतातून कम्युनिस्टांनी आणि त्यांचे सहप्रवासी अध्यक्ष डॉ. सुकार्नो यांनी शेतीसुधारणेची अनेक खुळे काढून शेतकऱ्यांना हैराण केले होते. आणि शेवटी ते सारे प्रयोग फसल्यामुळे शेतकरीवर्ग हवालादिल झालेला होता. दुसरी गोष्ट या जमीन वाटपाच्या बाबतीत अनेक विषम गोष्टी झालेल्या होत्या. कम्युनिस्टधार्जिण्या लोकांना जमिनींचा अधिक हिस्सा दिला गेला होता, शिवाय जमिनी वहीत करण्याच्या नावाखाली मध्यें येणारी देवळे आणि मशिदी जमीनदोस्त केल्या गेल्या होत्या. त्यामुळे बहुसंख्य हिंदु आणि मुस्लिम वर्ग चवताळून उठलेला होता. जमीनसुधारणेच्या नावाखाली त्यांनी जो

प्रचार केला होता तो असा की 'भाकरीच्या तुकड्यापेक्षा मंदिरातल्या देवाची काहीही किंमत नाही आणि मशिदीच्या दगडाचीही नाही!' या असल्या प्रचारामुळे बहुसंख्य जनतेच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या होत्या!

तसेच देशावर कोसळलेल्या आर्थिक संकटालाही तेथील जनता कंटाळलेली होती. रुपयाच्या नोटेची किंमत बाजारात एवढी घसरलेली होती की ज्या कागदावर ती नोट छापलेली होती त्या कागदाची किंमतदेखील नोटेच्या किंमतीपेक्षा अधिक होती!

इंडोनेशियन स्त्रियांना दररोजच्या बाजारहाटीसाठी रुपये अथवा रुपयाच्या नोटा सूटकेसेसमध्ये भरून न्याव्या लागत होत्या! ही गोष्ट होती इंडोनेशियातील मोठाल्या अगर मध्यम वस्तीच्या शहरातली. इंडोनेशियामधील खेड्यातील जनतेने तर आपले व्यवहार रुपयाच्या माध्यमामधून करण्याचे सोडूनच दिले होते. ते आपले व्यवहार वस्तूंच्या अदलाबदलीनेच करीत होते. बाली बेटावरील गवत कापण्याच्या व्यवहारात पूर्वी एखाद्या माणसाने दोन दिवस गवत कापले तर त्या मजुरीवर तो दहा दिवस जगू शकत होता; तोच आता एका दिवसाच्या कापणीवर पोट भरण्यासाठी दिवसासाठी लागणारे वेतनदेखील मिळवू शकत नव्हता!

निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले इंडोनेशियन विद्यार्थी जकार्ताच्या विद्यापीठामधील वर्गातूनच झोपत होते. कारण त्यांना राहण्यासाठी जागा मिळत नव्हती. विद्यापीठाच्या आवारामध्येच उघड्यावर ते आपली कॉफी आणि अन्न शिजवून खात होते. सरकारी नोकरांनी तर आपल्याला मिळणाऱ्या पगारावर जगण्याची आशाच सोडून दिलेली होती. कारकूनवर्ग तर दररोज ऑफिसमधून बाहेर पडताना कार्बन पेपर्स चोरून नेत होता. बसड्रायव्हर्स तर अगोदर काही पैसे घेतल्याशिवाय गिऱ्हाइकांना बसमध्ये बसूच देत नव्हते.

डॉ. सुकार्नोच्या कम्युनिस्टधार्जिण्या अवाढव्य आणि अव्यवहार्य योजनांना इंडोनेशियाची जनता वैतागली होती. चहूकडे देशात निराशा पसरलेली होती. लोक हवालदिल झालेले होते आणि आपसात

बोलत होते की 'या असल्या गोष्टीमुळे शेवटी आम्हाला पोटात काटे भरण्याची पाळी येणार आहे!'

१९६५ सालातील इंडोनेशिया हा असा होता. तरीही आपल्या नेत्यावर–डॉ. सुकार्णोवर–जनतेचे अफाट प्रेम होते. दारिद्र्याने, दुर्भिक्षतेने ग्रासलेले असूनदेखील लोक सुकार्णोवर निष्ठा ठेवून होते. निरनिराळ्या भुलावण्या देऊन कम्युनिस्टांनीच, म्हणजे चीनने या देशाला अशा विपन्न अवस्थेला आणले होते. हा त्यांचा फार मोठा डाव होता. कापणी करायची असेल तर जमीन पिकवावी लागते त्याप्रमाणे क्रांति करायची असेल तर अराजकता माजवावी लागते, लोकांना अन्नाला महाग करावे लागते. या साऱ्या गोष्टी चीनने केल्या होत्या. आणि आता त्यांच्या दृष्टीने इंडोनेशियाचे फळ अगदी पिकले होते! हे फळ झाडापासून अलग करण्यास हीच वेळ सर्वात उत्तम होती! ती साधून कम्युनिस्टांनी बंडाळीचा वरवंटा फिरविण्यास सुरुवात केली. परंतु ते बंड फसले. चीनच्याच अंगलट आले. इंडोनेशियात पसरलेले हजारो कम्युनिस्ट रस्त्यावर कापले गेले. जनरल एदित वगैरेसारख्या लष्करी अधिकाऱ्यांनी तर इंडोनेशियातून पळ काढला आणि चीनचा आश्रय घेतला. इंडोनेशियाचे स्फूर्तिस्थान असणारे डॉ. सुकार्णो जनतेच्या नजरेतून उतरले. ज्या नोशासिन आणि जनरल सुहार्तोंनी प्राणपणाने लढा देऊन इंडोनेशियाचे रक्षण केले त्यांच्या हाती सर्व सत्ता आली.

आणि कसलीही अतिशयोक्ती म्हणून नव्हे तर असे म्हणावे लागते की १९६५ सालीच खऱ्या दृष्टीने इंडोनेशियाला स्वातंत्र्य मिळाले. अजगरी विळख्यातून तो तावून सुलाखून बाहेर पडला.

आज इंडोनेशियाच्या राष्ट्रीय जीवनातले दुसरे पर्व सुरू झाले आहे!

# समारोप

दुसरे महायुद्ध संपले आणि जवळजवळ साऱ्या जगाचेच राजकीय चित्र बदलले. मुख्य गोष्ट झाली ती म्हणजे जागतिक राजकारणात युरोपला जो अग्रपूजेचा मान होता तो नाहीसा होऊन त्याला सर्वत्र माघार घ्यावी लागली. पहिले महायुद्ध झाले तेव्हाच खरे म्हणजे युरोपच्या राजकीय वर्चस्वाला पहिला हादरा बसला होता. परंतु तेव्हा आशिया आणि आफ्रिका येथील राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्यप्रेमी चळवळींनी म्हणावे तसे उग्र स्वरूप धारण केलेले नव्हते. स्वातंत्र्याविषयीची जागृतीची भावना फक्त तेव्हा या राष्ट्रात उदित झालेली होती; कार्यरत आणि शक्तिशाली झालेली नव्हती.

दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र ही भावना एक तेजस्वी रूप घेऊन बाहेर आलेली होती. विजा चमकाव्यात त्याप्रमाणे या भावनेची सळसळ जाणवत होती. या भावनेचे उदाहरणच द्यावयाचे झाले तर जेव्हा इंडोनेशियामध्ये डचांनी इंडोनेशियाच्या लोकसत्ताकाविरुद्ध 'पोलिस कारवाई' केली, तेव्हा आशियातील लोकमत डचांविरुद्ध भडकले. इतकेच नव्हे तर आशियातील अनेक देशांनी एकत्र येऊन डचांच्या जुलूमशाहीविरुद्ध आपला आवाज उंच केला. पंधरा देशांचे प्रतिनिधी जानेवारी १९४९ मध्ये नव्या दिल्लीत एकत्र आले. आणि त्यांनी इंडोनेशियाच्या भवितव्याविषयी जिव्हाळ्याची, तितकीच परिणामकारक चर्चा केली.

जागतिक राजकारणातील हा एक धवधवीत बदल म्हणावा लागेल. दुसरे जागतिक महायुद्ध झाले म्हणूनच आशिया–आफ्रिका या राष्ट्रांना हा बदल पाहायला मिळाला असे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाही. या युद्धाने जागतिक राजकारणाची दिशा आणि रंगच पार बदलून टाकला आणि या नव्या परिस्थितीमध्ये युरोपीय राष्ट्रांना आशिया–आफ्रिकेवरील आपले राजकीय वर्चस्व टिकवून धरता आले नाही.

युरोपचा हा जो शक्तिपात झाला याची कारणें अनेक आहेत. राजकीय आहेत तशीच ती आर्थिकही आहेत. कारण विसाव्या शतकामध्ये दोन महायुद्धे झाली. त्यामुळे साम्राज्यवादी युरोपीय राष्ट्रांची आर्थिक घडी विस्कटून गेली. त्याचा परिणाम त्यांच्या लष्करी सामर्थ्यावर होणे केवळ अपरिहार्य होते. आर्थिक आणि लष्करी दृष्टीने दुबळी झालेली युरोपातील ही साम्राज्यवादी राष्ट्रे जागतिक राजकारण खेळण्यासाठी उभी राहू शकतच नव्हती एवढा त्यांचा शक्तिपात झाला होता. त्यांचा हा दुबळेपणा आणि त्यांची झडलेली आयाळ लक्षात येताच आशिया–आफ्रिकेतील राष्ट्रवादी आणि स्वातंत्र्यप्रिय शक्तींनी जोर करण्यास सुरुवात केली. शेकडो वर्षे पारतंत्र्यात खितपत पडलेले हे जीवन नव्या चैतन्याने उसळून उठले आणि त्याने साम्राज्यशाहीवर, वसाहत वादावर धडका मारण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्योत्सुक राष्ट्रांच्या या धडकांचा जोर साम्राज्यवादी राष्ट्रे सहन करू शकली नाहीत. अगोदरच त्यांचा स्वत:चाच शक्तिपात झालेला होता. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या जखमा अजून ओल्याच होत्या. त्याचा परिणाम हा झाला की फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या हातून जागतिक राजकारणाची सूत्रे गळून पडली आणि ही सूत्रे अमेरिका आणि रशिया यांच्या हाती गेली. आणि जगाचे राजकारण करण्याचा युरोपचा अधिकार कायमचा नष्ट झाला.

या साऱ्या घडामोडीमध्ये आशिया आणि आफ्रिकेमधील बहुतेक सर्व देशांना स्वातंत्र्य मिळाले. साम्राज्यशाही आणि वसाहत-

शाही यांची धूळधाण उडाली. आणि व्हिएतनाम, कोरिया, तिबेट, इंडोनेशियाबरोबरच इतर किती तरी देशांना स्वातंत्र्य मिळाले.

दुसरे महायुद्ध आणि राजकीय प्रवासाची दिशा येथपर्यंत सुसंगत आहे. परंतु त्यानंतर जगामध्ये खरे स्वातंत्र्य आणि राजकीय स्थैर्य निर्माण होण्याऐवजी थंडेयुद्ध आणि सत्तास्पर्धेचे राजकारण सुरू झाले. त्यातच वर निवेदन केलेल्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांचे स्वातंत्र्य पुन्हा संकटात आले. आणि या देशांना युद्धकुंडाचे स्वरूप प्राप्त झाले. आशिया आणि आफ्रिकेतील आज असे किती तरी चिमुकले देश दाखविता येतील की ज्यांचे भवितव्य आज त्यांच्या नेत्यांच्या हातात राहिले नसून अमेरिका आणि रशिया यांच्या हाती गेले आहे.

म्हणजेच जुना साम्राज्यवाद जाऊन त्या जागी आता नवा साम्राज्यवाद आलेला आहे. अर्थात या साम्राज्याज्यवादाला नाव मात्र गोंडस देण्यात आलेले आहे आणि येथे जे युद्ध चालते ते साम्यवाद विरुद्ध लोकशाही अशा विचारप्रणालीच्या नावाखाली.

जगावर झडप घालू पाहणारे हे नव्या वादांचे संकट जगातील नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांनी ओळखले पाहिजे आणि आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठी आणि जागतिक स्थैर्यासाठी त्याचा प्रतिकारही केला पाहिजे.

हे संकट कसे येते आणि त्याची परिणति काय होते याचा अभ्यास करता यावा म्हणून या सत्तास्पर्धेच्या राजकारणाला बळी पडलेल्या देशांचा इतिहास येथे देण्यात आलेला आहे.

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम...० ५६५२० दि....
मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ९०२२०

REFBK-0017220